रविवार, २९ जानेवारी २०२३
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१५८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 29 JANUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-158 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5


# ‘अदानी’मुळे एलआयसी- सरकारी बँका धोक्यात

## नाना पटोले : गैरकारभाराची चौकशी स्वतंत्र एसआयटीमार्फत करावी

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई : उद्योगपती गौतम अदानी यांच्या मालकीच्या अनेक कंपन्यांचे शेअर्स गेल्या दोन्ही ट्रेडिंग सत्रात मोठ्या प्रमाणात आपटले. इतकेच नाही तर यामुळे अदानी जगातील श्रीमंतांच्या यादीतही खाली घसरले. अमेरिकेतील एका संशोधन फर्मने अदानी समूहावर कॉर्पोरेट फसवणुकीचा आरोप केल्यामुळे अदानी आणि त्यांच्या समूहातील कंपन्यांना मोठा फटका बसला. २४ जानेवारी रोजी हिंडेनबर्ग रिसर्चचा एक अहवाल प्रकाशित झाला आणि शेअर बाजारात अक्षरशः भूकंप आला. या अहवालाने अदानी समूहातील कंपन्यांचे शेअर्स झरझर खाली आपटले तर भारतीय आयुर्विमा महामंडळआणि सरकारी बँकांचे भवितव्यही धोक्यात आले आहे.**

भारतीय स्टेट बँक (एसबीआय), एलआयसी आणि इतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी उदारतेने अदानी समूहात गुंतवणूक केली आहे परिणामी देशाच्या वित्तीय व्यवस्थेला जोखीमचा सामना करावा लागू शकतो.

एकीकडे एलआयसीने अदानी समूहात मोठी गुंतवणूक केली असताना अनके सरकारी बँकांनी समूहाला मोठ्या प्रमाणावर कर्जे दिली आहेत. एकंदरीत हजारो कोटींचा सरकारी पैसा गौतम अदानींच्या कंपन्यांमध्ये गुंतला आहे. अशा परिस्थितीत अदानी समूहाच्या व्यवहारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना एसबीआय आणि एलआयसी यांसारख्या वित्तीय संस्थेतील कोट्यवधी भारतीयांच्या बचतीबाबत चिंता व्यक्त होत आहे. अदानी समूहातील देशातील सर्वात मोठा संस्थात्मक गुंतवणूकदार म्हणजे एलआयसी, शेअर बाजारातील सूचीबद्ध कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करते. गेल्या दोन वर्षांत एलआयसीने अदानी समूहातील कंपन्यांमधील गुंतवणूक झपाट्याने वाढवली असून अदानी ग्रुपच्या ७ पैकी चार सूचीबद्ध कंपन्यांमधील गुंतवणूक वाढवली आहे. अदानी समूहाच्या कंपन्यांमधील विमा क्षेत्रातील कंपन्यांच्या एकूण गुंतवणुकीपैकी एकट्या एलआयसीची ९८.९ टक्के गुंतवणूक आहे. २४ जानेवारी रोजी अदानी समूहातील एलआयसीची गुंतवणूक ८१ हजार २६८ कोटी रुपये होती, जी २७ जानेवारीपर्यंत ६२ हजार ६२१ कोटी रुपयांवर घसरली. अशा प्रकारे अवघ्या काही दिवसांत देशातील जनतेचे सुमारे १८ हजार ६४७ कोटी रुपये स्वाहा झाले.

### सामान्य जनतेचे हजारो कोटी धोक्यात घालण्याचे पाप नरेंद्र मोदींचेच

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उद्योगपती गौतम अदानी यांचे घनिष्ठ संबंध सर्व जगाला माहित आहेत . स्टेट बँक ऑफ इंडिया, एलआयसीसह सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांमधील सामान्य जनतेचा पैसा मोदींनी आपल्या उद्योगपती मित्राच्या विविध कंपन्यांमध्ये कोणताही विचार न करता गुंतवला . अदानी कंपनीवर केलेल्या मेहरबानीमुळे कोट्यवधी रुपये डुबण्याची भिती निर्माण झाली असून या गैरव्यवहाराची संपूर्ण चौकशी स्वतंत्र एसआयटीमार्फत करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे . यासंदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले की, केंद्रात सत्तेवर येण्याआधीपासून उद्योपती गौतम अदानी व नरेंद्र मोदी यांचे संबंध जगजाहीर आहेत . केंद्रात सत्तेत आल्यानंतर या संबंधामुळे मोदी सरकारने अदानींच्या कंपन्यांवर विशेष मर्जी दाखवत स्टेट बँक इंडियाकडून कोट्यवधी रुपयांचे कर्ज दिले . देशातील सर्वात मोठी व सामान्य गुंतवणुकदारांची विमा कंपनी LIC मधील ७४ हजार कोटी रुपये अदानीच्या कंपनीत गुंतवले . अदानी हे जगातील श्रीमंत उद्योगपतींच्या यादीत दुसऱ्या नंबरवर पोहचले ते केवळ मोदी सरकारच्या आशिर्वादामुळेच . फायद्याच्या सरकारी कंपन्याही मोदी सरकारने अदानीच्या घशातच घातल्या आहेत . अदानी कंपनीत मोठे गौडबंगाल आहे हे उघड होताच या कंपन्यातील शेअर कोसळले व एसबीआय, एलआयसी सह सरकारी कंपन्यांनाही मोठा आर्थिक फटका बसला आहे . अदानीचा फुगा आज फुटला आहे . सहारा कंपनीच्या सुब्रत रॉयचा सुद्धा असाच बोलबाला होता पण सहाराचा फुगा फुटला आणि सुब्रत रॉयला जेलची हवा खावी लागली . करोडो लोकांचे पैसेही बुडाले . अदानीची अवस्थाही सहाराच्या सुब्रत रॉय सारखीच होईल . देशातील अत्यंत महत्वाचे आंतरराष्ट्रीय विमानतळ म्हणून मुंबई विमानतळाची ओळख आहे . मुंबईचा हा विमानतळ अदानीच्या घशात घालण्यासाठी मोदी सरकारने सरकारी तपास यंत्रणांचा कसा गैरवापर केला हे सर्वांना माहित आहे . मुंबईतील वीज वितरणही अदानीला देण्याचा घाट राज्यातील फडणवीस सरकारने घेतला होता पण महावितरणचे कर्मचारी व जनतेच्या विरोधामुळे तूर्तास वीज वितरण अदानीकडे जाऊ शकले नाही . दुबईच्या कंपनीने धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी जास्त पैशांची बोली लावून करार केला असतानाही तो करार रद्द करुन मोदी सरकारच्या हट्टापायी धारावीचा प्रकल्प अदानी कंपनीला कमी पैशात देण्यात आला .

# माजी मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघात प्रदेशाध्यक्षांना दिली संधी

## भाजपचे धक्कातंत्र

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** केंद्रीय निवडणूक आयोगानं नागालँड, त्रिपुरा आणि मेघालयच्या विधानसभा निवडणुका जाहीर केल्या आहेत. भाजप आणि काँग्रेसकडून निवडणुकीची तयारी सुरु करण्यात आली आहे. भाजपनं त्रिपुरा विधानसभेच्या ६० जागांपैकी ४८ जागांवर उमेदवार जाहीर केले आहेत. मात्र, पहिल्या ४८ नावांमध्ये माजी मुख्यमंत्री बिप्लब कुमार देब यांच्या नावाचा समावेश नाही. काँग्रेसनं देखील त्रिपुरा विधानसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यात १७ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. माजी मुख्यमंत्री बिप्लब कुमार देब यांच्या बनमालीपुर विधानसभा मतदारसंघातील उमेदवाराच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. या ठिकाणी त्रिपुरा भाजपचे अध्यक्ष राजीब भट्टाचार्जी उमेदवार असतील. मुख्यमंत्री माणिक साहा यांना टाउन बार्दोवाली विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री प्रतिमा भौमिक यांचं नाव देखील उमेदवारांच्या यादीत आहे. भाजपनं त्यांना धनपूर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपनं दोन मुस्लीम नेत्यांना देखील उमेदवारी दिली आहे. भाजपच्या पहिल्या यादीत बॉक्सनगरमधून तफ्फजल होसैन आणि कैलाशहर मतदारसंघातून मोहम्मद मोबेशर अली यांना उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपनं पहिल्या यादीत ४८ जागांवरील उमेदवारांची नावं जाहीर करण्यात आली आहेत. भाजपकडून आणखी १२ उमेदवारांच्या नावांची घोषणा होणं बाकी आहे. दुसऱ्या यादीत काही नव्या नावांचा समावेश असण्याची शक्यता असल्याचं बोललं जातंय. भाजपकडून जारी करण्यात आलेल्या यादीत माजी मुख्यमंत्री आणि राज्यसभा खासदार बिप्लब कुमार देब यांचं नाव नाही. केंद्रीय निवडणूक आयोगानं १८ जानेवारी रोजी ईशान्य भारतातील मेघालय, नागालँड आणि त्रिपुराच्या विधानसभा निवडणुका जाहीर करण्यात आली आहे. त्रिपुरामध्ये १६ मध्ये मतदान होईल.

# मनसेनेला तेव्हा लोकशाही का आठवली नाही?

## आशिष शेलारांचे शरद पवारांसह मनसेवर टीकास्त्र!

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मनसेने आम्हाला शहाणपण शिकवू नये. तसेच शरद पवारांनी आम्हाला सल्ला देत असताना केतकी चितळे प्रकरणात ही भूमिका का नाही घेतली? असा प्रश्न भाजपाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष आमदार आशिष शेलार विचारला आहे.

मनसेने देखील बीबीसीच्या माहितीपटावर प्रतिक्रिया देताना म्हटले, लोकशाहीमध्ये कुणाचाही हक्क हिरावून घेता येत नाही.

यावर उत्तर देताना शेलार म्हणाले, आम्ही कुणाचाही हक्क हिरावून घेत नाहीत. जे मनसेचे लोक आम्हाला शहाणपण शिकवत आहेत. त्यांनी मनसेच्या विरोधात सोशल मीडियावर लिहिणाऱ्यांना शिवाजी पार्कवर आणून खळ्ळखट्याक करा असे सांगितले होते. तेव्हा हे सांगताना त्यांना लोकशाही आठवली नाही का? असा प्रश्नही शेलार यांनी उपस्थित केला.

आशिष शेलार म्हणाले, “BBC Documentary ने अपप्रचार, दुष्प्रचार आणि असत्य पसरविण्याचा प्रयत्न केला असल्याचे समोर आले आहे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सच्या संस्थेत बीबीसीचा माहितीपट दाखविण्याचे काम विशिष्ट धर्माच्या संघटननेने केले असल्याची आमची माहिती आहे. हा विषय मुंबई आणि महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्याचे कारण बनू शकतो, अशी भावना कार्यकर्ते आणि जनतेमध्ये आहे. म्हणून आम्ही पोलिसांना अवगत केले आहे, यावर वेळीच कारवाई करा. मोदींच्या बदनामीचा प्रयत्न मुद्दामहून केला जात आहे. भावना भडकविण्याचा प्रयत्न होत आहे, त्यावर आम्ही आमचा निर्णय घ्यायला मोकळे आहोत.” तसेच Tiss ने असे धंदे बंद करावेत. Tissच्या आडून जर काही संघटनना हे काम करत असतील तर त्यांनी राजकारणात समोरासमोर येऊन सामना करावा, असे आव्हान देखील शेलार यांनी दिले आहे.



मुंबईत वायू प्रदूषण होत असल्याबाबत आदित्य ठाकरे यांनी ट्विट केले आहे. त्यावर बोलत असताना शेलार म्हणाले, आदित्य ठाकरे हे उशिरा जागे झाले आहेत. चार दिवसांपूर्वी मी राज्य सरकारला पत्र लिहिले आहे. मी पत्र लिहून मागणी केल्यामुळे आता त्यांना प्रश्न विचारले जातील म्हणून त्यांनी ट्विट केलं आहे. आदित्य ठाकरे यांना उशिरा सुचलेले शहाणपण आहे. भाजपाने हा विषय स्वतः लक्षात घेऊन उपमुख्यमंत्री आणि आयुक्तांना पत्र लिहिले आहे. आदित्य ठाकरे वराती मागून घोडे घेऊन आले आहेत. तुम्ही दिलेल्या बांधकामाच्या परवानग्यामुळे डस्ट निर्माण झाली, असा आरोपही शेलार यांनी केला.

# गोडसेने गांधींचा तर नेहरुंकडून विचारांचा खून

## सदाभाऊ खोत यांचे वादग्रस्त वक्तव्य

आधुनिक केसरी न्यूज

पुणे : आपल्या देशामध्ये सध्या इंडिया आणि भारत दोन प्रकारचे देश आहेत. यामध्ये भारत हा शेतकऱ्यांचा देश आहे. महात्मा गांधी हे कायम खेड्यांकडे चला असा विचार मांडत होते, परंतु पंडित नेहरू यांनी या विचारांचा खून केला. युरोप आणि अमेरिकेच्या विचारांनी प्रभावी झालेल्या पंडित नेहरूंनी खेड्यांकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे खेडी भकास झाली आणि शेतकरी उध्वस्त झाला, असे सदाभाऊ खोत म्हणाले आहेत. "महात्मा गांधी यांचा खून माथेफिरु नथुराम गोडसे यांनी केला ही बाब निषेधार्ह आहे, परंतु महात्मा गांधी यांच्या विचारांचा खून पंडित नेहरु यांनी केला हे स्वीकारावेच लागेल", अशी टीका राज्याचे माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांनी केली.


जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसतर्फे संस्थेच्या नऱ्हे कॅम्पसमध्ये आयोजित करण्यात आलेल्या सहाव्या युवा संसदमध्ये आयडिया ऑफ इंडिया या सत्रामध्ये सदाभाऊ खोत बोलत होते. आमदार गोपीचंद पडळकर, इन्स्टिट्यूटचे संस्थापक प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, विद्यार्थी नेता पार्थ पटले, कुणाल दंडवते आदी यावेळी उपस्थित होते. रंजना गायकवाड यांना आदर्श सरपंच पुरस्कार, संजय गिराम यांना आदर्श जिल्हा परिषद सदस्य पुरस्कार तर राजेश पाडवी यांना आदर्श आमदार पुरस्काराने यावेळी सन्मानित करण्यात आले. सदाभाऊ खोत म्हणाले, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी कष्ट करून देशाचा विकास केला, परंतु इंडियातील उद्योजकांनी शेतकऱ्यांची पिळवणूक करून देशाची लुबाडणूक केली. अशीच व्यवस्था कायम राहिली तर देशामध्ये समान विकास कसा होईल. त्यामुळे शेतकऱ्यांचा विचार करणारा विकास आपण निर्माण केला पाहिजे, असे खोत म्हणाले.




**बारामतीकर घराणेशाहीच्या राजकारणाला कंटाळले**

सामाजिक कामाच्या नावाखाली बारामतीकर गेल्या अनेक वर्षांपासून एकाच कुटुंबाची सत्ता अनुभवत आहेत . परंतु, हे कुटुंब मात्र आपण सामाजिक काम करत आहोत असा देखावा करत स्वत :चेच खिसे भरत आहेत . कुटुंबाच्या मालकीचे साखर कारखाने शैक्षणिक संस्था निर्माण करून या कुटुंबाने बारामतीकरांना वाऱ्यावर सोडले . यामुळे बारामतीकर घराणेशाहीच्या राजकारणाला वैतागले आहेत, अशी टीका सदाभाऊ खोत यांनी यावेळी केली .

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

स्वामी विवेकानंदाना उणेपुरे ३९ वर्षांचे आयुष्य लाभले होते, पण एवढ्या अल्प आयुष्यात त्यांनी जे प्रचंड कार्य केले ते सामान्य व्यक्तीला दोन जन्म घेतले तरी करणे कठीण आहे. वेदांचा आणि भारतीय संस्कृतीचा परिचय त्यांनी जगाला तर करून दिलाच पण भारतीयांनाही तो सोप्या भाषेत नव्याने करून दिला. त्यांचे तेजस्वी विचार ऐकून शिकागो येथील धर्मपरिषदेत सर्वच पाश्चात्य धर्मप्रसारक अक्षरशः स्तिमित झाले. त्यांनी जेव्हा सांगितले की सर्व धर्मांचे सार एकच आहे. कोणताही धर्म श्रेष्ठ नाही. असे सहज, सोपे आणि सुंदर विचार धर्माबद्दल यापूर्वी कोणी व्यक्त केले नव्हते. जो तो आपलाच धर्म कसा श्रेष्ठ आहे हेच सांगत होता. म्हणून स्वामीजींचे विचार सगळ्यांनाच आकर्षित करून घेणारे ठरले. ' न्युयॉर्क क्रिटीक ' या वर्तमानपत्राने म्हटले की, ' स्वामीजी दैवी वक्तृत्वाचे धनी तर आहेतच, परंतु त्यांचे धीरगंभीर उद्गार देखील त्यांच्या काषाय वस्त्रात शोभून दिसणाऱ्या तेजस्वी मुखमंडलाहून काही कमी आकर्षक नाहीत.' ज्या काळात आजच्या इतकी वाहतुकीची साधने नव्हती अशा काळात स्वामी विवेकानंदांनी संपूर्ण भारत भ्रमण केले. जग तर त्यांनी पहिलेच होते. पण भारतातील लोकांची स्थिती नजरेखालून घातली. त्यांनी त्या काळात शिक्षणाबद्दल जे विचार मांडले ते आजही तितकेच उपयुक्त आहेत. त्यांची उपयोगिता काळ बदलला तरी तसूभरही कमी झालेली नाही. परदेशात जाण्याआधी स्वामीजी भारत भ्रमण करीत असताना १८९२ च्या सुमारास बेळगावात श्री हरिपद मिश्र यांच्याकडे उतरले होते. त्यावेळचा एक प्रसंग श्री हरिपद मिश्र यांनी सांगितला आहे. तो त्यांच्याच शब्दात, "एक दिवस बोलण्याच्या भरात स्वामीजींनी ' पिकविक पेपर्स ' या कादंबरीतील दोनतीन पाने पाठ म्हणून दाखवली. मी ती कादंबरी अनेकदा वाचली असल्यामुळे स्वामीजींनी म्हटलेला भाग कुठला आहे हे तेव्हाच माझ्या लक्षात आले. स्वामीजींचे ते पाठांतर ऐकून मला खूपच आश्चर्य वाटले. संन्यासी असूनही सामाजिक कादंबरीतला भाग यांना कसा पाठ झाला असावा ? त्यांनी ती कादंबरी पूर्वी बहुधा अनेकदा वाचली असावी असे मला वाटले. त्यांनी ते पुस्तक किती वेळा वाचले असे मी त्यांना विचारल्यावर ते म्हणाले, ' दोनदा. एकदा शाळेत असताना आणि पाचसहा महिन्यापूर्वी आणखी एकदा. ' त्यांचे उत्तर ऐकून तर माझ्या आश्चर्याला सीमाच राहिली नाही ! मी विचारले, ' मग ते तुमच्या लक्षात कसे राहिले ? आमच्या का नाही राहत ?' त्यावर स्वामीजींनी उत्तर दिले, ' कोणतीही गोष्ट एकाग्र मनाने वाचावयास हवी. कोणत्याही अभ्यासात एकाग्रता ही हवीच."

**क्रमशः**



# माणूस घडविणारे शिक्षण हवे... स्वामी विवेकानंद

## आनंदी पहाट



# वैचारिक बैठकीत सामील व्हावे

आधुनिक केसरी

विचारांचा पाया मजबूत असलेल्या व्यक्तीच्या मानसिक कळसाची उंची मोजणे सहज शक्य होतेच असे नाही. अशा व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचेच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचे दिसून येत असते. ह्याची जाणीव आपण ठेवणे आवश्यक असते. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे, असा विचार आपल्या मनात यायला हवा. विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसे मिळेल, ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणे महत्वाचे ठरते. कारण, अशा विचारवंतांच्या वैचारिक, मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा, आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखवत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झाले, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचे दर्शन होतच राहते. आपल्या अंतर्मनाला संस्कारच शिस्त लावत असतात. एक विशीष्ट आकार, दिशा आणि गती प्राप्त करून देत असतात. मुळातच ह्या विचारांची व्याप्ती आपण समजून घेणे सर्वप्रथम जरुरीचे असते. आपल्या प्रत्येकाच्या जीवनांत अंतर्मानावरील संस्कार खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्याशिवाय आपल्या विचारांमध्ये परिपक्वता येतेच असे नाही. संस्काराशिवाय जीवनमूल्य शून्य ठरत असते. संस्कारच आपल्याला श्रेष्ठ बनवत असतात, उत्तम आकार देत असतात. आपल्या सर्वोत्तम जीवनाचा पाया उत्तम संस्कारांवरच अवलंबून असतो. संस्कारांशिवाय जीवन भरकटलेल्या जहाजाप्रमाणे, विमानाप्रमाणे असते, एकप्रकारे विमनस्क अवस्थेतील मन कोणतीही पातळी गाठू शकते. त्याचप्रमाणे, संस्कृती सुद्धा, संस्कारांवर आधारित असते. संस्कार म्हणजे आपल्या अंतर्मनावर सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या आणि उपयुक्त ठरतील अशा चांगल्या सवयी, असे म्हणता येईल. आपल्यामध्ये यासाठी आवश्यक ते सद्गुण असणे जरुरीचे असते. अशा गुणांचा केवळ व्यक्तिगत लाभ होत नसतो, तर समाजातील प्रत्येक घटक लाभार्थी ठरत असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

# घे भरारी....

आधुनिक केसरी

"गरूडा सारखी उंच भरारी घे" असं आपण मुलांना सांगतो. पण इतकं सोपं आहे का हो भरारी घेणं? उंच उडी, भालाफेक, गोळा फेक करण्यासाठी आधी तयारी करावी लागते ! त्याचं मोलच नाही??? जिंकला तर टाळ्या पडतात. पण हरला तर काय?? उपेक्षा! हेटाळणी! निंदा! तुच्छ नजरा ! असं का? हरणाराने प्रयत्न नाही केले का?... केले तर!!! त्यानेही तेवढेच प्रयत्न केलेले असतात. पण त्यावेळी जो जिंकणार असतो तोच जिंकतो. आणि कोणीतरी एक जण हरतो म्हणून दुसरा जिंकतो. हरणाऱ्याला सुद्धा तेवढीच शाबासकी दिली पाहिजे. एकाला डोक्यावर आणि दुसऱ्याला पायदळी. असं का?? हरला म्हणून त्यांनी गुन्हा थोडाच केला. त्याचे एवढेच प्रयत्न होते. पण निसटला जय त्याच्या हातातून. येईल पुन्हा संधी त्याला. त्यावेळी तो पकडून ठेवील ती संधी. घेईल तोही भरारी विजयाची. मुलांच्या पंखात आणि मनात बळ देण्याचे काम आपल्यालाच करायचं आहे. लहानपणापासून मुलांकडे लक्ष द्यायचं आहे. त्यांनी उंच भरारी घ्यावी म्हणून ज्या झाडावर ते बसले आहेत त्याच्या फांद्या कापल्या की पडण्याच्या भीतीने ते आपोआप भरारी घेतील. पण त्यासाठी आपलाही तेवढाच वेळ मुलांसाठी दिला पाहिजे. परिवारासोबत एकत्र फिरावे, एकत्र जेवावे, एकत्र गप्पा कराव्यात घरात काय चालू आहे सर्वांना माहीत असावे. कोणापासूनच काही लपवू नका. आपलीच माणसं असतात सर्व. सर्वांवर जीवापाड प्रेम करावं . उंच भरारी घेण्यासाठी घरातीलच माणसं सहकार्य करतात .त्यांनाच नेहमी वाटतं की मुलांनी आपल्यापेक्षा मोठं व्हावं. असं वाटणारे एकमेव व्यक्ती असतात ते म्हणजे आई वडील .आई वडील, मुलं सगळेच एकमेकांचे आदर्श असावेत. स्वतःशीच स्पर्धा करा .हसत हसत मुलांना म्हणावं घे भरारी..!आम्ही आहोतच ...

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग-59

# वेळेचे महत्व

आधुनिक केसरी

एक घोड स्वार आपल्या घोड्याला खरारा करून त्याच्यावर खोगीर घालत असताना घोड्याच्या एका पायाच्या नालेचा एक खिळा सुटून पडला आहे असे त्याला दिसून आले. पण तेथे दुसरा खिळा बसविण्याचे काम त्याने मागे टाकले. काही वेळाने लढाईला जाण्याचा इशारा देणारे शिंग वाजू लागताच तो स्वार आपल्या घोड्यावर बसून लढाईच्या जागेकडे निघाला. तिथे गेल्यावर त्या फौजेच्या सेनापतीने हुकूम सोडला की, 'सर्वांनी आपली घोडी भरधाव सोडून शत्रूंवर तुटून पडावे आणि त्यांचा पाठलाग करावा.' हुकूमाप्रमाणे तो स्वार आपला घोडा उडवीत चालला असता खिळा पडल्यामुळे सैल झालेला घोड्याची नाल पडली व त्यामुळे घोडा लंगडत- लंगडत पळू लागला. लंगडताना एका दगडावर त्याचा पाय आपटल्याने स्वार घोड्यावरून खाली पडला व तो शत्रूच्या हाती सापडताच शत्रूने लगेचच त्याला मारले.

**तात्पर्य :** वेळच्या वेळी काम न करता ते आळसाने पुढे ढकलणे ही सवय वाईट व घातक आहे.



# निरुपण

आधुनिक केसरी

**चुका सज्जन आणि दुर्जन दोघेही करू शकतात. तुम्ही मात्र सज्जनांच्या चुकांचे कारण समजून घ्या आणि दुर्जनांच्या चुकांचे परिणाम.**

**या जगात जन्माला आला आणि दुःख भोगलेच नाही असा प्राणी सापडणे कठीण आहे. पण ध्यानी ठेवा- जितके अधिक शोक कराल तितके दुःख नाहीसे करण्यापासून दूर जाल.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर


# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी

**मन की चाल कुचाल है, जीवाहिं उवट चलाव । मन फन्दा में जिव पड़े, बिनु गुरु कवन छोड़ाव ।।२२।। (स्वर्वेद पंचम मण्डल द्वितीय अध्याय) ०५/०२/२२**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

मनाची चाल म्हणजेच ढंग वाईट आहे. ती जीवांना दुःखदायी पतनाच्या मार्गावर घेऊन जाते आणि जीव विषय-सुखाच्या प्रलोभनात पडून मनाच्या फंदात म्हणजेच जाळ्यात अडकतो. सद्गुरूंशिवाय हे भवबंधन दुःख सोडवणारं दुसरं कोण आहे ?



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

सहाव्या समासातील माध्यान्य भागात आपणपोहचलो आहोत. मी मागे म्हणालेच आहे की वरचेवर खुपच विचार पूर्वक लिखाण अपेक्षित आहे त्यामुळे वाचकांच्या हाती देतान ऊशीर होत आहे आणि याची मला जाणीव आहे पण ऊत्तम ते द्यावे ऊत्तम ते घ्यावे हा विचार मनात कायमचा घर करून असल्याने लिखाणात मर्यादा येत आहेत. सर्व प्रथम मी दिलगिरी व्यक्त करते. वेद वाङःमयाचा अभ्यास करत असताना अभ्यासकाने ब्रम्हा,विष्णु, महेश,दत्तात्रेय हेच फक्त थोर आणि ज्ञानी पुरूष होऊन गेले असे म्हणणे म्हणजे पढतमूर्ख पणा आहे. आणि यावर आपण एक समास पूर्णपणे अभ्यासला आहे.( पढतमूर्खाची लक्षणे ) वेद, उपनिषदांमध्ये भागवत ग्रंथात ऊल्लेखलेला शुक आणि वामदेव यांचा देखील मुक्त व ज्ञानी असा ऊल्लेख आढळतो. हे दोघेही ब्रम्हज्ञानी होते. या समासात समर्थांनी सांगितले आहे की वेदाने पूर्व पक्ष मांडला. त्यांच्या अंगी ब्रम्हज्ञान करून देऊन जीवाला मुक्त करण्याचे सामर्थ्य नसेल तर त्याला कोणीही विचारणार नाही. जीवाला मुक्त करण्याचे सामर्थ्य वेदांच्या ठिकाणी आहे यांत शंकाच नाही.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# तुकाराम गाथा


आधुनिक केसरी

**न धरावा लोभ कांहीं मजविशीं । जालें देवपिशी तुका म्हणे ॥३॥**
**विसरले कुळ आपुला आचार । पती भावे दीर घर सोय ॥१॥**
**सांडिला लौकिक लाज भय चिंता । रातलें अनंता चित्त माझें ॥२॥**
**मज आतां कोणी आळवाल झणी । तुका म्हणे कानीं बहिरी जालें ॥३॥**
**न देखें न बोलें नाइकें आणीक । बैसला हा एक हरि चित्तीं ॥१॥**
**सासुरें माहेर मज नाहीं कोणी । एक केलें दोन्ही मिळोनियां ॥२॥**
**आळ आला होता आम्ही भांडखोरी । तुका म्हणे खरी केली मात ॥३॥**
**दुजा ऐंसा कोण बळी आहे आतां । हरि या अनंता पासूनिया ॥१॥**

# भगवंत हाच एकमेव आधार वाटला पाहिजे

आधुनिक केसरी

एक भगवंत सत्य आहे. आपले कुठे चुकत असेल तर ते हेच की, आम्ही प्रपंच सत्य मानतो. फणस कापायला ज्याप्रमाणे हाताला तेल लावावे लागते त्याप्रमाणे, राजकारण घ्या, किंवा प्रपंच घ्या, हरिप्रेमाचे तेल आधी हाताला लावावे. समर्थांनी 'मुख्य हरिकथानिरूपण' असे सांगितले; म्हणजे बाकीच्या गोष्टी आपोआप मागे येतील. आम्ही कर्तेपण मिरवू पाहतो इथेच सर्व बिघडते. हरीचे अधिष्ठान ठेवण्याआधी आम्ही कर्तेपणाचेच अधिष्ठान ठेवतो. लग्नाच्या आधी देवाला नमस्कार करतो, पण पुढे प्रपंचात देवाला विसरतो, हे चुकते. नुसते विषय घातक नाहीत; त्यांच्यात आम्ही आपल्या आवडीने जीव घालतो हे घातक आहे, विषयाच्या ताब्यात जाणे हे घातुक आहे. पण पायाच जर चांगला नाही घातला तर देऊळ कसे टिकावे ? अमुक एका कार्याला कुणाची मदत नको म्हटले, तर आपण जे म्हणू ते व्हायला पाहिजे. ते होत नाही. तेव्हा मदत कोणाची तरी घ्यायचीच, तर मग आपल्यासारख्या बुडत्याचीच घेऊन काय उपयोग ? भगवंताचीच घेतली पाहिजे. आम्ही जर भगवंताजवळ विषय मागितले तर त्याचे फळही घ्यावे लागेल. दुर्योधन आणि अर्जुन भगवंताची मदत मागायला आले. एवढे सैन्य सोडले आणि अर्जुनाने भगवंताला मागितले. दुर्योधनाने जे मागितले तेच नाही का आम्ही आज प्रपंचात मागत ?



आमचे कार्याकडे लक्षच नसते, सर्व लौकिकाकडेच असते. 'मी दुसऱ्या कशाचाही नाही' असे म्हटले म्हणजे भगवंताला अनन्य शरण होता येते. 'परमात्मा हवा' ही नाही आम्ही जाणीव करून घेत, 'जग हवे' असे म्हणतो; आणि तिकडे, सर्व जग मला नावे ठेवते असेही म्हणतो ! मी म्हणतो, जगाला नावे ठेवू द्या, पण राम काय म्हणतो इकडे पाहणे जरूर आहे. आपण परमेश्वराचे परमेश्वरालाच दिले तर कुठे बिघडले ? जो दिसत नाही, भासत नाही, त्याचे हे सर्व आहे असे म्हणण्यात कुठे बिघडते ? ते म्हणण्यात जे समाधान मिळते ते नाही आम्हाला समजत. खरोखर परमात्मा साक्षात कल्पवृक्ष आहे. आपण नेहमी चिंता वाहतो, म्हणून तो आपल्याला चिंताच देतो. आपण जर त्याच्याकडे आनंद मागितला तर तो आपल्याला आनंदच देईल. भगवंताचा आनंद हा फार बलवत्तर आहे. तो एकदा मिळाल्यावर प्रपंचातल्या लाभहानीचे महत्त्व नाही. राम हा त्रैलोक्याचा स्वामी आहे, आपण त्याचे सेवक आहोत. पण आम्ही नोकरी दुसऱ्याची करतो आणि पगार मात्र रामाजवळ मागतो ! तसे करू नये. खरे-खुरेच रामाचे दास व्हावे. ज्ञान, योग, प्राणायाम वगैरे भगवंतावाचून येऊ शकेल, पण भक्ति मात्र भगवंतावाचून येणार नाही. भक्ति ही भगवंताची देणगी आहे. प्रपंच करणे हा आपण स्वार्थ म्हणतो . पण तो खरा स्वार्थ नाही ; खरा स्वार्थ भगवंताचे होण्यात आहे .

# मुंबईत अग्निशमन दलाची अजब भरती; सुशिक्षित बेरोजगार युवकांना अपंग करती ?

## जीवघेण्या अघोरी कवायतींमुळे सुशिक्षित बेरोजगारांच्या पायावर झाल्या शस्त्रक्रिया

आधुनिक केसरी न्यूज

**परभणी : महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने मुंबई महानगर पालिका अग्निशमन दलाच्या ९१० जागांच्या भरती करीता भरतीची प्रक्रिया दि.१३ जानेवारी ते ३० जानेवारी २०२३ पासून लोकनेते गोपीनाथ मुंडे शक्ती मैदान, जे.बी.सी.एन. शाळेच्या बाजूला विनी गार्डन सोसायटी समोर बजलेश्वर, दहिसर पश्चिम मुंबई ४००१०३,येथे दहावी-बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्षात चाचणी प्रक्रिया चालू झाली आहे.**





या अग्निशमन दलाच्या भरतीसाठी परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर जिल्ह्यासह महाराष्ट्र राज्यातील सर्वच ठिकाणाहून सुशिक्षित बेरोजगार पात्र विद्यार्थी मुंबई येथे गेले असता परभणी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना भरतीच्या वेळी शारीरिक कवायती शारीरिक चाचणी प्रक्रिया स्टेप पार पाडताना एका जीवघेण्या अघोरी कवायत चाचणीचा जिवघेणा अनूभव येवून या चाचणीतील १९ ते २० फुट उंचावरुन खाली जमिनीवर जंपिंग उड्या तेथील भरती कमिटीच्या कर्मचाऱ्यांनी मारायला लावल्या. यावेळी उंचावरुन ज्या ठिकाणी जमीन ग्राऊंडवर उडी पडणार आहे. त्या ठिकाणी कठीण गाद्या ठेवल्या होत्या. आणि त्या गादीवरती काही कर्मचारी नेट जाळी धरुन होते. जेणेकरुन उडी जमीनीवर पडण्याच्या स्थितीत येताच ही जाळी ताणून धरायची असते.काही जणांना ही जाळी ताणून धरल्या गेली तर काही जणांना ती धरली नसल्याने असंख्य भरती उमेदवार उडी मारताच कठीण गादीवर पाय आदळून पडले. यात असंख्य जणांच्या कंबरा व दोन्ही पाय कचका खावून मोडून फॅक्चर झाल्या.हा प्रकार भरतीवेळी तारीख २१ जानेवारी २०२३ रोजी सकाळी ८ नंतर झाला. भरतीसाठी आलेल्या विद्यार्थी उमेदवारांची चेष्टा केल्याप्रमाणे त्यांच्या शारीरिक जिवीताच्या हानीचा खेळखेळल्याने भरतीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना कायमचे अपंगत्व निर्माण केल्या गेले. तर काही उमेदवार जंपिंग उडी मारत असताना ओळखीचे असल्यागत पार्सलिटी करीत जाळी ताणून धरत होते. अशांना कोणतीही शारीरिक ईजा झाली नाही. ज्या उमेदवारांचे पाय फॅक्चर झाले त्यांच्यावर पायातील हाडावर शस्त्रक्रिया करण्याची वेळ येवून या अग्निशमन दलाच्या भरतीमुळे जिवीताची मोठी हानी झाली आहे.अगोदरच लोकसंख्या वाढीमुळे कोणत्याही शासकीय नौकर भरतीसाठी कमालीची स्पर्धा निर्माण झाल्याने नौक-या मिळणे कठीण झाले असताना त्यातच अशा अघोरी कृत्यामुळे जाणिवपूर्वक भरतीपासून वंचित ठेवून आपल्या मर्जीतील काही जणांना मात्र साथ मिळाली असल्याचे भरतीसाठी गेलेले विद्यार्थी उमेदवार बोलून दाखवत आहेत.ज्या विद्यार्थी उमेदवार अग्निशमन दलाच्या भरती दरम्यान जंपिंग उडी मारुन पाय फॅक्चर झालेत. अशा उमेदवारांना त्यांच्या जिवीताची जी हानी झाली त्याची शासनाने नुकसान भरपाई देवून त्यांना इतर खात्यात शासकीय सेवेत सामावून घ्यावे. असी मागणी अग्निशमन दलाच्या भरतीवेळी जंपिंग उडीत पायास दुखापत झालेल्या सबंधित विद्यार्थी उमेदवाराकडून केली जात आहे.

मी आणि आमच्या गावचे काही दहावी बारावी पास शिकलेले उमेदवार अग्निशमन दलाच्या भरतीसाठी मुंबई येथे गेलो होतो . तेथे तारीख २१ जानेवारी २०२३ रोजी सकाळी भरती ग्राऊंडवर पोहचल्यावर आमची सर्व शैक्षणिक कागदपत्रे व ईतर पात्र बाबी तपासून भरतीकामी सुरुवात केली .भरतीसाठी योग्य असलेल्या काही चाचण्या घेण्यात आल्या . शेवटी १९ ते २० फुट उंचीवरुन जंपिंग उडी मारायला लावली . त्यावेळी उडी मारल्यानंतर खाली जमीनीवर ठेवलेल्या कडक गादीवर मी पाय आदळून पडलो .माझ्या पायास जबर आतून आदळून मुकामार लागला एक पाय तर घोट्याजवळ हाड मोडून फॅक्चर झाला .असे प्रकार तेथे अनेकांना झाल्याचे पहावयास मिळाले . तेथे जंपिंग उडीत मार लागलेल्यांच्या अंबूलंसच भरुन जात होत्या . केवळ तात्पुरते पेन क्लियर औषध देवून .भरती ग्राऊंडवरुन अपात्र झाल्या म्हणून काढून देत होते .त्यामुळे या पाय व कंबर मोडीच्या दुखापती होत असल्यामुळे बरेचजण भरती सोडून निघून गेले . माझा पाय फॅक्चर झाल्याने मुंबई येथून नांदेड ला मला एका खासगी दवाखान्यात भरती करण्यात आले .माझ्या पायावर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे .मी मोठ्या आशेने अग्निशमन दलाच्या भरतीसाठी गेलो होतो .मी अतिशय गरीब कुटुंबातील व अत्यल्प भुधारक शेतक-याचा मुलगा असल्याने मला शासकीय नौकरीची गरज होती .परंतु जंपिंग उडीत माझ्या पायाला गंभीर दुखापत झाल्याने मी भरतीपासून वंचित राहील्याने माझे आयुष्य खराब झाले आहे . महाराष्ट्र राज्याचे सुजाण आणि गोरगरिबांचे कैवारी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी मला अन्य कोणत्याही खात्यात शासकीय सेवेत सामावून घेणे आवश्यक आहे .

## अमृता फडणवीसांबाबत आक्षेपार्ह टिप्पणी करणारा हद्दपार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी केलेल्या विधानावरून समाजमाध्यमात अश्लील टिपणी करणाऱ्यांवर थेट जिल्ह्यातून हद्दपार करण्याची  कारवाई करण्यात आली आहे. हद्दपार झालेल्याने नगरसेविका असलेल्या पत्नीसोबत राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत काही दिवसांपूर्वीच भाजपात प्रवेश केला होता. गोंडपिपरी येथील खेमदेव गरपल्लीवार हे गेल्या अनेक वर्षापासून राजकारणात आहेत. ते गोंडपिपरीच्या ग्रामपंचायतचे सदस्य होते. सध्या त्यांच्या पत्नी शारदा गरपल्लीवार गोंडपिपरीच्या नगरसेविका आहेत. त्या अपक्ष म्हणून निवडून आल्या. यानंतर गरपल्लीवार दाम्पत्याने आमदार सुभाष धोटे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमध्ये प्रवेश केला व सत्तास्थापनेला पाठिंबा दिला.

यादरम्यान अमृता फडणवीस यांनी वेशाव्यवसायाबाबत एक विधान केले होते. त्यांच्या मुद्यावरून खेमदेव गरपल्लीवार यांनी अमृता फडणवीस यांच्याविरोधात समाजमाध्यमातून अश्लील टिपणी केली होती. भाजपने त्यावेळी याविरोधात पोलीस तक्रारही केली होती.

## दिव्यशक्ती आणि भुतंही असतात : दीदी कृष्णा कुमारी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** उपराजधानीत बागेश्वर धामचे धीरेंद्रकृष्ण महाराज यांच्या दिव्यशक्ती दरबारात केल्या गेलेल्या विविध चमत्कार व दाव्याचा वाद सध्या कायम आहे. त्यातच साधु वासवानी मिशन कार्यकारी अध्यक्षा दीदी कृष्णा कुमारी यांनी दिव्यशक्ती आणि भूतही असतात असा दावा नागपुरात केला आहे.

प्रेस क्लबमध्ये शनिवारी साधु वासवानी सत्संग सेंटर, नागपूरच्या वतीने २९ जानेवारीला सायंकाळी ६.१५ वाजता आयोजित सत्संग कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी झालेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. थीरेंद्र कृष्ण महाराजांबाबत विचारलेल्या प्रश्नावर दीदी कृष्णा कुमारी म्हणाल्या, वेगवेगळ्या पद्धतीचे चमत्कार होऊ शकतात. चांगल्या कर्मातून जीवनही बदलू शकते. जगात दिव्यशक्ती, आत्मा व भूतही असतात. एखाद्याची इच्छा गरज पूर्ण झाली नसल्यास हा प्रकार घडतो. धीरेंद्रकृष्ण महाराजांबाबत मी जास्त एकले वा वाचले नाही. त्यामुळे त्यांच्या दाव्याबाबत माहिती नसल्याचेही दीदी कृष्णा कुमारी यांनी सांगितले.

## 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रम म्हणजे सक्षम युवा पिढीची पायाभरणी : आ. समाधान अवताडे

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** भारत देशाचे यशस्वी पंतप्रधान ना.नरेंद्र जी मोदी यांच्या गतिमान नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेला परीक्षा पे चर्चा हा कार्यक्रम म्हणजे सक्षम व मजबूत युवा पिढीची पायाभरणी असल्याचे मत पंढरपूर मंगळवेढा विधानसभा कार्यक्षेत्राचे आमदार समाधान आवताडे यांनी व्यक्त केली आहे. सदर शालेय उपक्रमाच्या अनुषंगाने शालेय विदयार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धांचे बक्षीस वितरण आमदार अवताडे यांच्या अध्यक्षतेखाली सिंहगड कॉलेज कोर्टी येथे संपन्न झाले. त्यावेळी आ. आवताडे हे बोलत होते. सदर स्पर्धेमध्ये यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पंढरपूर - मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या स्वखर्चातील अर्थिक स्वरूपात भरघोस बक्षिसे वितरीत करून कौतुक सोहळा संपन्न झाला. पुनम अनिल रुपनर प्रथम क्रमांक - १५००० हजार रुपये, कु. वैष्णवी सिद्धेश्वर लेंगरे द्वितीय क्रमांक - १०००० हजार रुपये,कु. राजनंदिनी संभाजी फाटे तृतीय क्रमांक - ५००० हजार रुपये, १० स्पर्धक विद्यार्थ्यांना एक्सलंट वॉरियर्स म्हणून प्रत्येकी २००० हजार रुपये प्रमाणे २०००० हजार रुपये, तसेच २५ स्पर्धक विद्यार्थ्यांना सुपर वॉरियर्स म्हणून प्रत्येकी १००० प्रमाणे २५००० हजार रुपये अशी उत्तेजनार्थ बक्षीसे देऊन अभिनंदन पर सत्कार करण्यात आला. स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून प्राविण्यप्राप्त शाळांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. आ. आवताडे म्हणाले की, सर्वच सहभागी विद्यार्थ्यांनी अचूक कुंचल्यातून रेखाटन केलेल्या नेत्रदिपक चित्रांचे आणि कलेच्या समर्पक भाव निरागस कौशल्यांचे मला कौतुक आणि त्यांच्या कलेचा अभिमान आहे. बक्षीस वितरण करून आमदारांनी यशवंतांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली. शालेय पातळीवर व कॉलेज जीवनामध्ये अनेक विद्यार्थ्यांच्या गुणांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी देशाचे पंतप्रधान ना.नरेंद्र मोदी हे नेहमी विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपली कला कौशल्य दाखविण्यास प्रोत्साहन देत असतात. देशाच्या पंतप्रधानाच्या कार्याचा हाच आदर्श समोर ठेवून आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर व मंगळवेढा दोन्ही तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांना रोख रक्कमेच्या स्वरूपामध्ये बक्षीस देऊन त्यांना गौरविण्यात आले. यावेळी शशिकांत नाना चव्हाण,गादेगाव चे सरपंच मोहन आप्पा बागल श्री शांतिनाथ बागल द्रोणाचार्य हाके कोर्टी चे उपसरपंच महेश येडगे,गटनेते समाधान घायाळ श्री भैय्यासाहेब कळसे, भास्कर घायाळ ज्येष्ठ पत्रकार आमिन शेख, श्री देवा अंकुशराव, श्री दत्ता कोळेकर श्री आयुब शेख,गटशिक्षणाधिकारी महारुद्र नाळे, शिक्षण विस्तार अधिकारी मारुती निगडे, शिक्षण विस्तार अधिकारी सौ बेबीनंदा पवार, केंद्रप्रमुख चंद्रकांत खुळे, केंद्रप्रमुख अण्णासाहेब पवार, उपशिक्षक शरदचंद्र चटे व भाजपा विविध पदाधिकारी, उपस्थित होते. उपशिक्षक शरदचंद्र चटे यांनी सूत्रसंचालन करून केले.






नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर
घर संसार



सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181

वितरण स्थिती 9021395308 9657398232

घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# पक्षीय राजकारण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**समाजकल्याणाचे काही निश्चित सूत्र असते का? किंवा अमुक गोष्टींच्या स्वीकाराने अथवा विशिष्ट भाग त्यागल्याने मानवी कल्याण साधता येते, असे स्पष्टपणे आपण म्हणू शकतो का? हा खरेच संशोधनाचा भाग आहे. व्यक्तिगत कल्याण ही वेगळी गोष्ट आणि समूह, समाज विकास निराळी बाब. राष्ट्राचा विचार करताना किंवा मोठ्या भागाचा विचार करताना त्यातील घटकांचा विचार आपण करतो का? खरेतर तो होणे अपेक्षित आहे. तसा तो होत नसावा म्हणून लोकशाहीत पक्षीय राजकारणाचे महत्त्व आहे. पक्षविरहित राजकारण अल्पकालीन दिवास्वप्न पाहण्याचा प्रकार ठरतो तो यामुळेच.**

पक्षीय राजकारणात सर्वांना सोबत घेऊन चालणे गरजेचे असते. आपल्या पक्षाची ध्येय धोरणे समाजविकास विषयक ठरवताना त्यात केवळ आपल्या पक्षाशी निष्ठा असणाऱ्यांचे कल्याण आणि इतरांचा त्याग असे आपण म्हणू शकत नाही. परंतु काही राजकीय लोकांच्या तोंडी आमच्या पक्षाला मतदान केल्यासच आपले काम करण्यास आम्ही बांधील आहोत अन्यतः तुमचे तुम्ही बघा, अशी वाक्ये येतात तेव्हा आमच्या राजकारणाची दिशा स्पष्ट होते. प्लेटोच्या आदर्श राज्यातील राजकारणी थोडावेळ बाजूला ठेवला तरी पक्षीय राजकारणाने ज्या संस्थांची निर्मिती झाली आहे. त्या उत्तम रीतीने चालवून विकास साधने अपेक्षित असते. या संदर्भात मॉंटेस्क्यू म्हणतात, समाज जेव्हा प्रथम निर्माण होतो तेव्हा समाजाचे अग्रणी प्रजासत्ताकाच्या संस्था निर्माण करतात, मागाहून संस्था अग्रणी निर्माण करतात. आज भारतीय राजकारणात अशा अग्रणी लोकांची निर्मिती जास्तीत जास्त व्हावी यासाठी चळवळ राबवली गेली पाहिजे.

कारण लोकशाहीमध्ये पक्षीय राजकारण विरहित समाज बदल अशक्यप्राय गोष्ट आहे. आजही लोकशाही स्वीकारानंतर इतक्या वर्षात आम्ही राजकारण म्हणजे जणू काही त्याज्य गोष्ट असल्यासारखे आपण फटकून वागतो. ही गोष्ट म्हणजे आमच्यात आणखी लोकशाही मूल्ये भिनली नसल्याचे द्योतक म्हणावे लागेल. समाजकल्याण करायचे म्हणजे नवीन पक्ष किंवा संघटना काढलीच पाहिजे असे नव्हे. २०१९ च्या आकडेवारीनुसार भारतात एकूण २३३४ राजकीय पक्ष कार्यरत आहेत. त्यापैकी ०८ राष्ट्रीय, २६ राज्यस्तरीय आणि २३०१ पक्ष नोंदणीकृत आहेत. या सर्व पक्षीय गदारोळात आणखी भर घालण्यापेक्षा आपल्या विचारांशी समांतर असणाऱ्या पक्षात तुम्ही काम करू शकता. खरेतर आपल्याकडे एवढ्या राजकीय पक्षांची गरज आहे का? हा चर्चेचा विषय झाला पाहिजे. केवळ राजकीय पक्षांचीच रेलचेल आपल्याकडे आहे असे नाही तर सामाजिक संघटनेच्या बाबतीतही आम्ही फार पुढे आहोत. सबंध भारतात परिवर्तनाच्या २९ लाख सामाजिक संघटना अस्तित्वात आहेत. जे काही करायचे ते अति करायचे हे आमचे वैशिष्ट्य ठरू पाहते आहे का? असा प्रश्न पडावा अशी अवस्था. आपल्यापुढे संस्था निर्मितीचा प्रश्नच नाही तर सामुदायिक नवचेतना निर्माण करून नवा भारत घडविण्याचा आणि मतभेदाचे मुद्दे बाजूला सारून सर्वजण एक होण्याचा प्रश्न आपल्यासमोर आहे. राजकारण हे चांगल्या लोकांचे क्षेत्र नव्हे, ही आपली धारणा वाईट लोकांसाठी उपकारकच ठरते. सज्जनांनी आळंदी- पंढरपूरला जावे, विद्वानांनी आपल्या विचारांचे इमले बांधत कुलूपबंद खोलीत कोंडून घ्यावे आणि उर्वरितानी दूर्लक्ष करावे, मग राजकारण- तुमच्या शब्दात बदमाशांनी केले तर बिघडले कोठे? राजकारण हे पवित्र क्षेत्र आहे. याच राजकीय व्यासपीठाचा वापर करून समाजसेवकांनी राजकारण केल्याचा इतिहास आपणास माहित आहे. पाश्चात्य राष्ट्रासारखे आपल्याकडे द्विपक्षीय पद्धत नाही, आणि एका अर्थाने ते चांगलेही आहे. कारण असंख्य विचारधारा विशिष्ट विचारसरणीत कोंबणे अशक्य झाले असते. याची जाणीव संविधानकर्त्यांना होती. म्हणूनच की काय संविधानामध्ये राजकीय पक्ष निर्मिती कशी करावी याबद्दल मार्गदर्शन आलेले नाही. जे चांगले काम करतील, सामाजिक करारास बाधा पोहचवणार नाहीत, अशा मंडळींना लोक पुन्हा निवडून देतील. अन्यतः त्यांना पायउतार व्हावे लागेल. मुळात आपण समाज म्हणून प्रथमतः एक झुंड आहोत. लोकशाहीमध्ये या झुंडीचाच राजकीय समाज म्हणून आपला उदय झाला. या राजकीय समाजाचे काही करारमदार आहेत. जर हे करार




राजकीय पक्ष पाळणार नसतील आणि फक्त समाजानेच ते पाळावे, अशी अपेक्षा धरत असतील तर हा कायदेभंग आहे. आज आपण अनेक भागात विभागले गेलो, असे आपणांस वाटत असले तरी आपण एक समाज आहोत, याचे भान प्रत्येकाने राखले पाहिजे. कार्य सुकरतेसाठी आपल्यात प्रकार पडणे म्हणजे कोणी कोणापेक्षा वेगळे होत नाही. आमची एकसंघता हेच आमचे सार्वभौमत्व होय, हा संदेश जेव्हा आपल्या गळी उतरेल तो सुदिन ठरेल. नाहीतर असेच एकटे पडत गेलो तर आपली शिकार ठरलेली आहे. अगोदरच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आपण काय भूमिका घ्यावी, हे राजकीय पक्षांना समजत नाही, अशात आपले एकसंघ नसणे म्हणजे स्वतःच्या पायावर स्वतःच धोंडा मारणे होय. कारण आपल्या एकत्र येण्यातून आपण सार्वभौम आहोत, त्याच्या बाहेर आपली किंमत शून्यच नव्हे तर अस्तित्वहीन आहोत. आपले अस्तित्व आणि अस्मिता या सामुदायिक चेतनेचा भाग आहेत. पक्षीय राजकारणाने यास समजून घेतले पाहिजे. विशिष्टास झुकते माप किंवा विशिष्टांचा द्वेष त्यामुळेच त्याज्य ठरतो. समाजाचे सर्वसाधारण हित हेच सर्वांना न्याय देणारे, राष्ट्र उभारणीत सर्वांना सोबत घेणारे आणि अन्याय विरहित ठरणारे असते. राजकीय पक्ष जेव्हा विशिष्ट समूह किंवा लोकांबद्दल बोलतात तेव्हा ते सांप्रदायिक कार्य करू लागले आहेत, त्यांच्यात आणि संप्रदायामध्ये काहीच फरक नाही, असे समजावे. यात आणखी एक भाग महत्त्वाचा आहे. वैयक्तिक परावलंबित्वातून सामूहिक स्वातंत्र्याचा उदय झाला असल्यामुळे पक्षीय राजकारणात पुन्हा वैयक्तिक स्वार्थपरायणता आणल्यास समूहास बाधा पोहचते, हे लक्षात घेऊन पक्षीय राजकारण करणे देशासाठी हितकारक ठरेल. आज नेमके उलट वर्तन होताना सर्वत्र दिसत आहे. अगदी गल्लीतील राजकारणापासून ते राष्ट्रीय राजकारणापर्यंत माजलेली बजबजपुरी सामान्यांस नकोशी झाली आहे. विकासात्मक प्रक्रियेत राजकीय पक्षांची भूमिका काहीही असली तरी राष्ट्र सर्वोतोपरी मानून राजकारण केल्यास जनता आपल्याला डोक्यावरच घेईल, यात शंका नाही.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# जे देती ज्ञान, त्यांचेच संविधानाविषयी अज्ञान



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**शिक्षकांना समाजामध्ये खुप आदरांचे स्थान आहे. एक ज्ञानी, गुणी आणि निरपेक्ष व्यक्ती म्हणून त्यांच्या कडे पाहिले जाते. परंतू काल प्रजासत्ताक दिनांचे लेख वेगवेगळ्या वृत्तपत्रांमध्ये वाचले. ज्यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त लेख लिहून संविधानाचे महत्त्व सांगितले त्यांना अगोदर वंदन. परंतु वेगवेगळ्या वर्तमानपत्रामध्ये वेगवेगळ्या प्राध्यापक, शिक्षक, प्राचार्य यांचे प्रजासत्ताक दिनानिमित्त लेख वाचले. मनाला दू:ख झाले, बुद्धीची किव आली आणि जाणीव पुर्वक संविधानाची चुकिची मांडणी तर होत नाही ना म्हणून खंतही वाटली. सर्व सामान्य व्यक्तींने लिहले असते तर अज्ञान समजून दुर्लक्ष केले असते.**

परंतु स्वतः ला प्राध्यापक, डॉक्टर समजणाऱ्या आणि लाखों रुपयांचा पगार घेऊन चुकिच्या पद्धतीने प्रजासत्ताक दिनांची मांडणी करणाऱ्या लोकांना जर संविधानाची माहिती आणि जाणीव नसेल तर काय करावे. जाणीव पुर्वक संविधान आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव टाळायचे याला द्वेष नाही तर काय म्हणावे. प्रजासत्ताक दिन साजरा करताना भारतीय संविधान आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना डावलून वा त्यांचा उच्चार दुर्लक्षित करून नेमके साध्य काय करायचे आहे. फक्त लिहण्यामधुन प्रसिद्धी मिळवणे हाच त्यांचा उद्देश दिसून येतो. संविधाना विषयी ज्ञान आणि जाणिव नसणाऱ्या लोकांनी लिहून आपापली बुद्धीमत्ता दाखवून दिली. प्रजासत्ताक दिन साजरा करताना अनेक लोकांनी सोईस्कर पणे संविधान व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव टाळून प्रजासत्ताक दिन साजरा कसा केला जातो यावर लिहले, काही काही लोकांनी तर प्रजासत्ताक दिनी नागरिकांनी जबाबदार नागरिक व राष्ट्रप्रेमी बनण्याचे सल्ले देऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानाचे नाव सोईस्कर टाळले.

अनेक शाळा महाविद्यालयात मध्ये प्रजासत्ताक दिन साजरा करताना जाणीव पुर्वक प्रश्न उपस्थित राहून नागरिकांच्या प्रतिक्रिया याव्या आणि त्या प्रतिक्रियांचा चुकिच्या पद्धतीचे अर्थ काढून कार्यक्रमाचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न केला गेला. आजही भारतीय संविधाना विषयी अज्ञान, द्वेष किती आहे हे दिसून येते. आपण विषमता नष्ट झाली असे मानतो परंतु संविधानामुळे अनेक लोक नोकरी करत आहेत आणि त्यांनाच जर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान, त्याचे महत्त्व, संविधानाचे हक्क अधिकार आणि संविधानामुळे लोकशाही कशी समाजात पेरली जाऊ शकते ह्यावर भाष्य करण्याची लाज वाटते अशा लोकांच्या बुद्धीची किव येते. संविधानाला व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला डावलून राष्ट्रप्रेम दाखवणाऱ्यांचे राष्ट्रप्रेम बेगडी व फक्त प्रसिद्धी साठी होते याची जाणीव झाली. भारतीय लोकशाही व भारतीय संविधान निर्माण करण्याचे एकमेव श्रेय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनाच जाते. परंतु शाळा महाविद्यालयात आणि इतर ठिकाणी प्रजासत्ताक दिन साजरा करताना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल गौरवगीत, संविधानाविषयी गौरवगीत न लावता वेगळेच काही केले. काही ठिकाणी अपवादात्मक शहिदांचे नाव घेण्यात आले, जे शहिद झाले त्यांना वंदन आहेच त्यामध्ये दुमत नाही परंतु प्रजासत्ताक दिन साजरा करताना शहिदांचे नाव घेतले जाते आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयघोषासाठी दुय्यम वागणूक दिली जाते अस का? बर शिक्षकी पेशाला हे शोभणारे आहे का? संविधानाची अंमलबजावणी झालेल्या दिवशी संविधान व संविधान निर्माते यांच्या वर सखोल चर्चा होण्याऐवजी प्रजासत्ताक दिनाचा संबंध थेट स्वांतत्र्य लढ्याशी जोडून समाजात अज्ञान पोहचवण्याचे काम केले गेले. बरं अज्ञान किंवा अपुरी माहिती असेल तर फक्त प्रसिद्धी साठी लिहून आपल्या आज्ञानाचे प्रदर्शन करून
काय फायदा.

बऱ्याच लोकांचे लेख सारखेच होते. वाचुन विचार केला सर्वांच्या लेखाची सुरवात सारखीच कशी? नक्की या मागे काही कारण असेल. कारण शोधले तर गुगल वरुन माहिती उचलली आणि शब्दाची फेरफार करून आपल्या लेखात आणि भाषणात मांडले गेले. काहीच्या मते तर दोन शब्दात प्रजासत्ताक दिवस होता. तो म्हणजे १५ ऑगस्ट ला स्वातंत्र्य मिळाले आणि २६ जानेवारी ला प्रजेचे राज्य सुरू झाले. एका विद्वान महाषयांनी तर लोकशाही चे चार खांब सांगताना एक खांब राष्ट्रपती ला बनवले. लाखों रुपयांचे पगार घेऊन शंभर दोनशे रुपयांचे बदाम खाल्ले असते तर जास्त अक्कल आली असती. शिक्षकी पेशातील लोकांना जर संविधानाची जाणीव नसेल तर ते विद्यार्थ्यांना काय शिकवणार? आणि जाणिव पुर्वक जर संविधानाचे ज्ञान च घेतले तर तो देशद्रोही नाही का? भारतीय संविधान सांगताना जे लोक स्वातंत्र्य लढ्यात शहीद झाले नाही अशा लोकांचा आणि प्रजासत्ताक दिनांचा काय संबध? प्रजासत्ताक दिनी संबध आहे तो डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा परंतु त्यांच्या नावाऐवजी दुसऱ्याचे नाव घेऊन आपल्या मनातील द्वेषाची भावना दाखवून द्यायची यालाच शिक्षक म्हणायचे का? संविधानाने दिलेल्या हक्क अधिकार यावर सखोल असे वक्तव्य, लिखाण टाळून प्रजासत्ताक दिन चिरायू होवो म्हणणाऱ्या लोकांच्या बुद्धीची किव येते. एका महाषयांनी या प्रजासत्ताक दिनी महिलांचे वर्चस्व असेल तर लिहले परंतु महिलांच्या उत्थानासाठी संविधानाची भुमिका काय आहे. महिला आपले वर्चस्व कशाला मुळे गाजवू शकतात हे सोयीस्कर पणे सांगणे टाळले आणि डोक्यातील विषमता दाखवून दिली. महिलांना नी सुद्धा प्रजासत्ताक दिनानिमित्त लिहले. त्यांनी सुद्धां लिहताना गुगलचाच आधार घेऊन संविधानाचा संबध स्वातंत्र्य लढ्याशी जोडला परंतु डॉक्टर, प्राध्यापीका, शिक्षीका असलेल्या कोणत्याही स्त्रिने साधा उच्चारही केला नाही मी नोकरी करू शकते, मी लिहु शकते ते फक्त संविधानामुळे. सत्य बोलणे टाळून आणि संविधानाचा फायदा मला कसा झाला कोणते हक्क अधिकार मिळाले, कोणते हक्क अधिकार नव्हते, ते मिळाल्यानंतर समाजात काय परिवर्तन झाले यावर मात्र कोणीच बोलताना लिहताना दिसले नाही. कित्येक शिक्षक, प्राध्यापक यांना देशाच्या ध्वजाचे शासकीय नाव माहिती नाही. ध्वजाचा चुकिचा उच्चार करून ध्वजाचा व संविधानाचा अवमान केला जातो. तरी ते स्वतः ला धन्य समजतात. सत्तर वर्षे होऊन ही, संविधानामुळे गाडी बंगले बांधुनही जर प्रजासत्ताक दिनी संविधानाचे आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे धन्यवाद मानायची हिंम्मत होत नसेल तर खरचं त्यांना प्रामाणिक म्हणायचे का? आणि दुसऱ्याला ज्ञान सांगणारे जर संविधाना विषयी अज्ञानी असतील तर फक्त पगार मिळतो म्हणून पुस्तक वाचून दाखवतो असा कार्यक्रम तर नाही ना. इतर कार्यक्रमांमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतले जात नाही आणि ते घेऊही नाही. ज्यांचे जे श्रेय आहे, जेथे ज्यांचे महत्त्व आहे, जेथे योग्य उदाहरण आहेत तेच द्यायला पाहिजे. परंतु इतर वेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव न घेणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव जेव्हा घ्यावेच लागते तेव्हाही घेत नसतील तर याला द्वेष नाही तर काय म्हणावे. सत्तर वर्षे होऊन ही स्वातंत्र्य दिनी जे नारे दिले जातात तेच नारे प्रजासत्ताक दिनी दिले जातात. सत्तर वर्षामध्ये भारतीय संविधान आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर नविन नारे जर शिक्षक लोक देत नसतील, प्रजासत्ताक दिनांचे महत्व समजून सांगत नसतील तर प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात काय अर्थ आहे. जे स्वातंत्र्य दिनी बोलले लिहले जाते तेच जर प्रजासत्ताक दिनी बोलले लिहले जात असेल तर दोन्ही मध्ये काय फरक आहे? यांची उत्तर शिक्षण प्राध्यापक लोकांकडे आहेत? संविधानामुळे मोठमोठे पगार घेताना आनंद वाटणाऱ्यांना संविधानावर बोलताना मात्र दुःख वा संकोच निर्माण होतो खरचं असे लोक एक आदर्श पिढी घडवू शकतात? संविधाना विषयी अज्ञान असते तर संविधान वाचून ते दुर केले असते परंतु विषय इथेच थांबत नाही कारण हे अज्ञान नाही तर संविधान घेऊन त्यावर सत्य बोलण्याची बऱ्याच लोकांची नियतच नाही. मोठमोठे पगार घेऊन, मोठमोठ्या घरात राहुन ज्ञान येत नाही. परंतु ज्ञान येण्यासाठी प्रयत्न न करणाऱ्या लोकांना विद्वान म्हणावे? शिक्षकांनी खरचं प्रामाणिक पणे वर्षातुन फक्त एकदाच प्रजासत्ताक दिनीच प्रामाणिक पणे संविधानावर भाष्य केले असते तर संविधान घराघरात पोहचले असते. पण शोकांतिका शिक्षक प्राध्यापक यांच्याच घरात संविधान नाही आणि हे संविधानावर प्रसिद्धी मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत. शिक्षक हा समाज घडवणारा मुख्य घटक असतो तोच जर संविधान आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेण्यास टाळाटाळ करत असेल त्याची विद्वता, त्याचे ज्ञान काहीच कामाचे नाही. शिक्षकांनाच प्रजासत्ताक चे महत्त्व नाही, जानीव नाही, तर ते मुलांच्या मनामध्ये काय रूजवणार, फक्त शहिदांचे गाणे वाजवून राष्ट्रप्रेम दाखवता येत नाही तर कर्तव्य आणि जबाबदारी शी माणूस प्रामाणिक पाहिजे. जे शिक्षक विद्यार्थ्यांना शाळेत आणि समाजाला समाजात जाऊन संविधान व संविधानामुळे झालेले परिवर्तन आणि संविधानाचे भारतीय नागरिकांच्या जिवनातील स्थान यावर जनजागृती करतात त्या निस्वार्थ, निरपेक्ष आणि विद्वान शिक्षकांना वंदन. परंतु ज्यांना अजूनही संविधानाची माहिती नाही त्यांनी माहिती करून घ्यावी. समाजामध्ये संविधानाची निरपेक्ष पेरणी करावी, कारण शिक्षकाने भेदभाव करणे किंवा अज्ञानी असणे दोन्ही ही गोष्टी समाजासाठी घातकच आहेत. शिक्षकांचे सामाजिक जिवन समजासाठी खुप मौल्यवान आहे म्हणून अजूनही वेळ गेलेली नाही. शिक्षकांनी प्राध्यापकांनी संविधान साक्षर होण्याची गरज आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वाहतूक खर्चाच्या बचतीला हवे प्राधान्य



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**वास्तविक कोणतीही अर्थव्यवस्था वाढीला लागते तेव्हा त्यामध्ये गुंतवणूक व ऊर्जा क्षेत्राचे जसे महत्त्व असते तितकेच महत्त्व वाहतुकीचे असते. वाहतूक क्षेत्राचे जाळे म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या रक्तवाहिन्यांचे जाळे असते. हे जाळे जेवढे मोठे व सशक्त तेवढी वाहतूक सुकर! भारतीय अर्थव्यवस्था पुढील 15 वर्षांत जर 8 ते 9 टक्के दराने वाढणार असेल तर त्याचा अर्थ त्यापेक्षा जास्त दराने व्यापाराची वृद्धी होण्याची गरज आहे. व्यापाराची वृद्धी याचाच अर्थ देशांतर्गत व आयात-निर्यातीसाठी मालाची अधिक ने-आण म्हणजेच ती ने-आण करणारी वाहतुकीची साधने व त्यांचे जाळे व या सर्वाचे व्यवस्थापन यांत प्रचंड प्रमाणात वाढ होण्याची अपेक्षा आहे.**

आज वाहतूक क्षेत्र हे देशाच्या वार्षिक सकल उत्पन्नाच्या 5.5 टक्के इतके आहे तर वाहतुकीच्या अनुषंगाने होणारा एकूण खर्च हा देशाच्या वार्षिक सकल उत्पन्नाच्या 14 टक्के इतका मोठा आहे. सर्वसाधारणपणे विकसनशील देशांत हा खर्च 8 ते 9 टक्के इतका असतो. अर्थात आपल्या देशात असणाऱ्या अनास्थेमुळे व अकार्यक्षमतेमुळे हा खर्च तुलनेने खूपच जास्त आहे. येणाऱ्या काळात म्हणूनच वाहतूक व वाहतुकीचे व्यवस्थापन या क्षेत्राकडे उद्योगांनी व सरकारने अधिक आस्थेने बघणे जरुरी आहे. अन्यथा शरीरातील रक्ताभिसरणातील अडथळ्यांमुळे शरीराला जशी इजा पोहोचू शकते तशीच इजा देशाच्या वाढत्या अर्थव्यवस्थेला पोहोचू शकते. दळणवळण व्यवस्था सुस्थितीत असेल तर बऱ्याच गोष्टींची बचत होते. रस्ते चांगले असतील तर सतत प्रवास करणाऱ्या किंवा वाहतुकीसारखी कामे करणाऱ्या चालक, वाहक यांच्या तब्येतीही चांगल्या राहतात. सुस्थितीत असलेल्या रस्त्यांमुळे वाहतुकीत वेळेची बचत तर होतेच शिवाय वाहतूक खर्चातही बचत होते. देशात अजून खूप मोठ्या प्रमाणात रस्ते करण्याची गरज असून हे करताना पुढच्या 50 वर्षांचा विचार करून रस्ते बनवले पाहिजेत.रस्ता कामांमुळे रोजगार निर्मितीला मदत मिळते. सध्याचे केंद्रसरकार विशेषतः संबंधित खात्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी  तसेच राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण चांगल्या रस्त्यांची निर्मिती करायला प्राधान्य देत आहे. महाराष्ट्र राज्यात प्रामुख्याने राज्यात पाच हजार किलोमीटरचे महामार्ग



तयार करण्याचा संकल्प सार्वजनिक बांधकाम विभागाने सोडला आहे. नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाप्रमाणे नागपूर-गोवा महामार्ग उभारण्यासंदर्भात सरकारने विचारविनमय सुरू केला आहे. या माध्यमातून विदर्भ-मराठवाडा-पश्चिम महाराष्ट्र ते गोवा असा आर्थिक महामार्ग (इकॉनॉमिकल कॉरिडॉर) विकासित करण्यात येणार आहे. आगामी काळात असे महामार्गाचे जाळे देशभर विणले गेले पाहिजे. जम्मू -काश्मीर ते मुंबई अंतर 22 तासांत पार करता येईल, असे रस्ते बनवले जाणार आहेत. कमी कालावधीत अधिक अंतर पार करण्यासाठी दर्जेदार रस्त्यांची आवश्यकता आहे. तसेच उच्च व अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर, नवीन तंत्रज्ञान विकसित करणे आणि वाहतूक खर्चात बचत या विषयावर अधिक भर दिला पाहिजे.  वाहतूक आणि उत्पादन खर्चात बचत झाली तरच अनेक घटकांना याचा फायदाच होणार आहे. यामुळे कंत्राटदारांचा, उद्योजकांचा नफा वाढेल आणि ग्राहकांना स्वस्तात वस्तू उपलब्ध होतील. देशात विमानतळांची संख्या वाढत आहे. मात्र वस्तूंची देवाणघेवाण करण्यासाठी शेवटी मालवाहतूक फक्त रस्ता आणि जलमार्गाने होऊ शकते. जलमार्ग याहीपेक्षा अधिक स्वस्त पडत असले तरी हा मार्ग सर्वच ठिकाणी लागू होत नाही. रस्ते मार्गाबरोबरच आपल्या देशात  रेल्वेचे जाळे मोठे आहे. आपल्या देशात महामार्गाचे जाळेही मोठया प्रमाणात विणले जात आहे. रस्ते सुस्थितीत असतील तर विजेद्वारे मालवाहतूक किंवा सार्वजनिक वाहतूक करता येणे शक्य आहे. या स्थितीचा फायदा घेतल्यास वाहतूक खर्चात बचत करणे शक्य आहे.  अन्य देशांच्या तुलनेत भारतात वाहतूक खर्च हा 14 ते 18 टक्के आहे. आणखी एक महत्त्वाचे म्हणजे पेट्रोल-डिझेलवरचा भार कमी करून आपल्या देशात वीज, जैव इंधन, सीएनजी आणि एलएनजी गरज आहे. सुमारे अडीचशे किमी जाण्यासाठी ट्रकने सीएनजी इंधन वापरावे आणि सात-आठशे किमी दीर्घ प्रवासासाठी एलएनजीचा वापर केला जावा. यामुळे इंधनात होणाऱ्या खर्चातही बचत होईल. डिझेलच्या ट्रकचे एलएनजी इंधनावर चालणाऱ्या ट्रकमध्ये रुपांतर केले जावे. उत्पादन खर्चात, वाहतूक खर्चात, इंधन खर्चात बचत करणे शक्य व्हावे, यासाठी मोठया महामार्गाची निर्मिती राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण करीत आहे. तसेच आयातीत मालाला पर्याय निर्माण करण्यासाठी बांधकाम क्षेत्राला लागणारी उपकरणे आणि साहित्य देशात निर्माण होणे शक्य आहे. ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे असेल तर निर्यात वाढविणे शक्य होईल. आगामी काळात आयातीत मालावर अधिक आयात शुल्क लावण्याचा शासन विचार करत आहे. सीआयआयने देशातील आयआयटी व अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या सहकार्याने संशोधन व प्रशिक्षण केंद्र सुरू करावी. या प्रकल्पासाठी सीआयआयला शासन मदत करण्यास पुढे आले पाहिजे. यामुळे या क्षेत्राला कौशल्याधिष्ठित मनुष्यबळ उपलब्ध होईल आणि नवीन संशोधनातून नव्या तंत्रज्ञानाचा विकास होईल. बांधकाम-उपकरणे-साहित्य निर्मिती या क्षेत्रासाठी केंद्र महत्त्वाचे ठरणार आहे. बांधकाम क्षेत्रात महामार्ग, पूल, उड्डाणपूल, सिमेंट रस्ते बांधताना शासनाने प्रिकास्ट तंत्रज्ञान स्वीकारले आहे. या तंत्रामुळे बांधकामासाठी येणाऱ्या खर्चात 25 ते 30 टक्के बचत होते.वाहतूक उद्योगाचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व जाणून घेताना केंद्र व राज्य या दोन्ही सरकारांनी एका व्यापक धोरणाची आखणी करणे जरुरी आहे. कारखान्यातील माल थेट बाजारपेठेत किंवा बंदरात इष्टतम पद्धतीने कसा जाईल यासाठी वेगवेगळी मंत्रालये व वेगवेगळी धोरणे असण्यापेक्षा एकच वाहतूक मंत्रालय व व्यापक सर्वसमावेशक धोरण आखणे जरुरीचे आहे.

# डबल इंजिन का धमाका



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**मित्रहो, भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मागच्या वर्षी आपण देशभर अतिशय उत्साहाने साजरा केला आता पुढील वर्षी आपण प्रजासत्ताक दिनही त्याच उत्साह व जोमाने साजरा करु. देशभर साजऱ्या होणाऱ्या प्रजासत्ताक दिनानिमित्ताने सर्व ज्ञात अज्ञात क्रांती विराना नमन करुन आम जनतेसह माझ्या सर्व वाचक वर्गाला भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या 74 व्या वर्धापन दिनानिमित्ताने खुप-खुप शुभेच्छा. कदाचित सर्व वाचकांना प्रश्न पडेल की, आज कॉ. जांबकर यांची लेखणी लेखाच्या शीर्षकावर लिखाण करण्याऐवजी कुठे तरी भरकटत चाललीय की काय, पण तसे काही नाही.**

कारण आपणा सर्वांना वाचनाची व वाचनावर विचार करुन प्रामाणिकपणे आपले मत व्यक्त करण्याची संधी मिळून लेख पुर्ण वाचवा म्हणून हा थोडासा सस्पेन्स रुपी प्रयत्न म्हणावयास हरकत नसावी. ''हम होंगे कामयाब एक दिन, मन में है विश्वास'' हे माझ्या खुपच आवडीच गण. प्रामाणिक सकारात्मक विचार व प्रयत्नशिलतेला माणून आपल्या मनात ठरविलेले विचार आचरणात आणले तर नक्कीच धेय्यप्राप्ती व उद्दिष्टपूर्ती होत असते यावर माझा ठाम विश्वास आहे. 2014 पासून भारतीय राजकारणाला एक वेगळीच कलटणी मिळाली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सलग सत्तेत राहिलेल्या कॉँग्रेसची अवस्था बिकट झाली. 2019 नंतर ती अतिशय बिकट झाली भारतीय जनतेने ठरवून दिल्याप्रमाणे देशाच्या राजकारणात कमळ चांगलेच फुलले, असे का झाले व घडले त्याच्या कारण मिमंसेच्या खोलात मी जात नाही. देशाच्या राजकारणात कमळ फुलण्यामागे आम भारतीयांच्या मनात सकारात्मक व नकारात्मक विचारांचे अनेक पैलू आहेत त्यालाच एक सकारात्मक भाग म्हणून भारतवासियांनी भाजपच्या एक हाती सत्ता देवून केंद्रात सत्तेत विराजमान केले. पूर्वीच्या राज्यकर्त्याच्या चुका व जनतेच्या मनात विविध कारणास्तव खदखदत असलेला संताप हाही त्यातला एक भाग असू शकतो. याला वर्तमानातील विरोधक धर्माधिष्टित व जातीपातीचे राजकारण म्हणूनही टिका टिप्पनी करत असतात. टिका टिप्पणी जरुर असली पाहिजे पण याचा फायदा जन विकास व लोकाभिमुखतेसाठी जरुर असावा पण वर्तमानात विरोधकांचा विरोध हा जनविकासासाठी नसून गेलेली सत्ता परत मिळविण्यासाठी आहे असे जनमत दर्शविते.
सत्ता व पैसा कुणाला नको असते पण त्याचा सुविनियोग होत असेल तर त्याला कोण कसे नाकारणार. भुतकालीन सर्वच भारतीय राजकिय स्थिती परिस्थितीचे आवलोकन व विचार मंथन केल्यास




2014 च्या नंतरची भारतीय स्थिती व परिस्थितीत नक्कीच अमुलाग्र बदल झाल्याचे जाणवते. पण विरोधकांच्या मनी ते भावत नाही जनतेला मात्र नक्कीच भावल्यासारखी परिस्थिती वर्तमानात असल्यामुळे सर्वत्र भाजपवाल्यांचा बोलबाला आहे. मागच्या अडीच वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील जनतेला सेना भाजप युतीला बहुमताचा कौल दिला असताना महाराष्ट्रातील काही शकुनीच्या चालीमुळे महाविकास आघाडी जन्माला आली पण ती अतिशय अल्पायुषी ठरली. राजकारणातील काही धुरंधराच्या बुध्दीबळ चालीमुळे परत महाराष्ट्रात शिवसेना फुटुन शिंदे फडणवीस युती होवून महाराष्ट्रातील सत्तेच्या चाव्या भाजपच्या हाती आल्या. जे झाले त्याबद्दल जनतेच्या मनात फारसे औत्सुक्य नसले तरी महाराष्ट्रात स्थिर सरकार राहुन ते लोकाभिमुख व महाराष्ट्रातील तमाम जनतेच्या हिताचे असावे असा सर्वच महाराष्ट्रीयन जनतेला मनातुन वाटते. महाविकास आघाडी सरकार हे तीन पक्षाचे खिचडी सरकार असल्यामुळे व त्यांच्यात महाराष्ट्रातील जनतेप्रती व शास्वत विकासाप्रती कृतिशिलता व क्रियाशिलतेच्या अभावामुळे जनतेला फारसे भावले नसावे. नेमके अशाच परिस्थितीचा अभ्यास करुन जनतेला कसे किती व काय द्यावयाचे याचे काळजीपुर्वक भान शिंदे फडणवीस सरकारने हेरुन मुंबई महापालिकेसह 2024 च्या लोकसभा निवडणुकीत सत्ता हस्तगत करण्यासाठी किंबहुना मुंबई महापालिकेतील मागील दोन दशकापासूनची शिवसेनेच्या हाती राहिलेली सत्ता हिसकावून घेण्यासाठी माननीय भारतीय पंतप्रधानांच्या हस्ते वेगवेगळ्या प्रकल्पाच्या माध्यमातून मुंबईमध्ये आडतीस हजार कोटीच्या विकास कामाचा शुभारंभ केला. या प्रसंगी मा.पंतप्रधानांनी आपल्या भाषणात केंद्र व राज्यात भाजपचे सरकार असल्यामुळे हे साध्य होवू शकले म्हणून डबल इंजिन असा उल्लेख  केला. जाणकार व विचार विश्लेषकांच्या मते केंद्र व राज्यात एकाच पक्षाची सरकारे असल्यास राज्यातील विकासाला झुकते माप मिळून चालना मिळू शकते कदाचित हे बरोबरही असू शकते म्हणून महाराष्ट्राच्या शिंदे फडणवीस जोडीने नेमके हेच हेरुन मागील दोन दशकात मुंबई महापालिकेवर शिवसेनेची एकहाती सत्ता असताना सर्वच स्तरावर विकासाचा कसा भ्रमनिरास व कशी दानादान केली व मुंबईकरांचा विकास या नावावर स्वतःचा कसा विकास केला हे सर्वसामान्य मुंबईकरांना पटावे व कळावे म्हणून मा. पंतप्रधानांच्या हस्ते अनेक प्रकल्पाचे उद्घाटन झाले. जर राज्य व केंद्रात एकच पक्ष व एकमताचे सरकार असेल तर विकास प्रक्रिया कशा व किती प्रमाणात गतीशिलतेने पुर्ण होवू शकतात याचा सौक्ष मौक्षच लावला कुठलेही राजकिय पक्ष असोत वा नेते असोत ऐन निवडणुकीच्या तोंडावर विकास प्रक्रिया राबविण्याचा प्रयत्न करत असतात त्यात भाजपवाल्यांनी मुंबईमध्ये केले ते काही फारसे वेगळे नसावे.

आमच्या नांदेड महापालिकेत मागच्या दोन दशकापेक्षा जास्त काळ कॉँग्रेसच्या हाती एकहाती सत्ता असून देखील विकास या नावाखाली जनतेला कसे लुटले व मुर्ख बनविले याचे उत्तम उदाहरण म्हणजे शिवसेनास्थित मुंबई महापालिकेतील व नांदेड महापालिकेतील कॉँग्रेस स्थित सत्ता यात फारसा फरक वाटत नाही. अगदी जवळच्या काळातच मुंबई प्रमाणे नांदेड महापालिकेची ही निवडणूक होणार असल्यामुळे नांदेडच्या सत्ताधीश पुढाऱ्यांनी नांदेड शहर चकाचक करण्याचा घाट घातला आहे. असो वर्तमान राजकिय पुढाऱ्यात निवडणुका आल्या की विकास आठवतो येरवी चार वर्ष स्वतःचा विकास साध्य करुन जनतेला मुर्ख बनविण्यात सर्वचजन पटाईत असतात. मी वर्तमान राजकिय पुढाऱ्याच्या उण्या दुण्यात जात नाही कारण सर्वच वर्तमान राजकारणी पुढाऱ्याची जात एकच. स्टेजवर व जनतेसमोर आपआपसात नाटकी नौटंकी करायची व खाली गळ्यात गळे घालायचे हे कायम चालणार पण काहीका असेना मुंबई महापालिका व 2024 च्या सार्वत्रिक निवडणुकी निमित्ताने मुंबईकरांना 38 हजार कोटींचा नजराना देवून डबल इंजिन असलेली गाडी कितीही लोड सहन करुन लवकरात लवकर ठिकाण्यावर कशी पोहचते पंतप्रधानांसह शिंदे-फडणवीस जोडीने हे मात्र नक्की दाखविले. कदाचित नांदेड महापालिकेतही येणाऱ्या निवडणुकीमुळे डबल इंजिनचा धमाका नक्की व्हावा एवढीच जनतेकडून अपेक्षा. पुनःश्च आम जनतेसह सर्व वाचकांना भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या 74 व्या वर्धापन दिनाचा खुप-खुप शुभेच्छा.

# हे तिरंग्या, लाजू नकोस

आधुनिक केसरी

काल तिरंगा लहरवला गेला. तो लहरला. अगदी डौलात लहरला. त्यातच त्या तिरंग्याला सन्मान प्राप्त झाला. कारण त्याला लोकांनी जागोजागी लहरवला व नमन सुद्धा केलं. परंतू याबाबत एक विचार असाही करता येईल की खंरच आपला हात असलेला सन्मान पाहून खरंच तिरंगा खुश असेल काय? तर याचं उत्तर नाही असंच असेल. कारण अलीकडे हा तिरंगा काही काही ठिकाणी पापी माणसाच्या व गुंड मवालीच्या हस्ते लहरत असतो.

तिरंग्याबद्दल सांगतांना एक गोष्ट आवर्जून सांगाविशी वाटते ती अशी की आज तिरंगा गल्लीगल्लीत आणि शाळेत लहरत असतो. गल्लीचा विचार केल्यास गल्लीत जे नेते असतात, त्या नेत्यांच्या हस्ते तिरंगा लहरत असतो. मग जे कोणते नेते असतात. ते खरंच पाक असतात का? तर याचंही उत्तर नाही असंच आहे. ते नेते नापाक नसतात. काही नेते हे आपल्या गल्लीत गुंडगीरी करुन निवडून  येत असतात. त्या नेत्यांचे हात निरपराध माणसांच्या रक्तानं माखलेले असतात. काही काही शाळेत जेव्हा तिरंगा लहरतो, तेव्हा हा तिरंगा त्या त्या शाळेतील संस्थाचालक फडकवीत असतो. हा संस्थाचालकही नापाक असतो का? तर याचंही उत्तर नाही असं आहे. कारण हा संचालक आपल्या शाळेतील लोकांना पाप करायला लावतो. तो आपल्या शाळेतील लोकांना असत्य बोलायला लावतो. तो भ्रष्टाचार करतो. एवढंच नाही तर तो लोकांपासून अतोनात पैसा घेत असतो. काही काही अधिकारीही झेंडा फडकवतांना दिसले. ज्यांचे हात भ्रष्टाचारानं लिप्त होते. तसेच काही लोकं मांसभक्षण करणारेही होते. मुक्या प्राण्यांची हत्या करणारे. खरंच अशांच्या  हातानं तिरंगा लहरल्यावर त्याला  सन्मानच वाटला नसेल. अतिशय वैषम्यता वाटत असेल. महत्वाचं म्हणजे तिरंगा लहरविण्याची नियमावली असावी. अशी नियमावली  की ज्या  नियमावलीनं देशाच्या  तिरंग्यालाही सन्मानच वाटेल. त्यालाही तसं  लहरणं प्रतिष्ठेचं वाटेल. तिरंगा  त्यानं लहरवावा. जो इमानदार आहे. ज्याला देशाचं हित आहे. जो देशाचं हित जोपासतो. जो भ्रष्टाचारी  नाही. जो मांसभक्षी नाही. जो उत्पादक आहे. जो गरीब आहे, परंतू लाचार नाही. एवढंच नाही तर तिरंगा त्यानं लहरवावा की जो वायफळ बोलत नाही तर त्यातील ब-याच गोष्टी आचरणात आणतो. खरंच अशा  व्यक्तींनं तिरंगा लहरविल्यास त्यालाही लाज वाटत नाही, उलट सन्मान वाटतो. तसं पाहता त्यानं लाजू नये. आज जरी त्याला वरील प्रकारातील  लोकांनी  लहरवलं तरी. त्यानं सवय पाडून टाकावी. कारण अलीकडं इमानदाराचं जग नाही. दोनचार इमानदार जे उरले आहेत. त्याचेवरच जग आधारलेले आहे. परंतू  आज कलियुग असल्यानं तिरंग्याची आवडनिवड कोणी पाहात नाहीत. पाहतात आपला स्वार्थ. आज घराघरात स्वार्थ शिरला आहे. लोभानं चरणसीमा  गाठली आहे. देश रसातळाला जात आहे. परंतू तिरंग्याला काय करायचं एवढं. कोणीही लहरवो आणि कोणीही सन्मान  करो. देश भ्रष्टाचारानं लिप्त असल्यानं लोकांनी पर्याय काढला की अमूक अमूक माणसानंच त्याला लहरवावं. देशात त्याला लहरविण्यासाठी काही इमानदार लोकं आहेत. परंतू  त्यांना जाणूबजून पुढं आणलं जात नाही. कारण ते जर समोर आले तर भ्रष्टाचार करता येणार नाही. भ्रष्टाचाराचा बोलबाला होणार नाही. हे तेवढंच खरं आहे.

**अंकुश शिंगाडे, ९३७३३५९४५०**

# बागेश्वरीधाम महाराजांच्या 'चमत्कारा'चा डंका ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**बागेश्वरीधामचे धीरेंद्र शास्त्री यांच्या धार्मिक दरबारातील चमत्काराची चर्चा भारताच नव्हे,आता पाकिस्तानमध्ये सुरू झाली आहे.त्याच्या या चमत्काराला अंधश्रध्दा निर्मूलन समितीने आव्हान दिले आहे. यावरून समर्थक व विरोधक असे गट निर्माण झाले.यातून वाद- प्रतिवाद होत आहे. यातून सनातन धर्माला जाणीवपूर्वक बदनाम केले जात आहे,असा हिदू संत मंडळीचा आरोप आहे, मुल्ला मौलवी, पादरी शिबीर धार्मिक चमत्कार करतात, तेंव्हा आक्षेप घेतला जात नाही. जगातील सर्वच धर्म ग्रथांत रहस्यमय दृष्टांत व चमत्काराच्या कथा आहेत.मग अंधश्रध्देचा प्रकार थांबविणार तरी कसा ?**

धर्म जीवनसंस्कृती आहे.ते समाजात कसे आचारण करावे? कसे रहावे? बोलावे,तसेच नीती, सत्य, माणुसकी बंधूभावाची शिकवण देत असतात. धर्म माणसांसाठी आहे. माणूस धर्मासाठी नाही. सर्व धर्म समान आहेत, हे खूळचट समजूत आहे. पण धर्म कोट्यवधी माणसांना सुख व समाधान देत असतो. पण धर्म श्रेष्ठ कोणता? पण धर्म संघर्षातून मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी झालेली आहे.धर्म हा संवेदनशील विषय आहे. यात श्रध्दा, अस्था महत्वाची आहे,तेव्हा विचारवंतही भाष्य करणे टाळतात. भारतीय घटनेच्या कलम २५ ते २८ कलमानुसार धर्म स्वातंत्र्याचा अधिकार आहे. त्यानुसार श्रध्दा,आचरण, प्रचार व प्रचार धर्मस्वातंत्र्य आहे. दुसरीकडे घटनेने काही तरतुदीनुसार धर्म स्वातंत्र्यावर मर्यादा आहेत.यात कायदा व सुव्यवस्था, आरोग्य, नीत्तमत्ता, दुसऱ्याच्या हक्काच्या अधिकार न गदा आणता धर्माचे स्वातंत्र्य आहे. तसेच राजकीय, आर्थिक, व्यापार, वित्तीय सामाजिक सुधारणा, सामाजिक कल्याण या धर्माच्या कक्षेत येत नाहीत. धार्मिकस्थळांना देणगी घेता येते. पण व्यवस्थापन, संपत्ती, कर हे शासन कक्षेत येतात.घटनेत धर्म हा केवळ पूजा, श्रध्देपुरताच ठेवला गेला आहे. भारतात कांही जणांनी धर्माचा नावावर बाजार मांडला आहे. जर्मन लेखक मॅनफ्रेट ब्रार्टल यांचे म्हणणे, धर्माची संकल्पना समजूत न घेता, अनेकजण चमत्कारामुळे धर्माच्या मागे धावतात. चमत्कार असा शब्द आहे की,त्याची दोन गटात विभागणी होते.भारतात चमत्कार करणारे असंख्य बाबा आहेत.विदेशातही चमत्काराला मानणारे असंख्य लोक आहेत. जर्मनमध्ये २००२ मध्ये एका सर्वेक्षणानुसार ७१ टक्के लोक हे चमत्काराला मानतात. चमत्कारामुळे माणसांचे सर्व संकटे,समस्या दूर होतात, गंभीर रूग्ण बरा होतो,डोळे झाकून श्रध्दा बाळगणे, अशी लोकांची भावना आहे, यालाच अंधश्रध्दा म्हणतात. खिश्चन धर्मातही भूतबाधा काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात शिबीर घेतले जातात.त्या हात महिला हात लावताच जमिनीवर कोसळतात. येशूच्या शक्तीने भूतबाधा व अनेक असाध्य रोग दूर केले जातात.केवळ फुकणे व पाणी मारल्यामुळे कॅन्सरसारखे रूग्ण बरा होतात,असे दावा केला जातो. त्यात गरीब लोकांना पैश्याचे आमिष दाखवून धर्मात्तर केले जाते. मुल्ला-मौलवी असे प्रकार करून लोकांना फसवितात,हे सत्य आहे. भोंदू बाबामुळे पैश्याचा पाऊस पाडणे, गंभीर रूग्णांवर अघोरी उपचार करणे, संतती, संपत्ती साठी नरबळी देणे,आदी प्रकार घडत आहेत. यात महिला, बालकांची नरबळी देण्याच्या घटना घडता आहेत.महाराष्ट्रात १९७२ मध्ये मानवत या गावी नरबळची संतती, संपत्तीसाठी ११ जणांचा बळी घेणारी मोठी घटना घडली होती. राज्यातील पोलिस यंत्रणा तेथे ठाण मांडून बसली होती. अखेर यातील आरोपींना अटक झाली,यातील मुख्य दोन आरोपी सुटले, पण इतरांना मात्र फाशी झाली. तसेच काही बाबा महिलांचे शोषण, बलात्कार करतात, अश्या घटना वाढतच चालल्या आहेत. काही जण अंधश्रध्देला खतपाणी घालत असतात,ही वस्तुस्थिती आहे. अंधश्रध्दाव्दारे लोकांची फसवणूक व लुबाडणूक करणाऱ्याला लगाम घातला जावा,म्हणून महाराष्ट्रात अंधश्रध्दा निर्मूलन समितीने कायद्याची करण्याची मागणी केली. तेंव्हा त्यास विरोधही झाला होता.शेवटी २०१३ मध्ये नाव बदलून महाराष्ट्र नरबळी व अमानुष, दुष्कर्मी, काळीजादूटोणा विरोधी नावाचा कायदा आणला गेला.अशाच प्रकाराचे कायदे बिहार, झारखंड, ओरिसा छत्तीसगड, राजस्थान, आसाम, कर्नाटक राज्यात करण्यात आले आहेत. देशात १५ नोव्हेबर १८७२ मध्ये मांत्रिकांमुळे हत्या करण्याची पहिली घटना मुंबईत ग्रेटरोड येथे घडली. यावेळी बदला घेण्यासाठी 'इल्म' असे जीवे मारा, से सांगितले. 'इल्म' म्हणजे इतर पध्दतीने मारा म्हणून सूपारी दिली गेली होती.देशात हा खटला अतिशय गाजला होता, यात आरोपींना सात वर्षाची शिक्षा झाली. आज जादूटोणा विरोधी कायद्यानुसार भोंदू बाबांच्या मुसक्या आवळ्या जात आहेत. केवळ गरीब सामान्य माणसे बाबांना मानतात, असे नाही.देशात काही बाबांना व महाराजांना राजाश्रय मिळाला. अनेक राजकीय नेत्यांचे बाबा गुरू आहेत.उत्तरप्रदेश येथील देवरहा बाबांच्या भेटीला जार्ज पंचम आले होते. तसेच डॉ. राजेंद्रप्रसाद,अटलबिहारी वाजपेयी, मुलामसिंह आदी मोठे राजकीय नेते आशीर्वाद घेण्यासाठी गेले होते. तत्कालिन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचे सरकार धीरेंद्र स्वामींच्या इशाऱ्यावर चालत असे.तसेच माजी पंतप्रधान पी.व्ही नृसिंहराव यांचे सरकारात चंद्रास्वामी यांचा दबदबा होता.शेअर्स घोटाळ्याबाबत दवाब आणत असत. देशाचे तत्कालिन गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर व स्व. शंकरराव चव्हाण त्यांचे पूत्र माजी मुख्यमंत्री आशोक चव्हाण हे सत्यसाईबाबांचे भक्त आहेत. प्राख्यात क्रिकेटपटू सचिन तेंडूलकर बाबांच्या दर्शनाला गेले होते. सत्यबाबांचे चमत्कारामुळे तेंव्हाही देशात वादळ उठले होते. ते हवेत हात फिरून ठराविक भक्तांना सोन्याची अंगठी, साखळी देत असत.पण इतरांना मात्र राख मिळत असे. माजी मुख्यमंत्री आशोक चव्हाण यांनी मुंबईतील मुख्यमंत्री निवासस्थानात सत्य साईबांबाची पूजेचा कार्यक्रम घेतल्यावरुन प्रश्न उपस्थीत केला गेला होता. देशात राम रहिमबाबा, आसाराम बापू, निर्मलबाबा, राधेमां कॉंप्युटरबाबा आदी महाराज आहेत. यांचे असंख्य भक्त आहेत. काही बाबांच्या अवैध आश्रमावर बुलडोझर चालवून उध्वस्त केले गेले. तर कांही बाबा जेलची हवा खात आहेत. परवा कॉंप्युटर बाबा कॉंग्रेस नेते राजीव गांधी सोबत पदयात्रेत होते. केवळ निवडणूक काळात देवळात व बाबांचा आशीर्वादासाठी राजकीय नेते जातात. देशात माता



अमृतानंदमयी, योगगुरू बाबा रामदेव, श्री श्री रविशंकर, आसारामबापू यांची सर्वाधिक मालमत्ता संपत्ती अधिक आहे, असे सांगितले जाते. देशातील सर्वच बाबा,महाराजांना भोंदू समजणे चुकीचे आहे. यात विचारवंत, ज्ञानी, समाजसेवक, योगगुरू आहेत. संत तुकडोजी, संत गाडगे महाराज,संत पांचलेगावकर महाराज यांनी तर धर्मातील अंधश्रध्देवर प्रहार केले. त्यांनी स्वच्छता,श्रमदान, रक्तदान समाजकार्याला दिले. म्हणून त्यांना राष्ट्रसंत म्हणतात.शिर्डीचे साईबाबा व शेगावचे गजानन महाराज यांचे कथेतही चमत्कारांचे दृष्टांत आहेत. केवळ हिंदू धर्माप्रमाणे मुस्लिम व ख्रिश्चन धर्मातही ताईत,कुर्बानी, चादर, आजारावर उपचार करणे मौलवी आहेत. तेथे अंधश्रध्दा निर्मूलनवाले आक्रमक होत नाहीत. तेथे तोंड उघडत नाहीत. काही महिन्यापूर्वी इंदूरकर महाराजांनी कीर्तनातून ग्रंथातील आधारिवरून संततीची माहिती दिली होती पण त्यांना लक्ष्य केले व त्यांचे विरोधात रान उठविले गेले, त्यांचेवर कारवाई केली गेली. पण यात न्यायालयाने त्यांची मुक्तता केली आहे. केवळ सनातन हिंदु धर्माला लक्ष्य केले जात आहे, असा आक्षेप आहे. माणूस श्रध्दावान असणे चूक नाही. पण तो अंधश्रध्दावान नसावा. ईश्वराचे दर्शन घेणे व संताच्या आशीर्वाद घेणे,याला विरोध नाही.यातून माणसाला, सुख, शांती आणि समाधान मिळत असेल तर त्यात चूक काय? पण श्रध्देचा बाजार मांडून लोकांना उत्तेजन देणे, त्यांच्या जीवनाशी खेळणे, नरबळी देणे, गरिबांना लुटणे, धर्मात्तरांसाठी आमिष दाखविणे, हा गंभीर प्रकार आहे.अशा बाबांवर कारवाई झाली पाहिजे, मग ते कोणत्याही धर्माचे असोत! तशी कारवाई होताना दिसत नाही,केवळ हिंदु धर्मातील महाराज अंधश्रध्दा पसवित आहेत, असे समज पसविला जात असून संत व महात्म्यांना 'टार्गेट' केले जात आहे. त्यामुळे हिंदू धर्मात मोठी नाराजी आहे. ती दूर करता आली पाहिजे. मध्यप्रदेशातील छतपूर जिल्ह्यातील गढा या गावात बागेश्वरधाम आहे. धीरेंद्र शास्त्री गर्ग यांचा जन्म दि. ४ जुलै १९९६ झाला व बालपण व शिक्षण झाले.त्यांच्या कुटुंबाने गरिबीत दिवस काढले यांचा कुटुंबाचा उदरनिर्वाह दक्षिणेवर होत असे,त्यांचे शिक्षण बारावीपर्यंत झाले. ते हनुमानजी भक्त आहेत. धीरेद्र शास्त्रींचे आजोबा भगवानदास गर्ग गुरू आहेत.त्यानंतर धीरेंद्र शास्त्री यांची हनुमानांची तपश्चर्या केली. तेंव्हा दिव्य ज्ञानप्राप्त झाले,असे मानले जाते. त्यानंतर धीरेद्र शास्त्री यांनी कथा वाचनाला सुरूवात केली. नंतर ते दिव्य दरबार भरविण्यास सुरु केली. यात लोकांच्या समस्यांचे निवारणास सुरूवात केली. त्यांच्या दरबारात भाविकांची संख्या वाढत गेली. आता तर देशभरात त्यांच्या दरबाराचा चमत्काराचा डंका वाजू लागलेला आहे.या महाराज्यांच्या दिव्य दरबारात हजेरी लावणाऱ्या भाविकांना एक पर्चा ( चिठ्ठी ) व टोकन नंबर दिला जातो त्या व्यक्तीला ते व्यासपीठावर बोलवतात,त्या व्यक्तीच्या नावाच्या चिठ्ठीवरून समस्याचे निराकरण केले जाते व आशीर्वाद दिला जातो. महाराजांना त्यांचे नाव व त्यांचे समस्या अधिक कळतात? यालाच सर्व भाविक चमत्कार मानतात.ती एक "ब्रेन रिडर' नावाची कला आहे,याचे एका वृत्तवाहिनेवर प्रात्यक्षित करुन दाखविले. पण बागेश्वरीधाम महाराज अंधश्रध्दा पसवित आहेत. त्यांनी त्यांना चमत्काराला अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे प्रमुख शाम मानव यांनी ३० लाखाचे बक्षिसाचे आव्हान दिले. तसेच नागपूर येथील पोलिसात तक्रार नोंदविली होती.पण पोलिसांनी तपासात ती अंधश्रध्देचा भाग नाही,अशी क्लिन चीट दिली. शाम मानव यांचे धीरेंद्र शास्त्री यांनी स्वीकारले आहे. पण ते अजून आमने- सामने आले नाहीत. त्यांच्या दरबारात भाविकांची संख्या दिवसें दिवस वाढतच आहे! धीरेद्र शास्त्री महाराजांच्या आशीर्वादाने आमच्या समस्या सुटत आहेत, असा दावा केला जातोय! बागेश्वरीधामच्या दरबारात कोणाची फसवणूक अथवा लुबाडणूक करण्यात आल्याची एकाही भाविकांची तक्रार आतापर्यत तरी आलेली नाही. यात दरबारात मुस्लिम महिला हजेरी लावत आहेत. एका मुस्लिम महिलेने तर जाहीरपणे हिंदु धर्माचा स्वीकार केला.पाकिस्तानातील लोहार येथील एक मुस्लिम महिला दरबारात समस्या घेवून आली होती. त्यामुळे पाकिस्तानात धीरेंद्र शास्त्रीच्या चमत्काराची चर्चा होत आहे. जर पाकचे निमंत्रण आले तर तेथे जाण्याची त्यांची तयारी आहे. काही दिवसापासून सर्वच राष्ट्रीय हिंदी वृत्तवाहिन्याने बागेश्वरीधाम धीरेंद्र शास्त्रीवर चर्चा, संवादाने धुमाकूळ घातला आहे, या एका हिंदी वृत्तवाहिनीचा पत्रकार तेथे गेला होता.

महाराजाने जाहीरपणे आव्हान दिले.पत्रकारांच्या म्हणण्यानुसार टोकन व भाविकांना बोलविले गेले. त्यानंतर चिठ्ठीतील मजकूर खुलेआम दाखविला. बागेश्वरीधाम येथे देणगी पेटीत आहे, त्यात मोठ्या प्रमाणात देणगी जमा होते.या महाराजांचे वार्षिक उत्पन्न ४० लाख रूपये आहे.या महाराजांच्या दरबारात भाविकांनी आशीर्वाद व समाधानासाठी जावे किंवा नाही, हा त्यांचा श्रध्देचा, वैयक्तीक प्रश्न आहे. त्याला प्रतिबंध घालता येत नाही! लोक चमत्काराला, साक्षात्कार, देव मानून नमस्कार करतात. अशा चमत्काराला मानणाऱ्याची संख्याबळ अधिक आहे. तेथे विरोध करणारे दुबळे ठरतात,तेंव्हा बागेश्वरी महाराजांवर टीका करून अंधश्रध्देचे निर्मूलन होणार नाही? केवळ धार्मिक वाद वाढत जातील. तेंव्हा समाजातील अंधश्रध्दा घालवायची असेल तर मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याची गरज आहे.

# वाचन संस्कृती रुजविणे जरुरीचे

आधुनिक केसरी



आजकाल प्रत्येकाच्या हातात मोबाईल आहे त्यामुळे सेल्फी फोटो काढणे तसेच कानामध्ये मोबाईलची वायर घालून विविध प्रकारची गाणी ऐकणे यातच हल्लीच्या बहुतांश तरुणाईचा वेळ जातो अगदी बसमध्ये, रिक्षामधे इतकेच काय पण रस्त्यावरून चालताना सुद्धा अनेक जण मोबाईलशी खेळण्यात दंग असतात .समोरून येणाऱ्या वाहनाकडे सुद्धा लक्ष नसते या मोबाईलच्या वेडामुळे अनेक मर्दानी खेळ गायब झाले आहेत . मैदाने आहेत .....पण खेळाला मुलेच नाहीत अशी परिस्थती अनेक ठिकाणी आहे मोबाईल हे ज्ञानार्जनाचे एक साधन आहे .....पण त्याचा उपयोग कसा होतो यावरच सर्व अवलंबून आहे. या मोबाइलवेडामुळे अनेकांना ऐकू कमी येऊ लागले आहे तर कित्येक मुलांना चष्मे लागले आहेत. सुमारे २० ते ३० वर्षांपूर्वी अनेक मुले व तरुण ग्रंथालयात जाऊन पुस्तके वाचीत असत आता ग्रँथालये आहेत पण तेथे मुले व तरुण नाहीत . काही जेष्ठ नागरिक तेथे पुस्तके वाचनास व घरी वाचनासाठी घेऊन जाताना दिसतात एकूणच हल्लीच्या तरुणांमध्ये वाचन संस्कृती रुजविणे जरुरीचे आहे . त्यामुळे ज्ञानवृद्धी होईल व मुख्य म्हणजे मोबाईलचे वेड कमी होईल. या प्रक्रियेमध्ये शाळा व महावियालये यांची भूमिका महत्वाची राहील

**शांताराम वाघ, पुणे**

# रस्त्यावरील खड्डे आणि माणसाचे जीवन



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**सारेजण म्हणत असतात की, माणूस एक दिवस जन्माला येतो आणि एक दिवस हे जग सोडून जातो हे, अंतिम सत्य आहे. कारण तो निसर्गाचा नियमच आहे कोणीही टाळू शकत नाही. व निसर्गाला कोणीही जिंकू शकत नाही. पण, कधी, कधी काही माणसं त्रासाला कंटाळून जीव देतात तर..काही माणसं वेषणाच्या आहारी जाऊन बिनमोवतीने मरतात तर काही माणसं चिंता करुन जगत असतात याला जीवन जगणे म्हणत नाही.**

खऱ्या अर्थाने त्यांना जीवनाचे मोलच कळत नाही म्हणून ते स्वतः च्या हाताने सुंदर अशा मानवी जीवनाला वाया गती घालवत असतात हे, खरच योग्य नाही. वास्तविक पहाता असल्या प्रकारचा उगाचच विचार करायला नको, व मुळात असे चुकीचे पाऊल उचलू नये. त्यापेक्षा संघर्ष करण्याची ताकद आपल्यात ठेवावी. असो,आजचा लेखाचा विषय अनोळखी नाहीच आणि हे, होऊ ही शकत नाही. आज आपल्या गावखेड्याकडे असणारे असे बरेच वाहतुकीचे रस्ते आहेत दिवसभर सुरूच असतात. पण, गावखेड्याकडे असणाऱ्या रस्त्यांचा विकास व्हावा असे, शासनाला खरच वाटत असेल की, नाही माहीत नाही म्हणून विकासाची गंगा गावखेड्याकडे येत नाही. आज त्याच रस्त्यांवर दिवसभर रहदारी सुरू असते त्या रस्त्याने साधा सायकलने जाणारा माणूस सुद्धा कंटाळून जातो मग खरच तो रस्ता कसा असेल. .?आज सायकल वाल्यांची ही परिस्थिती आहे तर.. इतरांचे काय. .? ह्यामध्ये खास करून मला गर्भवती असलेल्या महिलांविषयी लिहावसं वाटतं कारण, त्या इतरांपेक्षा वेगळ्या असतात. आज गावखेड्यामध्ये राहणाऱ्या प्रत्येक लोकांच्या घरी किंवा त्यांच्याकडे चारचाकी,दोन चाकी गाडी नसतो कारण, गावखेड्यात बहुतांश शेतकरी, मोलमजुरी, गोर, गरीब लोक राहत असतात. त्यांच्याकडे पाहिजे ती सोय नसते एखाद्या घरची गर्भवती महिलेला तालुक्यातील दवाखान्यात न्यायचे असल्यास घरापासूनच अडचणी निर्माण होतात तेवढाच दुसरा त्रास रस्त्यावर असलेल्या खड्ड्यातून सहन करावा लागतो या विषयी शासनाने विचार करायला पाहिजे. आजपर्यंत अशा खड्ड्यांमुळे अनेकांचे जीव गेलेले आहेत याकडे कोणी लक्ष देत नाही उलट त्यांच्याविषयी जाणून न घेता सरळसरळ म्हणतात की, हा दारू पिऊन गाडी चालवत असेल पण, सत्य परिस्थिती काय आहे ते मात्र



कोणालाही दिसत नाही. ही फार मोठी शोकांतिका आहे. आज अशा विचारसरणीमुळे गावखेड्याचा पूर्णपणे विकास होत नाही.

बरेचदा काही लोक चांगला रस्ता झाला पाहिजे म्हणून झटत असतात पण त्यांनाही यश येत नाही. मग गावखेड्याकडे असणारे रस्ते कसे बरं चांगले होतील...? शहरातील रस्त्यासारखे तर होऊच शकत नाही. म्हणून आजची ही परिस्थिती बघून असं वाटतं की, शासनाची पूर्ण लक्ष फक्त, शहरात राहणाऱ्या लोकांकडे आहे व कारण, तिथे माणसं राहतात गावखेड्यात माणसं राहत नसतील असेच कदाचित त्यांना वाटत असेल. हे, फार मोठे विचार करायला लावणारे प्रश्न आहेत. आज एकीकडे विकास होतो तर दुसरीकडे विकास झालेला दिसून येत नाही अशा प्रकारची आज परिस्थिती निर्माण झालेली आहे. बऱ्याच जसे, फाटक्या कपड्याला ठिगळ लावल्या जातात तसेच रस्त्यांवर सुद्धा ठिगळ लावलेले दिसून येत आहेत शहरातील मोठे, मोठे झाडे तोडून पशु, पक्षांचे घरटे उदवस्त करुन शानदार रस्ते, उड्डाणपूल बांधलेले दिसून येतात या मधील फरक पाहताना कुठेतरी विचार करायला लावणारे प्रश्न तर आहेतच सोबत मनात विचारही अनेक येत असतात . शासन जेवढे लक्ष शहराकडे देत आहे निदान जास्त नाही तर..थोडेफार तरी गावखेड्याकडे लक्ष द्यावे. कारण, शाळेत जाणाऱ्या मुलांना तरी त्रास होऊ नये. अशा जीव घेणाऱ्या खड्ड्यातून सुटका होणे गरजेचे आहे कारण एकीकडे विकासाची गंगा पाहून दुसरीकडील लोकांच्या मनात आनंद तर होतंच पण, अपेक्षाही असते. ती अपेक्षा भंग होऊ नये यासाठी जीव घेणाऱ्या खड्ड्यापासून सुटका होणे अत्यंत काळाची गरज आहे.

# लोक अंधश्रद्धेवर विश्वास का ठेवतात ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**शतकानुशतके अंधश्रद्धा चालत आली आहे. समाजात पसरलेला हा असा रोग आहे, ज्यामुळे समाजाचा पायाच पोकळ झाला आहे. अंधश्रद्धा कोणत्याही जाती, समाज किंवा वर्गाशी संबंधित नसून ती प्रत्येकाच्या आत सारखीच असते. अनेकवेळा अंधश्रद्धेमध्ये असणारी व्यक्ती अशी कामे करतात, ज्यामुळे हास्यास्पद परिस्थिती निर्माण होते. अंधश्रद्धा माणसाला आंतरिक दृष्ट्या कमकुवत बनवते. तो अशा गोष्टींवर विश्वास ठेवू लागतो, ज्यांचे कोणतेही समर्थन नाही. या व्याधीने माणूस त्रस्त असेल, तर समाजाला जगणे शक्य नाही. त्याची मुळे भारतीय समाजात खूप खोलवर आहेत. अंधश्रद्धेची छाया प्रत्येक चांगल्या किंवा वाईट कृतीवर दिसून येईल.**

अंधश्रद्धेचा मनावर इतका खोल परिणाम होतो की माणूस आयुष्यभर अंधश्रद्धेतून बाहेर पडू शकत नाही.अंधश्रद्धेचा मनावर इतका खोल परिणाम होतो की माणूस आयुष्यभर अंधश्रद्धेतून बाहेर पडू शकत नाही.अंधश्रद्धा ही एक अशी श्रद्धा आहे ज्याला कोणतेही वैध कारण नाही. ज्या परंपरा, श्रद्धा लहान मूल लहानपणापासून आपल्या घरात, कुटुंबात, समाजात पाहत-ऐकत आले आहेत, त्या त्यांचं अक्षरशः पालनही करू लागतो. या अंधश्रद्धेचा त्याच्या मनावर इतका खोल ठसा उमटतो की तो या अंधश्रद्धेतून आयुष्यभर बाहेर पडू शकत नाही. अंधश्रद्धा अधिकतर कमकुवत व्यक्तिमत्व, कमकुवत मानसशास्त्र आणि कमकुवत मानसिकतेच्या लोकांमध्ये दिसून येते. जे लोक जीवनात अयशस्वी झाले आहेत ते बहुतेक अंधश्रद्धांवर विश्वास ठेवू लागतात आणि विश्वास ठेवतात की या अंधश्रद्धांचे अनुसरण करून आणि त्यांचे अनुसरण करूनच ते यशस्वी होऊ शकतात. अंधश्रद्धा केवळ अशिक्षित आणि अल्प उत्पन्न गटातील लोकांमध्येच दिसून येत नाही, तर उच्चशिक्षित, विद्वान, बौद्धिक, उच्च उत्पन्न गट आणि विकसित देशांतील लोकांमध्येही ती कमी-अधिक प्रमाणात दिसून येते. हे सहसा पिढ्यानपिढ्या दिसून येते. समाज, देश, प्रदेश, जात, धर्म यानुसार अंधश्रद्धा वेगवेगळ्या प्रकारच्या असतात. डोळ्याचे पारणे फेडणे, एखाद्या कामासाठी घराबाहेर पडताना एखाद्या व्यक्तीला शिंकणे, मांजर रस्ता ओलांडणे, शुक्रवार १३ किंवा १३ नोव्हेंबर हा दिवस अशुभ, अंगावर खाज सुटणे अशा विविध प्रकारच्या अंधश्रद्धा समाजात सामान्यतः पाहायला मिळतात. तळहाता, काळ्या मांजरीमध्ये दुष्ट आत्म्याचे अस्तित्व, परीक्षेला जाण्यापूर्वी दही इत्यादी पांढऱ्या गोष्टींचे सेवन करणे, उजव्या हाताला नीळकंठ नावाचा पक्षी दिसणे, शिडीच्या खालून बाहेर पडणे, बुटाचा आरसा तुटणे, घोड्याची नाल भेटणे, घरामध्ये छत्री उघडणे, लाकडावर दोनदा ठोठावणे, अंधश्रद्धेचा मनावर इतका खोल परिणाम होतो की माणूस आयुष्यभर अंधश्रद्धेतून बाहेर पडू शकत नाही. मांजरीचा रस्ता ओलांडणे अशुभ मानले जाते. अंधश्रद्धा सत्य आणि वास्तवापासून कोसो दूर आहेत. अंधश्रद्धेमध्ये व्यक्ती अलौकिक शक्तींवर विश्वास ठेवते. निसर्गाच्या नियमांची किंवा विश्वाच्या वैज्ञानिक समजाची पुष्टी न करणाऱ्या शक्तींच्या अस्तित्वावर विश्वास. अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणावर पसरली आहे. अलौकिक प्रभावावर अतार्किक विश्वास आहे. डोळे मिचकावण्याबाबत लोकांमध्ये एक अंधश्रद्धा आहे की, पुरुषाचा उजवा डोळा आणि स्त्रीचा विरुद्ध डोळा पाहणे शुभ असते. दुसरीकडे, त्याचे उलटे होणे अशुभ मानले जाते. वैद्यकीय शास्त्रानुसार याला मसल फ्लिकरिंग म्हणतात, त्याचे कारण अद्याप कळलेले नाही किंवा त्यावर कोणताही उपचार नाही. डोळ्याचे पारणे फेडणे आपोआप थांबते. काही कामानिमित्त घराबाहेर पडताना दुसऱ्या व्यक्तीला शिंकणे ही देखील अंधश्रद्धा आहे. जेव्हा असे होते, तेव्हा ती व्यक्ती काही काळ तिथेच राहते आणि पाणी पिऊन किंवा काहीतरी लहान आणि चरबी खाल्ल्यानंतरच पुन्हा बाहेर येते. मांजरीचा रस्ता ओलांडणे देखील अशुभ मानले जाते. मांजराने रस्ता ओलांडला तर एखादी व्यक्ती किंवा वाहन रस्ता ओलांडत नाही तोपर्यंत दोन्ही बाजूचे लोक थांबून उभे राहतात, असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अनेकवेळा रस्तेही जाम होतात. मांजर सिंहाच्या कुटुंबातील असल्याचे सांगितले जाते. या कुटुंबातील सिंह, चित्ता आणि प्राणी जेव्हा रस्ता किंवा रस्ता ओलांडतात, तेव्हा रस्ता ओलांडल्यानंतर ते थांबतात, त्यांच्या शिकारीकडे मागे वळून पाहताना. म्हणूनच प्राचीन काळी सिंह जाईपर्यंत लोक त्या मार्गावरून पुढे जात नसत. हे कारण होते, पण आता ती अंधश्रद्धा बनली आहे. अंधश्रद्धेचा मनावर इतका खोल परिणाम होतो की माणूस आयुष्यभर अंधश्रद्धेतून बाहेर पडू शकत नाही.तेरावा तिथी अशुभ मानली जातेतेरा अंक किंवा तेरा तारीख अशुभ मानली जाते आणि जर तेरा तारीख शुक्रवारी आली तर ती अत्यंत अशुभ मानली जाते. हॉटेल्समध्ये तेराव्या क्रमांकाची खोली किंवा तेरावा मजलाही नसतो, तिथे बारा नंतर थेट चौदावा क्रमांक असल्याचे दिसून आले आहे. ही सुद्धा एक प्रकारची अंधश्रद्धाच आहे. हाताच्या तळहातावर खाज सुटणे देखील अंधश्रद्धेशी संबंधित आहे, त्यानुसार पुरुषाच्या सरळ तळहातावर आणि स्त्रीच्या उलट तळहातावर खाज सुटणे संपत्ती आणते. उलट आर्थिक नुकसान संभवते. आपल्या समाजात काळ्या मांजरीवर भूताचा वावर असतो असा समज आहे. या कारणास्तव, लोक काळ्या मांजरींना त्यांच्या घरात प्रवेश करू देत नाहीत. त्याच वेळी, समाजाच्या काही भागांमध्ये, काळी मांजर देखील भाग्यवान मानली जाते. या कारणास्तव, लोक त्यांच्या घरात काळ्या मांजरी ठेवतात. पण काळ्या मांजरावर ना भुताचे वास्तव्य असते, ना काळी मांजर सौभाग्याचे कारण असते. हे केवळ अंधश्रद्धा आणि काल्पनिक घटनांवर आधारित आहे. मुलं परीक्षेला जाण्यापूर्वी पालक त्यांना दही वगैरे पांढऱ्या वस्तू खाऊ घालतात आणि पाठवतात. पांढऱ्या वस्तू खाल्ल्याने परीक्षेत चांगले गुण येतात आणि गुणही चांगले येतात या अंधश्रद्धेशी याचा संबंध आहे. तुम्ही कुठेतरी जात असाल आणि वाटेत नीळकंठ नावाचा पक्षी थेट तुमच्या हाताकडे दिसला



तर ते खूप शुभाचे लक्षण आहे.

नीलकंठ नावाच्या पक्ष्याला आपण काहीही बोललो तरी ते थेट भगवान शंकरापर्यंत पोहोचेल आणि आपल्या मनोकामना पूर्ण होतील या सत्याशी ही कथा आहे. लोक शिडीच्या खाली जाण्याला दुर्दैवाने जोडतात, तर ती फक्त अंधश्रद्धा आहे. लुकिंग ग्लास तुटणे देखील अशुभ मानले जाते आणि ते घरात ठेवणे देखील अशुभ आहे. अशी अंधश्रद्धा आपल्या समाजात खूप प्रचलित आहे. अंधश्रद्धेचा मनावर इतका खोल परिणाम होतो की माणूस आयुष्यभर अंधश्रद्धेतून बाहेर पडू शकत नाही. घोड्याचा जोडा शुभ मानला जातो- घोड्याचा जोडा (घोड्याच्या पायाखाली लोखंडी जोडलेला) शोधणे शुभ मानले जाते आणि लोक या बुटापासून एक गोल अंगठी बनवतात आणि थेट हाताच्या मधल्या बोटात घालतात. एका अंधश्रद्धेनुसार घरामध्ये छत्री उघडणे अशुभ मानले जाते. लाकडावर दोनदा ठोठावणे, मग तो लाकडी दरवाजा असो किंवा इतर कोणतीही वस्तू, शुभ मानली जात नाही. ही सुद्धा एक प्रकारची अंधश्रद्धाच आहे. जेव्हा एखादी व्यक्ती चांगली परिधान केलेली असते आणि एखाद्याला तो खूप छान, सुंदर दिसतो, तेव्हा तो लाकडी वस्तूला स्पर्श करून टचवूड बोलतो, जेणेकरून ती व्यक्ती दिसत नाही, तर त्यात अंधश्रद्धेशिवाय काहीही सत्य नाही. आपल्या समाजात लोक दुर्दैव दूर करण्यासाठी एखाद्या व्यक्तीच्या खांद्यावर मीठ टाकतात, त्यामुळे त्या व्यक्तीचे नशीब जागृत होते, हे कृत्य देखील अंधश्रद्धेच्या श्रेणीत येते. जेव्हा एखादी व्यक्ती शिंकते, मग आपण म्हणतो देव असो वा छत्रपती जय नंदी माय. आपले पूर्वज सांगतात की शिंकेच्या वेळी भूत आपला आत्मा काढून घेऊ नये म्हणून असे म्हटले आहे. ही सुद्धा एक प्रकारची अंधश्रद्धाच आहे. आजकाल ज्योतिषशास्त्राला विज्ञान म्हटले जात असले तरी ज्योतिषांनी सांगितलेल्या किंवा वर्तवलेल्या बहुतांश गोष्टी खोट्या ठरतात. भूतांवर विश्वास ठेवणे ही मोठी अंधश्रद्धा आहे. सहसा जे लोक भूत भेटण्याबद्दल किंवा भूत पाहण्याबद्दल बोलतात, ते फक्त कथा बनवतात किंवा एखाद्या मानसिक आजाराने ग्रस्त असतात, ज्यामुळे विचित्र गोष्टी दिसू लागतात किंवा विचित्र आवाज ऐकू येतात, परंतु प्रत्यक्षात तसे नसते. वैद्यकीय शास्त्राच्या क्षेत्रात याला 'भ्रमभ्रम' म्हणतात. अंधश्रद्धेचा मनावर इतका खोल परिणाम होतो की माणूस आयुष्यभर अंधश्रद्धेतून बाहेर पडू शकत नाही. मासिक पाळी असलेल्या महिलांना मंदिरात प्रवेश दिला जात नाही मासिक पाळीच्या काळात मुलींना व स्त्रियांना मंदिरात जाण्यास व देवाच्या मूर्तीसमोर दिवे, अगरबत्ती किंवा अगरबत्ती लावून पूजा करण्यास व प्रज्वलित करण्यास मनाई आहे, कारण मासिक पाळीच्या काळात स्त्री अपवित्र होते, असे मानले जाते, तर ही अंधश्रद्धा दुसरे काही नाही. कारण मासिक पाळी ही एक सामान्य शारीरिक प्रक्रिया आहे जसे श्वास, हृदयाचे ठोके, खाणे, शौचास इ. असे म्हणतात की श्राद्धाच्या दिवशी नवीन काम सुरू केले जात नाही, नवीन वस्तू खरेदी केल्या जात नाहीत, नवीन कपडे शिवले जात नाहीत. श्राद्ध करताना आपण आपल्या पूर्वजांचे स्मरण करतो आणि त्यांची पूजा करतो. आपले पूजनीय पूर्वज आपल्याला या गोष्टी करण्यापासून रोखत नाहीत. त्यामुळे ही देखील एक अंधश्रद्धा आहे. आपल्या समाजातील अनेक लोक मंगळवारी केस कापत नाहीत किंवा दाढी करत नाहीत. मंगळवार हा हनुमानाचा दिवस मानला जातो. भगवान हनुमानाच्या शरीरावर केस मुबलक प्रमाणात आढळतात. या कारणास्तव लोक मंगळवारी केस कापणे आणि दाढी करणे टाळतात, परंतु हे योग्य नाही. ही केवळ अंधश्रद्धा आहे. अंधश्रद्धा टाळण्यासाठी आपले मन, मेंदू, विचार आणि मानसशास्त्र बळकट करण्याची गरज आहे. अनेकदा लोक, अंधश्रद्धाळू, ऐकण्यावर आधारित असतात. जेव्हा जेव्हा एखादी मांजर तुमचा मार्ग ओलांडते तेव्हा त्या मार्गातून जा आणि पहा, तुम्हाला कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही. तसेच इतर अंधश्रद्धांवरही प्रयोग करून पहा, या अंधश्रद्धेतून आपोआप बाहेर पडाल. या अंधश्रद्धांवर प्रयोग करत असताना काही अनुचित प्रकार घडल्यास तो निव्वळ योगायोग असेल. यात तथ्य असणार नाही. जर तुम्हाला कोणी सांगितले की या अंधश्रद्धांमध्ये सत्य आहे, तर तुम्ही त्याला या अंधश्रद्धांचे सत्य सिद्ध करण्यास सांगा. आपल्या अंधश्रद्धेतून मुक्त होणे फार कठीण आहे, हे कटू सत्य आहे. अंधश्रद्धा टाळण्यासाठी नेहमी सकारात्मक राहा. मानवी मेंदू विश्वास आणि घटना यांच्यात खूप लवकर संबंध निर्माण करतो. जर एखाद्या व्यक्तीने शुक्रवारी तेरावा दिवस धोकादायक मानला आणि त्याच दिवशी त्याच्यासोबत काही अनुचित घटना घडली तर अंधश्रद्धा अधिक दृढ होत जाते. इतर अंधश्रद्धांबाबतही असेच घडते, तर हा निव्वळ योगायोग आहे. तुमच्या अंधश्रद्धेशी संबंधित असलेल्या विश्वासावर कृती करण्याच्या आग्रहाकडे दुर्लक्ष करण्यास शिका. आपल्याला हे माहित असले पाहिजे की अंधश्रद्धा केवळ तेव्हाच कार्य करते जेव्हा आपण त्याच्या अंतर्निहित आकर्षण आणि सामर्थ्यावर विश्वास ठेवता. जर तुम्हाला कोणी सांगितले की या अंधश्रद्धांमध्ये सत्य आहे, तर तुम्ही त्याला या अंधश्रद्धांचे सत्य सिद्ध करण्यास सांगा.

# तर महाविकास आघाडीत फूट पडू शकते ?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577


आधुनिक केसरी

**राज्यात कुठल्याही निवडणुका लागल्या नसताना शिवसेनेला काळाची गरज म्हणुन वंचित बहुजन आघाडीचे नेते डॉ. प्रकाश आंबेडकर आणि ठाकरे शिवसेना यांच्यात युती झाली. त्यानंतर महाविकास आघाडीत राजकिय खळबळ उडणे साहजिकच. त्या युतीचा आमच्याशी कुठलाच संबंध नाही अशा प्रतिक्रिया राष्ट्रवादी आणि काँग्रेस पक्षांकडून आल्या तर दुसऱ्या बाजूने आंबेडकरांनी शरदचंद्र पवारावर टिका केल्याची बाब शिवसेनेला रूचली नाही.**

खा. संजय राऊतांनी युती झाल्यानंतर अवघ्या बारा तासांत आंबेडकरांना सबुरीचा सल्ला दिला. त्यावरही परखड मत व्यक्त करण्यासाठी प्रसिद्ध असलेले आंबेडकरांनी संजय राऊत कोण? हा सवाल केला. निवडणुका नसताना एवढी घालमेल तर मग निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काय होणार? राज्यातील सरकार फेब्रुवारी महिन्यात पडणार अशी भविष्यवाणी करणाऱ्या नेत्यांच्या समोर आता महाविकास आघाडीचं अंतर्गत आवाहन उभा रहात असून कुठल्याही क्षणी आघाडीत फूट पडू शकते. एवढेच नाही तर शक्कले पडू शकतात हा धोका अनेकांनी ओळखला.

2019 विधानसभा निवडणुकीनंतर राज्यातील मतदारांनी शिवसेना-भाजप अर्थात महायुतीला सरकार स्थापनेसाठी जनादेश दिला होता. पण तो जनादेश डावलुन केवळ मुख्यमंत्री पदासाठी शिवसेना नेते उद्धव ठाकरेंनी तत्कालीन काळात वेगळा रस्ता धरत राज्यात सत्ता स्थापन होत असताना भाजपाची साथ सोडली. महाविकास आघाडी स्थापन करून मुख्यमंत्री पद स्वतःकडे घेतलं अर्थात या घडामोडीमध्ये दस्तुरखुद्द शरदचंद्रजी पवार, संजय राऊत यांची मध्यस्थी कारणीभुत ठरली. मोठ्या साहेबांना कुणाचा वापर राजकारणात कधी करायचा हे सांगण्याची गरज लागत नाही. सत्तेत येण्यासाठी शिवसेनेचा वापर तत्कालीन काळात केला. सारी सुत्रे संजय उवाच मार्फत हालवली. इकडे काँग्रेस सत्तेविना तडफडत होती. उसणं अवसान आणत त्यांनी देखील महाविकास आघाडीत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. जवळपास अडीच वर्षे राज्याची सत्ता चालवली. दरम्यानच्या काळात उद्धव ठाकरेंनी घेतलेला निर्णय शिवसेनेच्या अनेक आमदारांना मान्य नव्हता. कारण प्रखर हिंदुत्ववादासाठी ओळख असलेला शिवसेनेचा चेहरा पुरोगाम्यासोबत गेल्यानंतर किळसवाणी चित्र होवुन बसलं. परिणामी एकनाथ शिंदे सारखे हिंदुत्ववादी तब्बल 40 आमदार फुटुन बाजुला गेले. राज्यात अस्थिरता नको, निवडणुकाही परवडणाऱ्या नाहीत हे लक्षात घेता उद्‌भवलेल्या परिस्थितीवर भारतीय जनता पार्टीने शिंदे गटाला सोबत घेवुन सत्तास्थापन केली. ज्याला सहा महिने होत आले राज्यात स्थिर आणि विकासाभिमुख सरकार म्हणून मान्यता मिळताना दिसते. अनेक महत्वाचे निर्णय शिंदे-फडणवीस सरकारने घेतले असुन पारदर्शक तथा भ्रष्टाचारमुक्त कारभार हा सरकारचा चेहरा लोकांच्या पुढे आला. उद्धव ठाकरेंना पायउतार व्हावं लागलं. परिणामी महाविकास आघाडी विरोधी पक्षात आली. आज काँग्रेस, राष्ट्रवादी पक्षाचे मातब्बर नेते सत्तेविना पाण्याबाहेर पडलेल्या माशासारखी अवस्था झालेली दिसते. एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंच्या समोर उभा केलेलं राजकिय आवाहन अगदी अस्तित्व समुळ नष्ट होण्यासारखं असुन शिल्लक शिवसेना असाही आता ठाकरे शिवसेनेचा उल्लेख होवु लागला. पक्षाला वाचवण्यासाठी कधी नव्हे ते ठाकरे पिता-पुत्र रस्त्यावर उतरून धडपडताना दिसु लागले. अनेकांचे प्रवेश घेताना ज्यांनी आयुष्यभर शिव्या दिल्या नव्हे तर हिंदुत्वाच्या नावाने ओरडत राहणाऱ्यांनाही अंधार दुर करण्यासाठी ठाकरे




शिवसेनेत सद्या प्रवेश दिला जातोय. महाविकास आघाडी तीन प्रमुख पक्ष, तिघांचेही वेगवेगळे अजिंडे मात्र देशात आणि राज्यात भाजपाचा वारू रोखण्यात कुणाचीच हिंमत नाही. त्यामुळे एकमेकांचे जमेना पण नाविलाजाने एकमेकाशिवाय राहवेना या भुमिकेत महाविकास आघाडी राज्यात तग धरून आहे. त्यातच दोन दिवसापुर्वी वंचित बहुजन आघाडीचे नेते डॉ.प्रकाश आंबेडकर आणि ठाकरे शिवसेना यांच्यात युती झाली.

तसं पाहता दोघांनाही काळाची गरज होती म्हणून एकत्र आले तो भाग वेगळा. महाविकास आघाडीतील आपआपले पक्ष वाढवताना कुणी कुणाला सोबत घ्यायचं हे प्रत्येकाचं स्वातंत्र्य असलं तरी शिवसेनेनं आंबेडकरांना सोबत घेतल्याचं राष्ट्रवादी आणि काँग्रेस दोघांनाही निश्चित आवडलं नाही. अवघ्या काही तासांत त्यांच्या प्रतिक्रिया आल्या. आंबेडकर युतीशी महाविकास आघाडीचा संबंध नसल्याचा जाहिर खुलासा काँग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोलेंनी केला. एवढेच नव्हे तर आंबेडकरांनी देखील शरदचंद्रजी पवार भाजपसाठी काम करत असल्याचा आरोप केला. खा.संजय राऊतांनी अवघ्या बारा तासात प्रकाश आंबेडकरांना बोलतानाच सबुरीने घ्यायचा सल्ला दिला. तोही आंबेडकरांना अजिबात आवडला नाही. संजय राऊत मला सल्ला देणारे कोण? हा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.एवढेच नव्हे नाना पटोलेंनी आंबेडकरांचा आमचा संबंध नाही असं म्हणताच संजय राऊत म्हणाले, आम्ही राहुल गांधींशी बोलु. एकुणच महाविकास आघाडीत फार मोठा संभ्रम झाला असुन आंबेडकर-ठाकरे युतीनंतर ज्या प्रकारची महाविकास आघाडीच्या नेत्यांची जाहिर नाराजी समोर येवु लागली ते पहाता फेब्रुवारी महिन्यात कदाचित आघाडीमध्ये फार मोठी फुट पडू शकते हे भविष्य विचारण्यासाठी कुणाकडे जाण्याची गरज नाही. खा.संजय राऊत, अमोल मिटकरी यांनी फेब्रुवारी महिन्यात शिंदे-फडणवीस सरकार जाणार याची भविष्यवाणी करून ठेवली. त्या अगोदर त्यांनाच आता आपल्या आघाडीचे शक्कले पडणार नाहीत याची काळजी घेत बसावं लागणार. राजकिय तज्ञांच्या मतानुसार आंबेडकर-ठाकरे युती मुंबई महानगरपालिकासाठी असली तरी तिथे दोन्हीही काँग्रेस सोबत राहतील का नाही? हा देखील प्रश्न आहे. राजकारणात गंमत किती असते बघा? याच प्रकाश आंबेडकरांना भाजपची टिम म्हणून हिणवत होते. तिच मंडळी आज त्यांच्यासोबत राजकिय पंक्तीला जावुन बसली. त्यामुळे राजकारणातले वारे कधी कोणत्या दिशेने वाहतील सांगता येत नाही. एकीकडे शिंदे-फडणवीस सरकार ज्याला कुठलाही धोका नाही. पाच वर्षे पुर्ण करण्यासाठी कुठल्याच प्रकारची अडचण येवु शकत नाही. सरकारचं काम लोकाभिमुख सुरू आहे. अशा परिस्थितीत विरोधी पक्षात अर्थात महाविकास आघाडीतच आंबेडकर यांच्या युतीवरून फार मोठी फुट पडण्याचा धोका निर्माण झाला असं म्हणता येईल. प्रकाश आंबेडकरांना सोबत घ्यावं का नाही हा सल्ला उद्धव ठाकरेंनी शरदचंद्रजी पवार यांचा घेतला नाही असं म्हणताच येणार नाही. कदाचित पवार साहेबांनी तात्काळ होकारही दिला असेल. कारण भविष्यात अजुन वाताहतीचा सामना ठाकरे शिवसेनेला करावा लागु शकतो. राज्यातील सामान्य जनतेचा मुड शिंदे-फडणवीसांच्या बाजुने असल्याची साक्ष ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत प्रत्यक्ष दिसुन आली.राज्यात काही जिल्ह्यात प्रकाश आंबेडकरांची ताकद आहे. उदा. अकोला किंवा सोलापूर पट्यात पण काँग्रेस आणि राष्ट्रवादी स्थानिकच्या राजकारणात वेशीतच आंबेडकरांना सोबत घेवु शकणार नाहीत. एकुणच सारी पार्श्वभुमी पहाता एक निश्चित म्हणावे लागेल येणाऱ्या अवघ्या एक महिन्यात महाविकास आघाडीत उभी फुट पडू शकते.यावर कुणाचा विश्वास बसत नसेल तर काय घडतं?बघत रहा.

# साडेतीन शक्तिपीठे नेमके आहेत तरी काय ?



कल्पना आवारे

आधुनिक केसरी

**प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्ली येथील पथ संचलनात आराध्य दैवत व साडेतीन शक्तीपीठांचा देखावा असलेल्या एक वेगळ्या चित्ररथाने मोठ्या डौलात मार्गक्रमण केले. हे रथ बघण्यासाठी देशभरातुन आलेल्या जनतेने तसेच दृक्श्राव्य माध्यमातून 'याची देही याची डोळा' बघितलेल्या चित्ररथामुळे महाराष्ट्राचा अभिमान नक्कीच उंचावला आहे. त्यामुळे आगामी काळात या शक्तिपीठांकडे दर्शनासाठी भाविकांची मोठी ओढ असणार आहे.**

केंद्र सरकारने दखल घेतलेली ही पीठे आहेत तरी काय? याचा गोषवारा. पाहिले पीठ कोल्हापूरची महालक्ष्मी, तुळजापूरची तुळजाभवानी, माहुरगडची रेणूका माता आणि त्यातील अर्धे पीठ म्हणजे नाशिक जिल्ह्यातील सप्तशृंगी गडावरील सप्तशृंगी माता. कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर (अंबाबाईचे देऊळ) हे पुराणात उल्लेखलेल्या १०८ पीठांपैकी एक व महाराष्ट्रात असलेल्या देवीची साडेतीन पीठांपैकी एक आहे. मंदिराच्या मांडणीवरून ते चालुक्यांच्या काळात इ.स. ६०० ते ७०० मध्ये बांधले असण्याची शक्यता आहे. मंदिराचे पहिले बांधकाम राष्ट्रकूट किंवा त्या आधीचा शिलाहार राजांनी सुमारे आठव्या शतकात केले असावे. पुराणे, अनेक जैन ग्रंथ, ताम्रपत्रे व सापडलेली अनेक कागदपत्रे यांवरून अंबाबाई मंदिराचे पुरातनत्व सिद्ध होते आणि कोल्हापूरची अंबाबाई खऱ्या अर्थाने अखिल महाराष्ट्राची कुलस्वामिनी ठरते. संभाजी महाराज यांच्या कारकीर्दीत इ.स. १७१५ ते १७२२ या कालखंडात मंदिराचे पुनरुज्जीवन करण्यात आले. उत्तम कोरीव काम असलेल्या भिंती व अगदी साधे वरचे शिखर हा कारागिरीतला फरक त्यामुळेच पडला असावा. महालक्ष्मी ही विष्णूची भार्या व म्हणून समोर गरुड मंडपात विष्णुवाहन गरूडाची स्थापना केली आहे तर मूर्तीच्या जवळील सिंह व शिरावरील शिवलिंगामुळे देवी अनेकांच्या मते पार्वतीचे रूप आहे. देवीची मूर्ती दगडी असून तिचे वजन ४० किलोग्रॅम आहे. मूर्तीमागे दगडी सिंह आहे. डोक्यावर मुकुट आहे आणि त्यावर शेषनाग आहे.
दुसरे खंडपीठ तुळजाभवानी- क्षेत्र तुळजापूर हे पूर्ण व आद्यपीठ मानले जाते. महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्ह्यात वसलेले तुळजापूर हे महत्वाचे तीर्थक्षेत्र असून त्याठिकाणी तुळजाभवानी देवीचे प्राचीन मंदिर आहे. तुळजाभवानी देवीची महती तशी हिंदू पुराणातून खूपच विस्ताराने सांगितली गेली आहे. त्या माहितीनुसार असुरांचा, दैत्यांचा संहार करून विश्वात नीती व धर्माचरण यांची पुनर्स्थापना करण्याचे महत्त्वाचे कार्य तुळजाभवानी देवीने प्रत्येक युगामध्ये केले आहे. स्वराज्य स्थापना करणारे छत्रपती श्री शिवाजी महाराज, भोसले घराण्याची ही कुलदेवता आहे. तुळजाभवानी देवीच्या आशीर्वादाने शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेची प्रेरणा मिळाली होती. देवीने महाराजांना दृष्टांत देऊन महाराष्ट्रावरील दुष्टचक्राचे निवारण करण्यासाठी भवानी तलवार दिली होती अशी आख्यायिका आहे. देवीचे मंदिर बालाघाटातील एका डोंगरमाथ्यावर असल्याने अगदी जवळ गेल्यावर देखील या मंदिराचा कळस दिसत नाही. मंदिराच्या काही भागाची बांधणी हेमाडपंती आहे. महाराष्ट्रात या देवीस विशेष महत्त्व असून नवरात्रीचा उत्सव जरी नऊ दिवसांचा असला तरी तुळजापूरला मात्र हा उत्सव एकूण एकवीस दिवस चालतो.

**रेणुकादेवी** – माहूर हे देवीच्या साडेतीन पीठांपैकी एक असून येथील पीठाची देवता रेणुकादेवी आहे. रेणुकादेवी तसेच दत्तात्रेय आणि परशुराम यांची देखील प्राचीन मंदिरे माहूरगडावर आहेत. येथे मंदिरासमोरच एक किल्ला आहे. देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मूळ जागृत पीठ म्हणजे माहूरची श्री रेणुकामाता होय. श्री परशुरामाची माता म्हणूनही रेणुका मातेला ओळखले जाते. महाराष्ट्रातील अनेक परिवारांची ही कुलदेवता आहे. देवीचे मंदिर १३ व्या शतकात देवगिरीच्या यादव कालीन राजाने बांधले आहे असे म्हटले जाते. माहूरगडावरच श्री दत्तात्रयांचा जन्म झाला अशी भाविकांची श्रद्धा आहे. एका कथेनुसार, माता पार्वतीने कुब्ज देशाच्या राजाच्या पोटी जन्म घेतला. तिचे नाव रेणू असे ठेवण्यात आले. शंकराचा अवतार मानलेल्या जमदग्नी ऋषीबरोबर तिचे लग्न झाले. जमदग्नीच्या आश्रमात अनेक शिष्य शिकत असत. सर्वांच्या मनोकामना पूर्ण करणारी कामधेनू गाय जमदग्नीकडे होती. राजा सहस्रार्जुनाला या कामधेनूचा मोह झाला. त्याने जमदग्नीकडे कामधेनू मागितली. ऋषीने राजाची मागणी मान्य केली नाही.
तेव्हा पराक्रमी जमदग्नीपुत्र परशुराम आश्रमात नाही हे साधून सहस्रार्जुनाने आश्रमावर हल्ला केला. आश्रम उद्ध्वस्त करून जमदग्नींना ठार मारले व कामधेनू हिरावून नेली. नंतर त्यांचा पुत्र परशुराम तिथे आला. घडला प्रकार बघून परशुरामाने क्षत्रियांचा विध्वंस करण्याची प्रतिज्ञा केली. पित्याला अग्नी देण्यासाठी कोरी भूमी हवी म्हणून त्याने कावडीच्या एका पारड्यात जमदग्नींचे पार्थिव व दुसऱ्या पारड्यात माता रेणुकेला बसवले. रानोमाळ भटकत अखेर तो माहूरगडावर आला. तिथे वास्तव्यास असलेल्या दत्तात्रेयाने त्याला कोरी भूमी दाखवली व 'इथेच पित्यावर अग्निसंस्कार कर' असे सांगितले. परशुरामाने प्रथम बाण मारून मातृतीर्थ व सर्वतीर्थ निर्माण केले. या पाण्याने स्नान घालून जमदग्नीवर अंत्यसंस्कार केले. यावेळी माता रेणुका सती गेली. या सर्व विधींचे पौरोहित्य दत्तात्रेयांनी केले. त्यानंतर परशुरामाला माता रेणुकेची खूप आठवण येऊ लागली. तो दुःखी होऊन शोक करत होता, तोच आकाशवाणी झाली. 'तुझी आई जमिनीतून वर येऊन तुला दर्शन देईल. फक्त तू मागे पाहू नकोस. 'परंतु परशुरामाची उत्सुकता चाळवली गेल्याने त्याने मागे वळून बघितले. त्यावेळी रेणुकामातेचे केवळ मुखच जमिनीतून वर आले होते. तेवढेच परशुरामाला दिसले. या तांदळारूपातल्या मुखाचीच माहूरला पूजा होते. परशुरामाला या डोंगरावर मातेचे दर्शन झाले म्हणून याला 'मातापूर' म्हणू लागले. शेजारच्या आंध्रप्रदेशात 'ऊर' म्हणजे गाव ते ' माऊर ' आणि पुढे ' माहूर ' झाले.

**सप्तशृंगीदेवी**– महाराष्ट्रात देवीच्या साडेतीन पीठांपैकी अर्धे पीठ असलेली सप्तशृंगीदेवी नाशिकपासून ६५ किलोमीटरवरील ४८०० फूट उंचावरील सप्तशृंगगडावर वसलेली आहे. सह्याद्रीच्या पर्वतरांगेवरील सात शिखरांचा प्रदेश म्हणजे सप्तशृंगगड. एकीकडे खोल दरी, तर दुसरीकडे छाती दडपविणारे कडे आणि यात फुललेली नाजूक हिरवाई, असा निसर्ग घेऊन येथे उभी ठाकलेली देवी जणू या निसर्गाच्या रौद्र रूपाशीच नाते सांगणारी आहे असे वाटते. आदिमायेच्या या गडावर वस्ती करण्याची आख्यायिकाही तिच्या या रूपातूनच जन्माला आली आहे. मातलेल्या महिषासुर राक्षसाच्या निर्दालनासाठी देवादिकांनी देवीची याचना केली अन् होमाद्वारे ती प्रकटही झाली. तिचे प्रकट रूप हेच सप्तशृंगीचे होते असे सांगितले जाते. या देवीचे महात्म्य मोठे आहे. देवी भागवतात देवीची देशात १०८ शक्तिपीठे असल्याचा उल्लेख आहे. त्यांपैकी महाराष्ट्रात साडेतीन पीठे आहेत. त्यांपैकी सप्तशृंगीचे अर्धे पीठ आहे. याव्यतिरिक्त अर्धे पीठ असल्याचा कोणताही उल्लेख त्यात सापडत नाही. या देवीला श्री ब्रह्मस्वरूपिणी असेही म्हणतात. ब्रह्मदेवाच्या कमंडलूपासून निघालेल्या गिरिजा महानदीचे रूप म्हणजे सप्तशृंगीदेवी.

महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वतीचे त्रिगुणात्मक स्वरूप म्हणजे सप्तशृंगीदेवी असे मानले जाते. नाशिकच्या तपोवनात राम, सीता व लक्ष्मण वनवासासाठी आले असता, येथे येऊन गेल्याचीही आख्यायिका आहे. देवीच्या अवताराबरोबरच मूर्तीविषयी असलेली अख्यायिकाही भाविकांकडून मोठ्या भक्तिभावाने सांगितली जाते. एका धनगराला दिसलेले मधमाशांचे पोळे काढण्यासाठी त्याने त्यात काठी खुपसली तेव्हा काठीला शेंदूर लागला. त्याने पोळे काढल्यानंतर तेथे देवीची मूर्ती सापडली, अशीही एक दंतकथा आहे. येथील निसर्गाचे रूप रम्य आहे. डोंगराची कपार खोदून तयार केलेल्या महिरपीत देवीची आठ फूटी मूर्ती आहे. तिला अठरा भुजा आहेत. मूर्ती शेंदूरअर्चित असून, रक्तवर्ण आहे. डोळे टपोरे व तेजस्वी आहेत. सर्व हात एकमेकांना लागून आहेत. सर्व देवांनी महिषासुराशी लढण्यासाठी देवीला शस्त्रे दिली होती. अशा प्रकारचे साडेतीन पिठाची आख्यायिका आहे.




# भारताच्या पाण्यावरही चीनचा डोळा




श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**भारत आणि चीन यांच्यातील वाद काही नवा नाही. १९६२ पासून भारत चीन सीमावाद धगधगत आहे. मागील वर्षात तर दोन्ही देशातील सैनिकांमध्ये अनेकदा चममक झाली. त्यात दोन्ही कडील जवान शहीद झाले. त्यामुळे दोन्ही देशातील तणाव खूप वाढला होता.**

आता हा तणाव आणखी वाढण्याची शक्यता आहे. भारताच्या भूभागावर विशेषतः अरुणाचल प्रदेशवर चीनचा डोळा आहे त्यातच आता चीनने भारताच्या पाण्यावर देखील डोळा ठेवला आहे. हिमालय पर्वतात उगम पावणाऱ्या नद्यांच्या पाण्यावर चीनचा डोळा आहे. याचा ठोस पुरावाच गुप्तचर संशोधक डेमियन सायमन यांनी त्यांच्या ट्विटर हँडलवर शेअर केला आहे. डेमियन सायमन यांनी त्यांच्या ट्विटर हँडलवर एक सॅटेलाईट फोटो ट्विट केला आहे. चीन माबजा झाम्बगो नदीवर एक नवीन धरण बांधत असल्याचा हा फोटो आहे. हे धरण जिथे बांधले जात आहे तेथून काही किलोमीटर अंतरावर भारत - नेपाळ - चीन सीमा मिळतात. जलसिंचनासाठी हे धरण बांधण्यात येत आहे असे चीनकडून सांगण्यात आले असले तरी डेमियन सायमन यांच्या मते या धरणाच्या माध्यमातून चीनला या संपूर्ण क्षेत्राचे पाणी नियंत्रित करायचे आहे. या धरणाच्या माध्यमातून भारतात येणाऱ्या पाण्यावर नियंत्रण ठेवून चीन भारतासह दक्षिण आशियाई देशांवर दबाव आणू इच्छितो. हिमालयात उगम पावणाऱ्या सिंधू, गंगा, ब्रह्मपुत्रा, सतलज, इरावर्दी, साळविन, यांगतसे, मेकाँग या नद्या तिबेटच्या पठारावरून वाहत येतात. त्यामुळे तिबेटच्या पठारावर पाण्याचे मोठे साठे आहे. यातील जवळपास ४८ टक्के पाणी एकट्या भारतात वाहते. चीनचा याच पाण्यावर डोळा आहे. भविष्यात जर भारत चीन युद्ध झालेच तर याच पाण्याचा चीन शस्त्रासारखा वापर करू शकतो म्हणूनच भारताची चिंता वाढली आहे. जर युद्ध झाले तर भारतात येणारे हे पाणी प्रदूषित करून चीन भारताचा अंत पाहू शकतो. जर हे पाणी प्रदूषित झाले तर ते पिण्यायोग्य राहणार नाही साहजिकच त्याचा शेतीवर परिणाम होईल. एकूणच भारताचा भूभाग बळकवण्यासाठी जंग जंग पछाडणारा चीन आता भारताच्या पाण्यावर देखील डोळा लावून बसला आहे त्यामुळे सरकारने अधिक दक्ष राहायला हवे.



# गौतम बुद्धांची एक कथा

आधुनिक केसरी

बुद्ध हे मनोविजयी होते हे सर्वज्ञात आहे. ते नेहमी शांत, सस्मित, आणि प्रसन्न असत. त्यांच्या सहवासात येणारया लोकांनाही या प्रसन्नतेचा लाभ होत असे. पण काही लोक असेही होते की त्यांना गौतमांना मिळणारा सन्मान सहन होत नसे. त्यांचा अगदी जळफळाट होत असे. असाच एक माणूस एकदा गौतमांना रागवावयास भाग पाडायचेच, त्यांचा अपमान करायचाच, फजिती करायचीच असे ठरवून त्यांच्या प्रवचनाच्या ठिकाणी आला. प्रचंड जनसमुदाय जमला होता. तथागत शांतपणे त्या समुदायाला मार्गदर्शन करत होते. तेंव्हा हा माणूस तेथे पोचला आणि सर्वांसमोर त्याने गौतमांना न भूतो न भविष्यति अश्या शिव्या दिल्या. जमलेले लोक अस्वस्थ झाले, संतापलेही. पण तथागत शान्त होते. त्यांच्या चेहरयावरील स्मित जरासुद्धा ढळले नव्हते. तो माणूस बराच वेळ अद्वातद्वा शिव्याशाप देत होता. बऱ्याच वेळाने तो थकून थांबला व डोळे तारवटून गौतमांकडे पहात राहिला.
तथागतांनी स्मितहास्य केले व शान्त स्वरात ते बोलले,
"मी तुला एक प्रश्न विचारू काय?"
"विचारा" तो गुरगुरला.
"जर तुला कोणी एखादी वस्तू भेट दिली आणि ती भेट स्वीकारण्यास तू नकार दिलास तर त्या भेटीवर मालकी कुणाची?" "मालकी?"
"हां, ती भेटवस्तू कोणाकडे राहील?"
"इतकही कळत नाही? सोपं आहे, ती वस्तू त्या देणारयाकडे राहील" तो माणूस म्हणाला.
"अगदी बरोबर!" तथागत स्मित करीत म्हणाले, "मग जर मी तुझे हे शिव्याशाप स्वीकारण्यास नकार दिला तर ते कोणाकडे रहातील?" तो माणूस सुन्न झाला आणि तथागतांच्या चरणी लागला.

**तात्पर्य :** जगात कोण आपल्याला काय बोलेल यावर आपण नियंत्रण ठेवू शकत नाही. पण त्यांच्या स्तुतिशापांचा स्वीकार करणे न करणे हे पुर्णपणे आपल्याच हाती असते. आपण स्वताचा अपमान करून घ्यायचा म्हटला तर तो घोर अपमान होऊ शकतो अन्यथा ते असतात केवळ शब्दांचे बुडबुडे!



तुकारामनीती
भाग 42

# तुका म्हणे ऐसे मावेचे मइंद । त्यापासी गोविंद नाहीं नाहीं ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**जोपर्यंत माणूस सूक्ष्मपणे आत्मपरीक्षण करून आपल्याच वर्गातील अथवा भोवतालच्या लोकांची फसवेगिरी, खोटारडेपणा उजागर करत नाही तोपर्यंत त्याला, त्याच्या लेखन-वाणीला लोकमान्यता प्राप्त होत नाही. याच न्यायाने आत्तापर्यंत अनेक कवी-लेखक-समाजसुधारक-वक्ते होऊन गेले मात्र अगदी बोटांवर मोजता येतील एवढीच नावे लोकप्रवाही आहेत हे सत्य नाकारता येत नाही. यातील काही नावांपैकी एक म्हणजे जगद्गुरू तुकोबाराय! संसारातील व्यथा, वेदना, आवाहनांनी जर्जर झालेले तुकोबांचे जीवन आणि त्यानंतर त्यांना सापडलेला भजन-कीर्तनाचा आत्मानंदी मार्ग हा सर्वच चिंतकांच्या जिव्हाळ्याचा आणि कुतूहलाचा विषय! एक सामान्य संसारिक व्यक्ती ते वारकरी सांप्रदायाच्या कलशस्थानापर्यंतचा तुकोबांचा प्रवास मोठा खडतर आणि वेदनादायी आहे! असे असले तरी तूकोबांनी आपल्या दुःखाचे पाढे न वाचता आपल्या दुःखांना अभंगरूप देऊन मार्गस्थ केले! हेच तुकोबांच्या जीवन जगण्याचे आणि अभंग-कीर्तनाचे खरे गमक! त्यांचे अभंग हेच त्यांच्या दुःखावरील रामबाण औषध म्हणून त्यांनी ते लिहिले. याचे सुंदर उदाहरण म्हणजे**

**बाईल मेली मुक्त झाली । देवें माया सोडविली ॥१॥**
**विठो तुझें माझें राज्य । नाहीं दुसऱ्याचें काज ॥ध्रु.॥**
**पोर मेलें बरें झालें । देवें मायाविरहित केलें ॥२॥**
**माता मेली मज देखतां । तुका म्हणे हरली चिंता ॥३॥**

असं लिहिणं साधी-सोपी गोष्ट नाही. त्यांच्या जीवनातील खडतर परिस्थिती त्यांना आपल्या कार्यापासून थांबवू शकत नाही. जो माणूस स्वतःची गय करू शकत नाही तो माणूस आपल्या भोवतालच्या परिस्थिती आणि लोकांच्या वर्तनाची गय कसा करू शकतो? याचाच परिपाक म्हणजे संत तूकोबांनी आपल्या समकालीन भोंदू, बुवाबाजी करून लोकांची फसवणूक करणाऱ्या बेगडी-वेषधारी संतांना लक्ष केलेले आढळून येते. त्याच अनुषंगाने तुकोबांनी शेवटचे चरण सारखेच असणारे दोन अभंग लिहिले आहेत ते चरण म्हणजे 'तुकाम्हणे मैंद। नाही त्यापाशी गोविंद.' त्यापकीचा हा दुसरा अभंग ज्याद्वारे तुकोबांनी आपल्या समकालीन संत म्हणवणाऱ्या लोकांच्या ढोंगीपणाची लक्तरे वेशीवर टांगली आहेत.

**टिळा टोपी माळा देवाचें गबाळें । वागवी वोंगळें पोटासाटीं ॥१॥ तुळसी खोवी कानीं दर्भ खोवी शेंडी । लटिकी धरी बोंडी नासिकाची ॥धृ॥ कीर्तनाचे वेळे रडे पडे लोळे। प्रेमेंविण डोळे गळताती ॥२॥**
**तुका म्हणे ऐसे मावेचे मइंद। त्यापासी गोविंद नाहीं नाहीं ॥३॥ (शा.अ.गाथा अ.क्र. ७८८)**

हा अभंग वाचताच तुकोबांची भाषा आणि त्यांचे लक्ष वाचकांच्या लक्षात येते. बरीच माणसं केवळ दर्शनाने संत दिसतात. काय काय नाटकं करतात? याचा सविस्तर वृतांत तूकोबांनी इथे दिला आहे. चेहऱ्यावर विविध ठिकाणी गंध लावतात, टोपी, गळ्यात माळा घालून एकप्रकारे पोटासाठी भिकच मागतात. शरीरावर तुळसी माळा किंवा तुळसीची पाने शरीरावर धारण करतात, कानाला गंध लावतात, डोक्यावर शेंडी आणि अधून-मधून आपली बोटे नाकांवर ठेवून वातावरणाचा अंदाज घेतल्याचे नाटक करतात. त्यानंतर या शेंडीवाल्या भोंदू बाबाचे कीर्तन सुरु होते. कीर्तनातील त्याचे वर्तन तर कलाकारीचा सर्वोच्च नमुना असते. घळा घळा रडणे, गडबडा लोळणे, परंतु त्यात कसलेही प्रेम नाही. हा माणूस केवळ आणि केवळ नाटक करतो आहे. याचा परिपाक म्हणजे हे सगळे लोक मावेचे मइंद आहेत. हे सगळे खोटारडे लोक आहेत. अशा भोंदू-नाटकी महाराजांच्या लोकांपाशी कधीही ईश्वर म्हणजे गोविंद असूच शकत नाही असे प्रतिपादन तुकोबा इथे करतात.

सतराव्या शतकातील समाज वर्ण, वंश, लिंग, जाती भेदाने पूर्णतः पोखरून निघाला होता. माणसामाणसांत प्रचंड खोल दरी निर्माण झाली होती. त्यावर कळस म्हणजे कर्मकांडांनी सर्वत्र उच्छाद मांडला होता. बुवाबाजीने समाजात कायमचे घर केले होते. उच्च-नीचतेची समाजाला खोलवर कीड लागली होती. गरिबी, दुष्काळ, रोगराई आणि त्यात सामान्य लोकांची होणारी लुबाडणूक-पिळवणूक तुकोबांना असह्य होत होती. यामुळे तुकोबा व्यथित होऊन अभंग लिहायचे. भगवे कपडे, अंगारा-धुपारा, भानामती, केगामती, मुठ मारणे, करणी, गंडा-दोरा, अंगारे-धुपारे आदींनी समाजात हाहाःकार माजवला होता. 'बुडती हे जन न देखवे डोळा।' या तुकोबांच्याच अभंगाप्रमाणे 'भगवे तरी स्वान । सहज वेश त्याचा ॥ तेथे अनुभवाचा । काय पंथ॥' असे जळजळीत अभंग लिहून तुकोबांनी तत्कालीन धर्ममार्तंडांसी दोन हात केले. यातून तुकोबा क्षुद्र वंशाचे असल्यामुळे त्याचा आणखीनच जाच त्यांना सोसावा लागला. त्यांना लाठ्याकाठ्यानी मार खावा लागला. प्रस्थापितांनी त्यांना जंग जंग पछाडले. त्यांना आपल्या लिहिलेल्या अभंगांच्या वह्या इंद्रायणीत बुडवून टाकण्यास भाग पाडले. त्यांना गावातून हाकलून देण्याचे अनेकवेळा प्रयत्न झाले, परिणामी तुकोबा कधी भंडारा तर कधी भामनाथाच्या डोंगरावर जाऊन भजन करायचे, अभंग लिहायला लागले. हे सगळे तुकोबांना का सहन करावे लागले? याचे उत्तर वरील अभंग क्र. ७८८ आणि अशाच परखड, सडेतोड अभंगात आहे.

संत तुकोबांचे अभंग हे केवळ समकालीन संतांसाठी अथवा भोंदू लोकांसाठी नसून सर्वकालीन भोंदू-नाटकी नौटंकी करणाऱ्या लोकांसाठी आहेत. कोणते वाङ्मय सार्वकालिक असते? जे सर्वकालीन परिस्थितीचे खरेखुरे चित्रण करते. तुकोबांचे अभंग आजही तेवढेच प्रवाही आणि समकालीन वाटतात. याचे कारण म्हणजे ते आपल्या लेखणीने कोणतेही भेद अथवा आपला-परका असा भेद करत नाहीत. याच अनुषंगाने तुकोबाराय **डोई वाढवूनी केस । भुते आणिती अंगास ॥१॥**
**तरी ते नव्हती संतजन । तेथे नाही आत्मखुण॥धृ॥**



**मेळवूनी नरनारी । शकून सांगती नानापरी ॥३॥**
**तुका म्हणे मैंद । नाही त्यापाशी गोविंद॥४॥**

हा आणखी एक अभंग लिहितात. या दोन्ही अभंगांचे शेवटचे चरण जवळपास सारखेच असून ही ओळ सामान्य लोकांच्या, तुकाराम न वाचणाऱ्या एखाद्या वक्ता किंवा लेखकाला सहज पाठ आहे. असे कसे होऊ शकते? याचे कारण म्हणजे चारशे वर्षापासून तुकोबांच्या अभंगांनी समाजमन ढवळून काढले असून ते श्वासासारखे सामन्यांच्या हृदयात प्रस्थापित झाले आहेत.

जगद्गुरू संत तुकोबांचे अभंग आजही तेव्हढेच प्रभावी आणि समकालीन वाटतात. आजसुद्धा परिस्थिती फार सुधारली आहे असे नाही. आज वारकरी सांप्रदायात प्रचंड नौटंकी आणि लुटालूट सुरूच आहे. ज्ञानोबा-तुकोबा आदि संतांच्यावाङ्मयावर पोट भरणाऱ्या भोंदूंनी वारकरी सांप्रदायाचे व्यापारीकरण केले आहे. सगळीकडे अखंड हरीनाम साप्ताह आणि त्यात प्रचंड पैशाची होणारी उधळण हे चित्र सर्वांनाच विचार करायला लावणारे आहे. मी या अगोदरही तुकाराम नीतीत याविषयी लिहिले आहे. अखंड हरीनाम सप्ताहातील कार्यक्रम पूर्णतः बदलले आहेत. सकाळी काकड आरतीच्या भजनाला केवळ तीन-चार भजनकरी असतात आणि तेही त्यांना मृदंगाचार्याची साथ नसते. भाडोत्री दोन-तीन माणसे जीवावर बेतल्याप्रमाणे तर कधी निष्ठेने काकडा भजन करतात. त्यानंतर सप्ताहात संपन्न होणारे श्री ज्ञानेश्वरी पारायण जवळपास बंदच झाले आहे असे म्हणायला हरकत नाही. व्यासपीठावरील वाचक आणि खाली दहा-पाच पोरंसोरं आणि स्त्रिया पारायणास बसताहेत. एक काळ असा होता ज्ञानेश्वरी पारायणास १०० पेक्षा जास्त लोक बसायचे. मी आमच्या गोजेगाव आणि सोनपेठ येथील अखंड हरीनाम सप्ताहात अनेक पारायणे केल्याचे मला आजही आठवते. त्यानंतर अखंड हरीनाम सप्ताहातील गाथा भजन गायब झाले आहे. त्याची जागा आता भागवत (भाकड) कथेने घेतली आहे. अगोदर गाथा भजन अन त्यातून गाथ्याचे वाचन व्हायचे. लोक गाथा भजन ऐकायला यायचे. त्यानंतर प्रवचन व्हायचे. असा हा जुना अखंड हरीनाम सप्ताह आज जवळपास पूर्णच बदलला आहे. यात कळस म्हणजे कीर्तनकार महाराज जाहीरपणे, "वीस हजार असतील तर बोला नाही तर फोन ठेवा" अशी भाषा वापरून कीर्तनाचा व्यापार करत आहेत. एकदमच घरांवर तुळसीपत्रे ठेवून परमार्थ करू नये असे माझे सुद्धा मत आहे; मात्र कीर्तनातून प्रचंड पैसा घेऊन आपले आश्रम आणि मठ उभारले जात असतील तर हे स्वीकारार्ह नाही. यात काही लोक आलेला पैसा जर अनाथाश्रम किंवा अन्य सामाजिक कार्यात खर्च करत असतील तर निश्चितच ही स्वागतार्ह बाब म्हणावी लागेल.

तेंव्हा चला सज्जन बंधू-भगिनींनो, आजसुद्धा आपल्याला तुकोबांचे हे महत्कार्य पुढे घेऊन जायचे आहे. तुकाराम नीतीने तत्कालीन समाज ढवळून निघाला होता आणि तेच कार्य आजही चालू राहावे हा प्रांजळ उद्देश आहे. तुकाराम नीती सगळीकडे अगोदरच प्रसारित झाली असून तुकोबांच्या अभंगातील नितीतत्वे आजही तेव्हढीच प्रभावी आणि लोकोपयोगी आहेत. तुकोबांचे हे अभंग आणि त्यांनी प्रसारित केलेली नीती-तत्वे येणाऱ्या तरूण पिढीला आणि सर्वच समाजाला मार्गदर्शक ठरावी या न्यायाने हे तुकाराम नीती सदर मी लिहित आहे. हे सर्व कार्य जगद्गुरुंचेच असून मी फक्त हमाली करत आहे. या सर्वच अभंगावर आपण सर्वांनी नक्की विचार करून तुकोबांचा गाथा नियमित वाचवा हीच कळकळ व्यक्त करतो आणि तूर्तास थांबतो. जय तुकोबाराय!

# 'सेकंड इनिंग' जीवनाची नवी आवृत्ती



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**बालपण, तारुण्य, वृद्धत्व असे मानवी जीवनाचे विविध स्तर आहेत . जन्माला आलेला प्रत्येक जण या क्रमाने मार्गक्रमण करत असतो. सुरूवातीच्या धकधकीच्या आयुष्यात माणुस नोकरी, घर- संसार, जबाबदाऱ्या यात गुंतलेला असतो. रोजचा दिनक्रम पाळत जगत असतो. आपल्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर वयाच्या ठरावीक टप्प्यावर जाणीव होते 'ज्येष्ठत्वाची' . सुरूवातीचा काळ इतरांसाठी जगण्यात जातो.**

काळ थांबत नाही. तो पुढे जात राहतो. वयाचा हा टप्पा स्वतः साठी काही करण्याची, स्वतःला आनंद मिळवून देण्याची जाणीव करून देत असतो. प्रत्येक मनुष्याला ह्या टप्प्यातुन जायचे आहे. वय हा फक्त आकड़ा असतो, मनाला वयाचे बंधन नसते. फक्त वयाने ज्येष्ठत्व प्राप्त झाले असे नाही. विचारांची प्रगल्भता, सतत काहीतरी करण्याची, नवीन शिकण्याची धडपड तुम्हाला विचारांनी ज्येठ बनवतात.सेकंड इंनिग म्हणजे जीवनाची नवी-कोरी आवृत्ती याची प्रचिती देणारे पुस्तक म्हणजे "सेकंड इंनिंग" . लेखिका कुमुदिनी बल्लाळ यांनी लिहिलेले हे पुस्तक म्हणजे मनाला नवी ऊर्जा देणारे आहे. शारदा प्रकाशनाने हे पुस्तक प्रकाशित केलेले आहे. लेखिका कुमुदिनी बल्लाळ ह्यानी दैनिक ठाणेवैभव मध्ये सेकंड इंनिंग या सदरातून अनेक अशा व्यक्तिमत्त्वाचा परिचय यात करून दिला, जे आपल्या वयाच्या या टप्प्यातही उत्स्फुर्तपणे कार्य करीत आहेत. काही नवीन काही शिकण्याचा प्रयत्न करत आहेत, कोणी समाजाप्रति आपले कर्तव्य पार पाडत आहेत. कोणी कलाकुसर करत आहे, आपले छंद जोपासत आहेत. अशा व्यक्तींचा शोध घेऊन, त्यांच्या मुलाखती घेऊन एक वेगळं सदर कुमुदिनी बल्लाळ यांनी लिहिले आणि त्या मुलाखतींचा संच पुस्तक रुपात वाचकांसाठी उपलब्ध झाला. विशेष म्हणजे लेखिका स्वतः ज्येष्ठ असून आपला वेळ प्रेरक व्यक्तिमत्त्व समाजासमोर यावेत यासाठी सत्कारणी लावत आहेत, हेच किती प्रेरणादायी आहे. असा उत्साह पाहुन इतरांना का जगण्याचा उत्साह येणार नाही ? 'सेकंड इंनिग' ह्या पुस्तकात ५० मुलाखतीचा समावेश आहे. ह्या मुलाखती वाचताना जाणवते, अशा किती तरी व्यक्ति आहेत, ज्या समाजासाठी निःस्वार्थपणे कार्य करत आहेत, ज्यांचे कार्य लोकांसमोर आले नाही. अशा प्रेरणादायी, चैतन्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाना प्रकाशात आणण्याचे काम आपल्या लेखणीतून लेखिकेने केले आहे. सुरूवातीचा धावपळीचा काळ संपवून स्वतःचा आनंद शोधता शोधता इतरांना कशी मदत होईल, साहाय्य होईल या दृष्टिने अनेक ज्येष्ठ नागरिक कार्य करताना दिसतात. हे वय असे असते जिथे आपल्या माणसांची सोबत हवी असते, एकटेपणा नको असतो.त्यांमुळे आपल्याच वयाच्या व्यक्तिसोबत वेळ घालवण्यात आनंद मिळतो. ज्येष्ठत्व आलं म्हणजे अनेक व्याधि सुद्धा जड़तात. डोळ्यांनी कमी सायला लागतं, कमी ऐकू येतं किंवा पाय दुखणं इत्यादी ..पण तरीही ह्या सगळ्या व्याधिवर मात करत अनेक ज्येष्ठ नागरिक आपले छंद जोपसताना दिसतात, विविध कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतात. वय झालं म्हणून, किंवा जीवनात अनेक अडचणी असल्या तरी जिद्दीने जगण्याची ऊर्जा ,सकारात्मक दृष्टि देणारे 'सेकंड इंनिंग' हे पुस्तक वाचनीय आहे. आनंद हा छोट्या -छोट्या गोष्टीमध्ये दड़लेला असतो, तो शोधावा लागतो. दुःख आपोआप होतं, आनंद शोधावा लागतो. ज्येठत्व हे दूसरे बालपण असतं, ते तसेच जगायला हवे.

लेखिका कुमुदिनी बल्लाळ यानी आपल्या मनोगतात सांगितले आहे की , ह्या लेखनात त्यांना निखिल बल्लाळ म्हणजेच त्यांचे नातू यांच्यामुळे प्रेरणा मिळाली, ऊर्जा मिळाली. ह्या मुलाखतींना संपादक मिलिंद बल्लाळ यांनी मनोवेधक शीर्षके सुचवली. ह्या पुस्तकाला शोभना सुभेदार यांनी प्रस्तावना लिहिली आहे. पुस्तकाच्या मुखपृष्ठाची संकल्पना अनुराधा एकतारे यांची आहे आणि वसुधाताई जोशी यांनी समर्पक मुखपृष्ठ रेखाटले आहे. लेखिकेचा आणि या पुस्तकात ज्यांच्या मुलाखती आहेत त्या ज्येष्ठ नागरिकांचा उत्साह तरुणाईला लाजवेल असाच आहे. ज्येष्ठ नागरिकांनी पिंपळपानासारखे जगायला शिकले पाहिजे; कारण जाळी झाली तरी आयुष्याच्या पुस्तकात आपले अस्तित्व इतरांनी पिंपळपानासारखे जपून ठेवले पाहिजे, ही ओळ सकारात्मक आयुष्य जगण्यासाठी पुरेशी आहे. ही सेकंड इंनिंग नक्की अनुभवा !

**(सेकंड इंनिंग / लेखिका कुमुदिनी बल्लाळ / शारदा प्रकाशन / मूल्य : १०० रुपये)**
**- अस्मिता प्रदीप येंडे**




# ऊस वाहतूक

आधुनिक केसरी

भारत देश जगात कृषीप्रधान म्हणून ओळखला जातो देश स्वतंत्र होऊन 75 वर्षे झाली स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा होत असताना देखील देशातील शेतकऱ्यांचा वनवास आजही संपलेला नाही हेच खरे येथील शेतकरी ऊन, वारा, थंडी, पाऊस याची तमा न करता आपल्या मुलासारखे पिकांना जपतो त्याचे पालन पोषण करतो मात्र शेती पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असल्याने पुर, अतिवृष्टी, शेतमालाला योग्य भाव न मिळणे यासारख्या कारणामुळे शेतकऱ्यांच्या नशिबी पुन्हा तोटाचं पाचवीला पुजलेले आहे शेतकऱ्यांना ना बोनस,ना फंड, पेन्शन, ग्रॅज्युटी मात्र तोट्याला पुढे असणाऱ्या शेतकऱ्यांची ईडापिडा टळलेली नाही ऊस



शेती पिकवताना रात्री, अपरात्री, हिंस्त्र प्राणी, सापासारख्या प्राण्याच्या अंगावर पाय ठेवून शेती पिकवावी लागते गळीत हंगामासाठी ऊस साखर कारखान्यांना बैलगाडी, ट्रॅक्टर, ट्रक या वहानाद्वारे पाठविला जातो मात्र रस्त्यांवरुन ते कारखान्यापर्यंत या वाहनांमधून ऊसाच्या मुळ्या मोठ्या प्रमाणात पडत जात असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे ही चूक कोणाची ? ट्रॅक्टर ड्रायव्हरची की ऊस भरणाऱ्यां मजुरांची की आणखी कोणाची ? असा सवाल उपस्थित होत आहे रस्त्यांवर पडलेल्या मुळ्या अथवा बिंड्यांचा वापर लोक पाणी गरम करण्यासाठी करत आहेत शेतकऱ्यांच्या शिवरातून कारखान्यांपर्यंत ऊस सुखरुप पोहोच करणे ही ट्रॅक्टर ड्रायव्हरची तर ऊस रस्त्यात पडणार नाही याची काळची घेवून ऊस वाहनात भरुन देणे ही जबाबदारी ऊस तोड मजुरांची नाही का ? कशाचीही तमा न करता शेतकरी अहोरात्र काबाडकष्ट करुन पिकवलेल्या ऊसला रस्त्यावर टाकून जाणे कितपत योग्य आहे ? शेतकरी या सर्व यंत्रणेला खूष करुन सुद्धा असा प्रकार केला जातो याला काय म्हणावे ? याकडे साखर कारखाना प्रशासन लक्ष देवून या प्रकाराला आळा घालेल का ?

**राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

# भारतीय कापूस दर स्थिर राहणार की वाढणार ?

आधुनिक केसरी

**भारतात मागील दोन महिन्यांपासून कापसाचे भाव घसरलेले आहेत. त्यामुळे देशातून कापूस निर्यात वाढायला सुरुवात झाली आहे. यावर्षीच्या हंगामाच्या सुरुवातीला आंतरराष्ट्रीय बाजारातील दरापेक्षा भारतीय कापूस महाग असल्याने निर्यात घटल्याचे सांगितले जात होते. ही परिस्थिती आता बदलली असून पुढील काळात भारतीय कापसाला मागणी वाढू शकते, असा निर्यातदारांचा अंदाज आहे. अमेरिका आणि पाकिस्तानमध्ये कापसाचे उत्पादन घटलेले आहे. त्यामुळे भारतीय कापसाला उठाव मिळू शकतो. त्या अनुषंगाने कापसाच्या दराला आधार मिळेल, असंही काही अभ्यासक सांगत आहेत.**

देशांतर्गत बाजारपेठेत मागील काही दिवसांपासून कापसाचे भाव कमी झालेले आहेत. सध्या कापसाला सरासरी ८ हजार ते ८ हजार ५०० रुपये क्विंटल दर मिळत आहे. खंडीचा भाव ६१ हजार रुपयांवर पोहचला. एका खंडीमध्ये ३५६ किलो रुई असते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय दराच्या तुलनेत पडतळ (पॅरिटी) मिळाली आहे. परिणामी, देशातून कापूस निर्यात वाढल्याचे निर्यातदारांनी स्पष्ट केले. देशात कापसाचे भाव घसरल्यानंतर निर्यातीसाठी मागणी वाढली आहे. सध्या बांगलादेशातून भारतीय कापसाला मागणी आहे.

कापसाचे सध्याचे दर टिकून राहील्यास इतर देशांकडूनही मागणी येण्याची शक्यता असल्याचे निर्यातदारांनी सांगितले. भारतात यावर्षी कापसाच्या दरावरून मोठे घमासान सुरु आहे. गेल्या वर्षी कापसाला चांगला भाव मिळाल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. त्यातच यावर्षी प्रतिकूल हवामानामुळे कापसाची उत्पादकता घटल्याने शेतकरी कमी दरात कापूस विकायला तयार नाहीत. तर उद्योजकांना मात्र कमी दरात कापूस हवा आहे. बाजारात दर कमी झाल्यानंतर शेतकरी कापसाची विक्री कमी करतात. त्यामुळे आवक रोडावते आणि उद्योजकांना जास्त प्रमाणात कापूस मिळत नाही.

निर्यातदारांच्या मते भारतीय कापसाचे भाव जास्त असल्याने चीनसारख्या देशांकडून मागणी नाही. पण सध्याच्या भावपातळीपेक्षा कापसाचे भाव कमी होण्याची शक्यता खूपच कमी असल्याचे अभ्यासकांनी सांगितले. भारतीय कापसाचे दर आंतरराष्ट्रीय किंमतींच्या तुलनेत जास्त आहेत, असा दावा करताना इंटरकॉन्टीनेन्टल एक्सचेंज अर्थात आयसीईवरील वायद्यांचा दाखला दिला जातो. मार्च महिन्यातील वायद्यांच्या तुलनेत भारतातील आजचे दर किती जास्त आहेत, याची चर्चा केली जाते. पण काही जाणकारांच्या मते ही तुलना चुकीची आहे.

भारतात सध्या कापसाचे वायदे बंद आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातील वायद्यांशी तुलना नको. जगातील प्रत्यक्ष खरेदीचा दर अर्थात कॉटलूक ए इंडेक्सशी भारतीय दराची तुलना



करायला हवी. कॉटलूक ए इंडेक्स आणि भारतीय कापसाचे भाव जवळपास एकाच पातळीवर आहेत. त्यामुळे भारतीय कापूस महाग असल्याची ओरड चुकीची आहे, असं या अभ्यासकांचं मत आहे. कॉटन असोसिएशन ऑफ इंडिया अर्थात सीएआयने यावर्षी देशातून ३० लाख गाठी कापूस निर्यातीचा अंदाज व्यक्त केला. तर अमेरिका कृषी विभागाचा (यूएसडीए) निर्यातीचा अंदाज ४० लाख गाठींचा आहे. मागील हंगामात भारताने ४३ लाख गाठी कापसाची निर्यात केली होती. सध्या भारतातून दोन लाख गाठी कापूस निर्यात झाल्याचे सांगितले जाते. पुढील काळात कापूस निर्यात वाढणार असल्याचे निर्यातदारांचे म्हणणे आहे. यावर्षीच्या हंगामाच्या सुरुवातीला कापसाच्या दरात मोठे चढ-उतार बघायला मिळाले. त्यामुळे उद्योजकांकडून कापूस दर स्थिर होण्याची वाट बघितली जात होती. आता देशातील कापूस दर एका पातळीवर स्थिर असल्याने सुतगिरण्यांनी कापूस खरेदी सुरु केली आहे. सध्याची दरपातळी कायम राहील, असा उद्योजकांचा अंदाज आहे. शेजारच्या पाकिस्तानमध्ये यावर्षी कापूस उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले. तसेच पाकिस्तानला कापूस पुरवठा करणाऱ्या अमेरिकेतही उत्पादन कमी झाले. त्यामुळे पाकिस्तानने उद्योग सुरु ठेवण्यासाठी आंतरराष्ट्रीय बाजारातून कापूस खरेदी केल्यास भाव वाढतील. या दरवाढीचा फायदा भारतीय कापसालाही मिळू शकतो. पण सध्या पाकिस्तानची आर्थिक स्थिती हलाखिची आहे. त्यामुळे पाकिस्तानने आयात कमी केली तर त्यांचे कापड उत्पादन कमी होईल. त्यामुळे भारतीय कापडाला उठाव मिळू शकतो, असे या क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे.

**शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९**

# बागेश्वर धाम सरकार, विज्ञान आणि अंधश्रद्धा



जयेश अर्जुन माधव
संपर्क 9167710614

आधुनिक केसरी

**सोशलबागेश्वर धाम सरकार, विज्ञान आणि अंधश्रद्धा मिडियावर सध्या बागेश्वर धाम सरकार ट्रेंड करत आहेत एक दोन व्हिडिओ मागे बागेश्वर धाम सरकारचा व्हिडिओ समोर येत आहे एवढी प्रचंड क्रेझ निर्माण झाली आहे. देश विदेशात बाबांचा डंका पिटला जात आहे. ज्याच्या त्याच्या तोंडी बागेश्वर धाम सरकार यांचे नाव आहे. हे बागेश्वर धाम सरकार म्हणजेच पंडित धीरेंद्र शास्त्री होत. बागेश्वर धाम वाले बाबा धीरेंद्र शास्त्री महाराष्ट्रात आले आणि सर्वश्रुत झाले.**

तोपर्यंत ते काही मोजक्याच जणांना माहिती होते. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष श्याम मानव यांनी त्यांच्यावर अंधविश्वास पसरवण्याचे आरोप केले आणि त्यांना आव्हान दिले आणि लगेचच बाबा महाराष्ट्रातून निघून गेले. त्यामुळे बाबा घाबरून पळून गेले अशी चर्चा व्हायला सुरुवात झाली. बाबांनी आपल्या बागेश्वर धाम मध्ये जाऊन अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे आव्हान स्वीकारले. त्यांच्या म्हणण्यानुसार ते साधुसंत नसून सनातन धर्माचे प्रचारक आहेत आणि आपल्या धर्माचा प्रचार करण्याचा सर्वांना अधिकार आहे.

धीरेंद्र शास्त्री यांचे त्यांच्या दरबारातील व्हिडिओ बघितल्यावर असे लक्षात येते की, त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समिती, पत्रकार यांना तर आव्हान दिलेच आहे पण त्यांनी धर्माचा आधार घेऊन विज्ञानालाही आव्हान दिले आहे. शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी विमानाचा शोध लागला आणि देश परदेशात फिरणे सोयीचे झाले विमानाच्या सहाय्याने हे शक्य झाले पण रामायणात रावणाने सीतेला पुष्पक या विमानाने लंकेला नेले, हे तर हजारो वर्षांपूर्वी लिहून ठेवले आहे म्हणजे विमान ही संकल्पना तेव्हा अस्तित्वात होती पण रामायण हा धार्मिक ग्रंथ आहे. त्यामुळे सत्य मानायला कोणी तयार नाही. अग्निबाण ही संकल्पना रामायण महाभारतात होती आणि आज आपण ती प्रत्यक्षात पाहत आहोत या संकल्पनांना आपण विमान ,अग्निबाण अस्तित्वात यायच्या अगोदर अंधश्रद्धा मानत होतो. हे कसं शक्य आहे? असं समजत होतो मग आज या संकल्पना प्रत्यक्षात वास्तव जीवनात आपल्या जीवनाचा भाग बनल्यावर आपण असं काहीतरी असू शकतं हे का नाही मानत? विज्ञान तेव्हाही होतं आणि ते आजही आहे काही गोष्टी विज्ञानाला आजही समजलेल्या नाहीत त्या गोष्टींना अंधश्रद्धा मानून कसं चालेल? काही वर्षांनी विज्ञान त्या मागचा वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्ट करेल तेव्हाच या सर्व गोष्टी आपण मानणार का आणि स्वीकारणार का? धीरेंद्र शास्त्री यांनी विज्ञानासमोर आव्हान उभे केले आहे. हे सत्य नाकारून चालणार नाही. एखादा लकवा मारलेला व्यक्ती लंगडत,धडपडत येतो, हात जोडतो आणि काही क्षणात तो व्यवस्थित चालू लागतो एवढेच नाही तर धावू लागतो. हे काय आहे? यामागेही काहीतरी विज्ञान असेलच ना? या विज्ञानाचा शोध घेण्याची जबाबदारी आता वैज्ञानिकांवर येऊन ठेपली आहे. धीरेंद्र शास्त्री यांच्या प्रत्येक चमत्कारामागे विज्ञान असेलच. त्यामुळे त्या वैज्ञानिक गोष्टींचा शोध लावून त्या गोष्टी सर्वसामान्यांपर्यंत कशा पोहोचतील याची जबाबदारी आता विज्ञाननिष्ठ लोकांवर येऊन पोहोचली आहे. लकवा मारलेली व्यक्ती किंवा सतत आजारी असलेली व्यक्ती जीवाला कंटाळलेली असते. मानसिक रोगी ही सततच्या आजाराला कंटाळलेले असतात असे रोगी अनेक वर्षे डॉक्टरांची औषधे खात असतात. जर हे रोगी काही मिनिटात बरे होणार असतील तर लोक डॉक्टर कडे का जातील? ते त्या बाबांकडेच जातील ना! हे बरे होण्याचे शास्त्र काय आहे? याचे औस्तुक्य प्रत्येकालाच आहे. हे शोधून काढण्याचे काम विज्ञानाला करावे लागेल. उगाच ढोंगी म्हणून अटकाव करण्यापेक्षा त्या मागचे शास्त्रीय कारण शोधून ते जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी आता तुमच्यावर येऊन ठेपली आहे हे धीरेंद्र शास्त्री यांना विरोध करणाऱ्या सर्वांनीच लक्षात घ्यायला हवे. आयुर्वेदाला आपण स्वीकारलेच ना! संमोहन विद्या अनादी कालापासून अस्तित्वात आहे. अनेक ऋषीमुनी या विद्येत पारंगत होते आज हीच विद्या हिप्नॉटिझम म्हणून आपल्याला सर्वश्रुत आहे.



हिप्नोथेरपी जगत मान्य झाली आहे. एवढेच नव्हे तर याच संमोहनाने कुठलीही भूल न देता ऑपरेशनही केली जात आहेत. हीच संमोहन विद्या त्याकाळी अंधश्रद्धा होती का?

पंडित धीरेंद्र शास्त्री यांनी अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. त्या प्रश्नांची उत्तरे विज्ञानाकडे असायलाच हवीत. उगाच त्यांना आव्हान देऊन काय होणार? उलट तेच तुम्हाला आव्हान देत आहेत. त्यांचे आव्हान स्वीकारा आणि जगाला एक नव्या विद्येचा साक्षात्कार घडवा. धीरेंद्र शास्त्री जर चमत्कार करत असतील तर त्यामागे काहीतरी विज्ञान असेलच. काहीतरी शास्त्र असेलच. त्या शास्त्राचा शोध घेणे आवश्यक आहे. सोशल मीडियावर शास्त्रींना अनेक प्रश्न विचारले जातात. हे प्रश्न त्यांच्या दरबारात जाऊन विचारा आणि त्यांची उत्तरे घ्या पण असे कोणीही करताना आढळत नाहीत. एरवी बोंबाबोंब करणारी मीडिया ही हातबल झालेली दिसत आहे. मीडिया रिपोर्टरच शास्त्रींच्या चमत्काराला बळी पडत आहेत. ते सत्य काय सांगणार आहेत? खरंतर मीडियाने ज्या लोकांना धीरेंद्र शास्त्रींच्या दरबाराचा लाभ झाला, जे लोक आजारपणातून बरे झाले अशा लोकांना गाठून सत्य जनतेसमोर मांडले पाहिजे जर खरोखरच लाभ झाला असेल तर विज्ञाननिष्ठ लोकांनी त्यांची दखल घ्यायला हवी आणि काहीच फायदा होत नसेल तर कायद्याचा वापर व्हायला हवा पणअसेही काहीच होताना दिसत नाही. बागेश्वर धाम दरबारात सगळीकडे कॅमेरे लावलेले असतात. मीडियावाले ही उपस्थित असतात पोलीस यंत्रणा ही सेवेत असते आणि हजारो लाखो जनसमुदायासमोर हे चमत्कार होत असतात, असे असताना विज्ञानाच्या कसोटीवर न पारखताच पाखंडी असे म्हणून हिणवणे कितपत योग्य आहे?




# माझं चुकलं

आधुनिक केसरी

आपण नकळत कधीतरी कोणाचेतरी मन दुखावतो. कधी आपल्याला राग आलेला असतो. तर कधी बोलण्याच्या ओघात आपले आई वडिल, मित्र किंवा जवळची माणसं यांच्या बाबतीत हे नेहमीच घडताना दिसते. पण त्या नंतर आपला 'इगो' एवढा मोठा झालेला असतो कि आपण आपला राग शांत होऊन सुद्धा SORRY बोलायला तयार नसतो. खरं तर SORRY हा एवढा सुंदर शब्द आहे जो माणसांना जोडतो. समोरच्या माणसाचा राग शांत करण्यास मदत करतो. SORRY बोलण्याने किंवा माफी मागीतल्यामुळे आपण छोटे होत नाही तर आपल्यातला इगो संपवण्याचे काम हा शब्द करतो. माफी मागणे किंवा समोरच्याला माफ करणे म्हणजे आपण मनाने मोठे झाल्याचे लक्षण आहे. माफी किंवा SORRY हा छोटासा शब्द आहे पण माणसे जोडणे , गैरसमज दूर करणे, तुटलेले संबंध पुन्हा जोडणे, इगो मुळे होणारे नुकसान टाळणे एवढे मोठे काम करतो.

**जयेश अ. माधव**

# छोटा मोह टाळता आल्याशिवाय मोठ्या मोहाकडे पाठ फिरवता येत नाही



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**मोह म्हणजे हव्यास आणि हव्यास म्हणजे फक्त हवंच नको काहीच नाही. किती हवं याचा थांगपत्ता नाही. कशासाठी हवं याचा सुद्धा कधी कधी भान राहतं नाही. पण हव्यास एकदा का मेंदुत शिरला कि तो त्याच कार्य करूनच थांबतो . म्हणून हव्यास हा चांगला पण ठरू शकतो. आणि घातक पण ठरू शकतो मोह हा नेमका कशाचा आहे. त्यावर त्याचे चांगले वाईट परिणाम अंवलबून असतात. मोह , सत्याचा, न्यायाचा,ईमनादारीचा, निस्वार्थतेचा , प्रमाणिक धर्म निष्ठ आचरणाचा, सात्विक वृत्ती जोपसण्याचा , सत्याचा साक्षात्कार होण्याचा, आध्यत्मिक मार्गावर मार्गक्रमण करण्याचा, असेल तर हे सर्व मोह जीवनाला सार्थकतेकडे घेऊन जातात.आणि याविरुद्ध जर मोह ,नाव पद, पैसा, संपत्ती, प्रसिद्धी, प्रतिष्ठा ,मोठेपणा, इत्यादी बाबींचा असेल तर तो योग्य वेळी आवरता आलाच पाहिजे.**

नाही तर त्याच रूपांतर हे व्यसनाधिनते मध्ये झाल्याशिवाय राहणार नाही.जर मोहाच व्यसनात रूपांतर होऊ देयच नसेल तर सुरवातीला छोटा मोह हा टाळताच आला पाहिजे.एकदा का जीव मोहाच्या नौकेवर स्वार होऊन सुसाट झाला कि मग तो आपल्याला समुद्रात बुडलवल्याशिवाय राहत नाही. आणि बुडे पर्यंत आपल्याला पण फार काही कळतं नाही . बुडाल्या नंतर लक्षात येऊन सुद्धा नंतर काही अर्थ नाही म्हणून मोह कोणाताही असो सावध पवित्रा घेण हेच हितकारक असत. कोणत्याही विषयाची सुरुवात निर्मिती हि कधीही शुन्यातून म्हणजे अगदी छोट्या बाबी पासून होते . सुरवात हि कधी पण लहानच असते .मग ती चांगल्या विषयाची असो कि वाईट पण सुरवातीला लहान दिसणारी बाब नंतर अक्राळ विक्रळ रुप धारण करते .हिच बाब आपल्याला पहिल्या टप्प्यात म्हणजे अगदी सुरुवातीला समजली तर आपण सुरवातीला रोखु शकतो . आणि खूप मोठ्या नुकसानी पासुन आपण वाचतो .म्हणून छोटा मोह रोखता आला तर अगदी मोठ्या मोहाकडे पाठ फिरवता येते .कोणत्याही विषयाची सुरवात आरंभ हा जरी कधीही लहान लहान गोष्टी पासून होत असला तरी .जो व्यक्ती लहान सहान गोष्टी मध्ये अडकत नाही फसत नाही. तो उद्या मोठ्या विषया मध्ये सुद्धा फसत नाही .जीवन आणि मोह हे नातं जरा विचित्रच असतं . जीवाला कधी कशाचा मोह होईल आणि त्या मोहापायी कधी आपलीच शिकार होईल हे आपल्याला थांगपत्ता सुद्धा लगणार नाही.मोह हा एक प्रकारचा नसतो .सृष्टी वर अनेक बाबी आहेत ज्यामध्ये,नाव पद पैसा, प्रतिष्ठा, प्रसिद्धी, मोठेपणा, वगैरे वगैरे मोहाच्या प्रत्येक प्रकारचा स्वरूप वेगळं असतं .क्षेत्र कोणतही असेल त्या क्षेत्रात आपणं दैनंदिन वावरत असताना आपल्याला अनेक अनुभव प्रत्याक्षात अनुभुतीस येतात कि आपल्या कडे जर लाभाच पद असेल तर अनेक लोक आपल्याला सुरवातीला छोटी छोटी प्रलोभने देण्याचा प्रयत्न करून जवळीक साधतात आणि आपण सुद्धा छोट्या छोट्या प्रलोभनाला बळी पडतो म्हणजे अगदी सुरुवातीला एक चहाचा कप हे सुद्धा प्रलोभनच तो एकदा घेतला कि ज्याने पाजला तो दुसरं किती ही मोठं प्रलोभन देण्यासाठी मोकळा झाला.आणि आपणही एकदा चहाचा कप स्वीकारला असल्याने मोठ प्रलोभन म्हणजे मोठा मोह टाळु शकत नाहीत.हि वस्तुस्थिती आहे. मग हाच मोह व्यसन म्हणुन उदयास येतो.आणि आपल्या जीवनाच वाटोळं करून सोडतो.पण हि गोष्ट आपल्याला सुरवातीला कळत नाही. आपण कसं मोहाच्या सापळ्यात अलगद अडकतो हे आपल्याला हि कळत नाही. व्यावसायिक मोहाची बाब सोडली तरीही दैनंदिन आयुष्याशी निगडीत मोहाच्या बाबी मध्ये पद ,पैसा, संपत्ती, मोठेपणा, प्रसिद्धी,हे मोह तर एवढे भयानक आहेत या मधुन आपण स्वतःला वेळीच सावरू शकलो नाहीत तर मग एक दिवस आपण खुप मोठ्या नुकसानीला सामोरे जाऊ . त्या मुळे आपण स्वतःला सावरुन छोट्या मोहा मध्येच आटोक्यात घेतल तर आपण मोठ्या मोहाकडे पाठ फिरवू शकतो . म्हणून वेळीच जागृत होणं गरजेचं आहे. स्वतःला मोहापासून दूर ठेवण्यासाठी आध्यत्मिक ज्ञान असणं खूप गरजेचं आहे.

## ।।ऐका हो पांडुरंगा।।



घेईल गोड नाम तुझे वाचेने
माझिया।
स्थिरहोतील लोचने
समचरणीतुझिया।।
ऐका रे कान हो विठुरायाचे
गणगान।
हातांनो करा रे करा
हरिभजन।। पाऊले चाला रे
पंढरीची वाट।
जीवलगाची होईल
भेटगांठ ।।लागु दे माझा
नश्वर देह कारणी।
धाव घेई मना विठ्ठलाचे
चरणी।।
नको सोडू जीवा हा भगवंत ।
चरणी माथा ठेवुनी करू
दंडवत।।
विसर न व्हावा तुझा श्रीरंगा।
माझी विनवणी ऐका हो
पांडुरंगा।।

आहेर वा.र., नासिक
9958782982

## भूमी

ओझरताना सायंकाळी
सूर्यास त्या पाहिले
क्षितिजावर विसावताना
तुलाच मी आठवले
चालताना वाटेवरती
जलदांनाही सवे घेतले
उदयालाही येणार्या चंद्रासही
प्रश्न पुसले
घरट्याकडे परतताना पक्षी
अलगद दिसुन गेले
चित्रातल्या रंगांसोबत
आकाशही हसू लागले
निसर्गाला पाहता असे
तुझेच हासू स्मरू लागले
निजतानाही धरणीवरती
कुशीत तुझ्या शिरू पाहिले
दाट धुक्याच्या गर्द वावरी
अस्पष्टसे काही भासले
थकलेल्या शरीराला मग
तुझ्याच गं मिठीत पाहिले

- © स्वानंद
नंदकुमार मराठे

## बापाची सावली मात्र असावी

बातमी येता कानी, मोठा हंबरडा फोडला
उपयोग नाही झाला, तो वाऱ्यासवे विरला
वाट बघून रात्र झाली, प्राणज्योत मावळली
बघितलं होतं जग मी, ज्या मांडीवर बसून
मी बसले होते आज, मांडीवर डोकं घेवून
सांगितलं बायांनी, शेवटचं बघून घे...
आज रडायचं तेवढ, मनमोकळ रडून दे
आज ही आता, तुमची शेवटची गाठ,
माग जरी गेली तू, दिसल का तुला पाठ
थरथरत्या हातांनी, कपाळावर हात ठेवला,
सगळे रडत होते, पण देह का विसावला
आयुष्यभराची कमाई, मागं सोडली होती,
जगण्याची लढाई, आज हरली होती
मायेच्या दुनियेत, सर्वस्व गेलं हरवून,
पोरांच्या सुखासाठी, याल का परतून
थरथर करीत होता, जीव अंत असा पाहुनी,
ऊभी होते, जेव्हा घागर पाण्याची घेवूनी...
पाणी आलं, तिथे प्रत्येकाच्या डोळ्यात,
कसं पेलावं दुःख, एवढ्या कोवळ्या वयात
रडून झालं, सगळ्यांचं अग्निडाग दिला,
मोठ्या दुःखात सोडून, गेले माझ्या आईला
चटके लागतील ओ, काढून घ्या ना कुणी,
असं नको करु पोरी, घे तू आता समजुनी
घागर आमच्या खांद्यावरची, घेतली फोडूनी,
सांगून दिलं पोरांनो, बाप गेलाय सोडूनी.
आठवण आली तर, तुमचं तुम्ही रडायचं,
तुमची लढाई आहे, आता तुम्हीच लढायचं.
आला दिवस, आठवणीत जातोय,
परतुनी या ना..! वाट खूप बघतोय
देवा, आज एक मागणं तुला...
का? लावतोस रे तू, असं झुरायला.
नको नेवू रे... असं कोणाच्या बापाला
जपावं लागत रे... जगात ठेवतांना पावलाला.
जेवायला एक वेळ, भाकरी सुद्धा नसावी,
पण पिलांवर बापाची सावली मात्र असावी...
...बापाची सावली मात्र असावी

कु. रोहिणी पंडित मोरे,
नाटेगाव, ता. कोपरगाव

## काय आहे?




शरीराला जखम झाली
तर औषध आहे
हृदयावर घाव झाले
तर काय आहे?
ढग बरसायला लागले
तर छत्री आहे
डोळ्यातून अश्रू वाहले
तर काय आहे?
पायाला काटा टोचला
तर काढायला सुई आहे
मनाला शब्द टोचले
तर काय आहे?
भीती आडवी आली
तर पळायला रस्ता आहे
अहंकार आडवा आला
तर काय आहे?
एखादी गोष्ट जळाली
तर विमा आहे
पण स्वप्नच जळाले
तर काय़ आहे?
कोणतीही वस्तू तुटली
तर जोडायला पर्याय आहे
शेवटी माणूसच तुटला
तर काय आहे?

शब्दस्पर्शी- सुनील शिरपुरे
कमळवेल्ली, यवतमाळ
भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९

## शिक्षक

शिक्षकांच्या ध्यानी मनी
नुसती शाळा नि शाळा
ज्ञानियाचा तिसरा डोळा
सुविचारी सुसंस्कारीत
शिक्षण शिकवण्या
नको आळस कंटाळा
हसत मुखाने भरवि
शिक्षणमेळा शिक्षणमेळा
विद्यार्थी हेच माझे धन
ज्ञानशिदोरी देण्या मन
निर्भयतानं जीवन जगण्या
बल देतात हे भारी
ज्ञानदान करी ज्ञानदान करी
तयाच्या घरी दारी
लक्ष्मी पाणी भरी
एकचि ध्यास
करू विद्यार्थ्यांचा
सर्वांगीण विकास
शिक्षक शाळा पवित्र मंदिरी
देई विद्यार्थ्यांशी ज्ञानशिदोरी
शिक्षकांच्या ध्यानी मनी
नुसती शाळा नि शाळा
म्हणुनचं तर म्हटल जातं
ज्ञानियाचा तिसरा डोळा

मल्हारराव डोणगावकर
मो.9637937579



## प्रजासत्ताक दिन...!

अंधारातून स्वातंत्र्याची वाट पाहता
अखेर आम्ही स्वतंत्र झालो आता-आता,
राजगुरु- भगतसिंग बोलले जाता-जाता
रक्ताच्या थेंबातून जय-जय भारत माता.
राहू आम्ही इथे विविधतेने नटले
अवघे जीवन क्रांतीवीर हे झटले,
भारतात स्वातंत्र्याचे तुफान उठले
सारे देशभक्तांना हे विचार पटले.
प्रजासत्ताक राष्ट्र भारत सरकार
इथे थोर रत्न फुले-शाहू- आंबेडकर,
आम्ही माथा टेकतो आपल्या चरणावर
हे भारतमाता तुझा जय जयकार.
आम्ही स्वतंत्र आहो याची ठेवावी जाण
स्वातंत्र्य भारताचा आम्हाला अभिमान,
या दिनी आज सारे घेऊया आन
धन्य असो भारत देश आमचा महान...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण.
मो. ९७६४३५०३७४

## नवा भारत घडवूया



आपण सारे मिळूनी निटनेटके घर ठेवूया
सभोतालचा परीसर सुंदर नि स्वच्छ
करूया रस्त्यावर केर टाकण्याची
सवय आता मोडूया स्वच्छतेचा वसा
घेवूनी माणूसकिशी नातं जोडुया
प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर आता टाळूया
वाढत्या प्रदूषणाला एकजुटीने आळा
घालूया शौचालयाचा वापर करुनी
रोगरोईला दूर हटवूया उघड्यावर
बसण्याचे दुष्परीणाम लोकांना आता
पटवूया घर सुंदर तर देश सुंदर
अभियान आता राबवूया जनजागृतीची
मशाल घेवूनी नवा भारत घडवूया

-रविंद्र व्ही. चालीकवार, मु.पो.
ता.महागाव, जि. यवतमाळ,
मो.9011559106

## 'माणूस' असावा

मानवी जिव्हाळा |
वसावा डोळ्यात ||
शिकार जाळ्यात |
साधू नये... ||

मानवी बोलांनी |
नासू नये वाणी ||
नित्य गावी गाणी |
माणसाची.. ||

मानवी हातांनी |
जपावेत कष्ट ||
कारभार भ्रष्ट |
करू नये.. ||

मानवी पायांनी |
चालाव्यात वाटा ||
कुणा पायी काटा |
ठेवू नये.. ||

मानवी डोक्यांनी |
पसरावे ज्ञान ||
असावे विज्ञान |
अधिष्ठानी.. ||

मानवी हृदयी |
'माणूस' असावा ||
प्रवेश नसावा |
दुर्जनांना..! ||

महादेव बी. बुरुटे,
शेगाव, ता. जत, जि.
सांगली
मो. 9765374805



## माझे सर्वस्व

फक्त तू हवास मजला
दुसरे न उमगले कांहीं
गोड तुझ्या मिठीत येता
भेटले मज सर्व काही..

पहाटेची गुलाबी हवा
उगवत्या सुर्याचे तेज तू
आरशात तुज न्याहाळीते
माझ्या ओठांचा रंग तू..

फक्त तू अन् मी
दुसरे कुणीही नाही
मन हे माझे वेडे
तुझ्यात गुंफूनी जाई..

या वेड्या मनाला
मीच साद घाली
मागे वळूनी पहाता
तुच माझी सावली..

तुझीया जवळी येता



मज सारे चुकून कळले
तुझ्याविन या मना
नयनी कुणी न दिसले..

नितांत तुझ्या प्रेमावर
भाळूनिया मी गेले
स्पर्श होताच मन हे
कसे चिंब चिंब झाले..

सौ. भाग्यश्री दायमा
जयसिंगपूर
९८५०११४३३९



## थंडी लयात आली

नाना कला तनाच्या जेव्हा भरात आल्या
माझ्या वयासवे त्या साऱ्या वयात आल्या.
काट्यातही कळ्यांनी सांभाळले फुलागत
गंधाळल्या मधाच्या बागा मधात आल्या.
माथ्यावरी उन्हाच्या पडले तुषार ताजे
काळ्या छटा नभाच्या ओल्या दवात आल्या.
रानीवनी जराशी थंडी लयात आली
वाफा इथे हवेच्या माझ्या कपात आल्या.
जागा हवी सुगीला अगदी सपाट माची
ना व्हायला हवे की ओंब्या गव्हात आल्या.
भेटीतही मला ती वाटे सुशील ललना
पण भावना मनाच्या संगीत गात आल्या.
विरहात याद तीची जितकी सतावते मज
तितक्याच आसवांच्या धारा क्षणात आल्या.

®रज्जाक शेख श्रीरामपूर
9665778558


## उस की आंखों में ....



एक तस्वीर धुंधलाई उस की आंखों में
जैसे समंदर भर गया उस की आंखों में
और न कुछ देखा है,न सोचा है, न चाहा है
जब से कोई बस गया है उस की आंखों में
उस के चेहरे का नूर ही कुछ ऐसा था
अश्क मोती से चमके उस की आंखों में
चांद टहल रहा है झील के कनारे पर
ख़्वाब कुछ ऐसे ही हैं उस की आंखों में
उजाला बन गई थी जब से मेरी आंखें
दो चराग देखें थे मैंने उस की आंखों में
सुकून की तलाश थी ज़िंदगी भर मेरी
ख़त्म हुई जो ठहर गया उस की आंखों में
उस के ख़्वाब देखें हैं मैंने कल रात भर
सितारे जगमगा रहे हैं उस की आंखों में

- बलराज संघई
9420015108



# देगलूर - रेणापूर महामार्गाची तत्काळ दुरुस्ती करा

## म. ना. खंकरे : अन्यथा रस्ता खोदणार, शिवसेना आक्रमक भूमिकेत

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** देगलूर ते रेणापूर राष्ट्रीय महामार्गावरील रावी ते गोजेगावपर्यंत मोठमोठे खड्डे पडल्याने मुक्रमाबाद परिसरातील नागरिकासह शाळकरी विद्यार्थ्यांना मोठे नाहक त्रास सहन करावे लागत आहेत. या महामार्गावरील खड्डे तात्काळ बुजवा अन्यथा महामार्गावरील रस्ता खोदणार असल्याचा इशारा शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख मन्मथअप्पा खंकरे यांनी निवेदनाव्दारे राष्ट्रीय महामार्ग विभागाला दिला आहे.

जून अखेर दुरुस्तीच्या नावाखाली या महामार्गावरील रस्त्याचे काम करण्यात आले होते. पण हे काम करीत असताना खड्ड्यात मोठी गिट्टी घालून त्यावर खडी व मुरूम पाणी टाकून दबाई करणे गरजेचे होते. पण संबंधित गुत्तेदाराने फक्त माती मिश्रित मुरूम टाकून त्यावर एक घागर भर पाणी सुद्धा न टाकता अल्पवधीत खड्डे उकडून नुसतेच रस्त्यावर धुरळाच धुरळयाचे साम्राज्य पसरल्याने प्रवाशासह नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.





गोजेगाव ते रावी पर्यंतच्या रस्त्याचे काम जतागायत दुरुस्तीच्या नावाखाली थातूर मातूर काम करुण बिले उचलण्याचा धंदा जोरात सुरु असल्याने रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडून नुसता धुरळाच धुरळा उडत आहे. परिणामी डोळ्यात,शरीरात धुळ जाऊन आरोग्यास हानी पोहोचत आहे. व तसेच वाहन चालवीत असताना मोठे - मोठे अपघात होऊन अनेक प्रवासी जखमी होत आहेत, याला जबाबदार कोण ? या धुराळ्यामुळे शाळकरी विद्यार्थी व प्रवाशाचे आरोग्य धोक्यात आल्यामुळे हा रस्ता तात्काळ दुरुस्त करून निकृष्ट दर्जाच्या झालेल्या कामाची चौकशी करण्यात यावी....अन्यथा प्रवाशांना सोबत घेऊन येणाऱ्या काळात शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग नांदेड यांना शिवसेनेच्या वतीने देण्यात आला आहे. यानिवेदनावर शिवसेनेचे तालुका उपप्रमुख मन्मथ खंकरे, सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत काळे पत्रकार दत्ता पाटील माळेगावे, बबन बडगणे, यांच्यासह अनेकांचे स्वाक्षरी आहेत.

संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बेजबाबदारपणामुळे हा सारा त्रास जनतेला सोसावा लागत आहे . तसेच या राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे माती मिश्रित मुरुम टाकुन निकृष्ट पध्दतीने बुजवण्यात आले . येत्या आठ दिवसात राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे बुजवून धुळमुक्त रस्ता करावा अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन केले जाईल व तसेच या मार्गावरील निकृष्ट पद्धतीने काम करणाऱ्या संबंधित गुत्तेदारावर कारवाई झाली पाहिजे .

**मन्मथ खंकरे**
**(शिवसेना उपतालुकाप्रमुख मुखेड)**




# भोकर तालुका सर्वच क्षेत्रात अव्वलस्थानी : चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** तालूक्यात क्रीडा क्षेत्रात आता नवयुवकांनी उज्वल कामगीरी सुरू केली आहे. खेळाडूच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी शहरात अद्यावत असे क्रीडा संकुल उभारणीसाठी पाच कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. राजकारणा सोबतच तालूका हा सर्वच क्षेत्रात अव्वलस्थानी आहे याचा मला सार्थ अभिमान आहे, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी गुरुवारी (ता. २६) केलें आहे.

येथील सामाजिक कार्यकर्ते संदीप गौड मित्र मंडळाच्या वतीने आमदार चषक टेनिस बॉल क्रिकेट चे सामने आयोजित करण्यात आले होते. विजयी स्पर्धकांना पारितोषिक वितरण करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर आमदार अमर राजूरकर, कुमारी सूजया अशोक चव्हाण, गोविंद शिंदे नागेलीकर, जगदीश पाटील भोसीकर, बाळासाहेब पाटील रावणगावकर, नामदेव आयलवाड, गोविंद बाबा गौड पाटील, रामचंद्र मुसळे, बाबूराव आंदबरीकर, शेख युसूफ, बालाजी आंदबरीकर, मुबीन मौलाना, बालाजी गाडे यांची उपस्थिती होती. चव्हाण म्हणाले की, मागील अनेक वर्षांपासून मी राजकारणातील मैदानावर चौकार, षटकार, गोलंदाजी यांचा चांगला अनुभव घेतला आहे तो भाग वेगळा आहे. तालुक्यात खेळाडूंना प्रोत्साहन देऊन त्यांचा आनंद व्दूगुणीत करण्यासाठी दरवर्षी गौड कुटुंबीय आमदार चषक टेनिस क्रिकेट चे सामने आयोजित करतात हि बाब विशेष उल्लेखनीय आहे. त्याच्या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळतो आहे. या भागाचे प्रतिनिधित्व माझ्याकडे असल्याने जनतेच्या अडीअडचणी आणि सर्वांगीण विकासात कसलीच कसुर ठेवली नाही.क्रिडा क्षेत्रातील खेळाडूंना अद्यावत असे भव्य क्रिडा संकुल उभारणीसाठी पाच कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली असून लवकरच त्या कामाला गती मिळणार आहे. असे सांगितले आहे. नितीन पवनकर यांनी सुत्रसंचलन केले. प्रास्ताविक संदिप गौड पाटील यांनी तर आभार गोविंद गौड पाटील यांनी मानले आहे.

# फेब्रुवारीत येणार पुन्हा १२ चित्ते

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** फेब्रुवारी महिन्यात दक्षिण अफ्रिकेतून १२ चित्ते भारतात आणण्यासंदर्भात या दोन्ही देशांमध्ये सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली आहे. सप्टेंबर महिन्यात नामिबिया येथून भारतात मध्यप्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात आठ चित्ते आणले. त्यानंतर या प्रकल्पाअंतर्गत आणखी १२ चित्ते आणण्याच्या दृष्टीने तयारी सुरू झाली आहे. जगभरात सुमारे सात हजार चित्ते असून त्यातील बहूतांश चित्ते दक्षिण अफ्रिका, नामिबिया व बोत्सवाना येथे आहेत. त्यातही नामिबिया येथे जगभरातील सर्वाधिक चित्त्यांची संख्या आहे. त्यामुळे सप्टेंबर महिन्यात नामिबिया येथून पाच मादी व तीन नर चित्ते भारतात अणले. दोन्ही देशाील सामंजस्य कराराअंतर्गत १२ चित्त्यांची पहिली तुकडी फेब्रुवारी महिन्यात दक्षिण अफ्रिकेतून भारतात येण्याची शक्यता आहे. फेब्रुवारी महिन्यात हे १२ चित्ते आणल्यानंतर पुढे आणखी चित्ते भारतात स्थानांतरित करण्याची योजना आहे. सामंजस्य कराराच्या अटीचे दर पाच वर्षांनी पुनरावलोकन केले जाईल, असे केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या निवेदनात म्हटले आहे.



# शिवसेना- वंचित युतीचा जल्लोष साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर शिवसेनाप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्यात युती झाल्याने दोन्ही पक्षाच्या खुलताबाद तालुक्यातील स्थानिक पदाधिकाऱ्यांनी आज रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार व अभिवादन करून एक दुसऱ्याला मिठाई देऊन व फटाके फोडून जल्लोष साजरा केला.

शिवशक्ती भीमशक्तीची युती महाराष्ट्र आणि देशासाठी परिवर्तनाची नोंद ठरेल असा विश्वास वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष मुक्तार भाई सय्यद व शिवसेना तालुका अध्यक्ष राजू वरकड यांनी बोलताना व्यक्त केला शिवसेना प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी नुकतीच मुंबईत युतीची घोषणा केली या युतीमुळे शिवसेना आणि वंचित बहुजन आघाडीच्या स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बुधवार रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार व अभिवादन करून एक दुसऱ्याला मिठाई देऊन फटाक्याची आतिश बाजी करून आनंद व्यक्त केला यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवशक्ती भीमशक्तीचा विजय असो अशा घोषणा दिल्या. यावेळी शिवसेना तालुका पदाधिकारी व वंचित बहुजन आघाडीचे तालुका पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आधुनिक केसरी



## लय भारी सुगरण

सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

मागच्या महिन्यात भाच्चीच्या लग्नाहून येतांना औसा बायपास चौकात अगदी कॉर्नरला पद्मजा नावाचे एक छोटेसे हॉटेल आहे..... लातूर नांदेड भागातील लोकांची येथे बरीच रेलचेल होती... तसं साधं हॉटेल पण चव मात्र अफाट होती...तिथे गेल्यावर आणि त्याच्यकडच्या सगळ्या डिश एक एक करून मागवल्या... "दही धपाटे'" नावाचा नेहमीचाच पण अफलातून चवीचा प्रकार येथे खायला मिळाला...' गरमागरम बटाटे वडा' चवीला इतका मस्त होता की विचारू नका तशीच उत्तप्याची चव पण ! ......

सगळं कसं गरमागरम,चटके बसणारं ! लेकीने बटाटावडा भावजयीने उत्तापा, अहो आणी भावाने एक एक धपाट्याची आर्डर दिली. मी म्हणाले मी आधी चव बघते मग सांगते ...... सगळ्याची चव बघितली आणि धपाट्याचीच आर्डर दिली. सगळ्यात जास्त धपाटं आवडलं .... तोंडाने खायला बर का ? केवळ अप्रतिम चवीचे खमंग, रूचकर, गरमागरम धपाटं सोबत.......ठेचा , दाण्याची चटणी, आणि दही.... त्यावर मस्त चहा! येताना मालकाला विचारले रेसिपी सांगाल का? त्यात काय ? सांगतो की .... टिपीकल लातुरच्या भाषेत साहित्य आणि कृती सांगितली. मग घरी करून बघितली. ती अशी.....

**बाजरीचे धपाटे**

**साहित्य-** एक वाटीज्वारीचे पीठ,दोन चमचे गव्हाचे पीठ, दोन चमचे बाजरीचे पीठ, एक चमचा बेसन पीठ, हिरवी मिरच्या, लसूण पाकळ्या, जिरे, हळद, मीठ चवीनुसार, धुवून बारीक चिरलेली भरपूर कोथिंबीर, पाणी, आवश्यकतेनुसार, तेल

**कृती-** सर्व प्रथम चार पिठे एकत्र करावीत. त्यात, हळद ,मीठ घाला. लसूण आणि मिरच्या ठेचून घाला. धुवून बारीक चिरलेली भरपूर कोथिंबीर घालून मिक्स करावे. नंतर त्यामध्ये आवश्यकतेनुसार पाणी टाकून भाकरीच्या पिठाप्रमाणे भिजवून पाच मिनिटे बाजूला ठेवावे.

मग तवा गरम करून घ्यावा. पोळपाटावर सुती कापड घेऊन त्याला पाणी लावावं व छोटा गोळा घेऊन तो पातळ,गोल आकारात थापावा. तव्यावर तेल सोडून तव्यावर थोडे तेल लावून धपाटे टाकावेत दोन्ही बाजूंनी खरपूस भाजून घ्यावे. गरमागरम धपाटे लोणचं, लोणी दाण्याची चटणी, दह्या सोबत खाण्यास द्यावे. मग करून बघा. आणि कळवा नक्कीच.

## दहीधपाटे



# समाज परिवर्तनाची गती संथ : डॉ. मनोहर जाधव

## सदानंद कोचे यांच्या 'उघडा डोळे, वाचा नीट' पुस्तकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज


**पुणे :** परिवर्तन व्यक्तीच्या मानसिकतेशी निगडित असते. लोक अपरिवर्तनाकडे अधिक झुकलेले असतात.त्यांना लवकर बदल नको असतो. सदानंद कोचे यांच्यासारख्या सनदी अधिकाऱ्यांचे मन सभोवतालच्या वर्तनांनी अस्वस्थ आहे, म्हणून त्यांनी 'उघडा डोळे, वाचा नीट' या पुस्तकातून नव परिवर्तनाचा विचार मांडला आहे, पण समाज परिवर्तनाची गती ही फार संथ असते, अशी खंत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख तथा ज्येष्ठ समीक्षक, लेखक डॉ. मनोहर जाधव यांनी व्यक्त केली.
स्वयंदीप प्रकाशनाच्यावतीने कोचे यांच्या पुस्तक प्रकाशनप्रसंगी डॉ. जाधव प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, यशदातील अधिकारी डॉ.बबन जोगदंड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. मनोहर जाधव यांनी समाजपरिवर्तनच्या चळवळीला फार मोठा इतिहास असून अनेक संत -महात्म्यांनी परिवर्तनाचा विचार मांडला. त्यामध्ये गौतम बुद्ध,चार्वाक, फुले,शाहू आंबेडकर यांनी जे काही काम केले त्यामुळे समाज थोडा हलला पण आणखी समाजाला परिवर्तनशीलतेकडे जाण्याची गरज आहे. आपण भौतिकदृष्ट्या पुढे गेलो पण मानसिकदृष्ट्या गेलो नाही,असेही शेवटी ते म्हणाले.

यावेळी पुस्तकाचे लेखक निवृत्त सनदी अधिकारी सदानंद कोचे यांनी माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागले पाहिजे, हे बुद्धाचे तत्त्वज्ञान पायदळी तुडवत आपण वाटचाल करत आहोत. आपण खरा इतिहास शोधून त्या मार्गाने आपली वाटचाल केली पाहिजे. समाजामध्ये जे बदल घडतात ते निसर्गचक्राप्रमाणे घडत असतात, पण आपण चांगले काय वाईट काय ?याचे डोळस असूनही आकलन करत नाही, याची खंत वाटते. त्यासाठीच या पुस्तकाची निर्मिती केल्याचे त्यांनी सांगितले. आज देश प्रथा, परंपरा, मान्यता या तीन शब्दांवर चाललेला आहे. याला मूठमाती देण्याची आवश्यकता असल्याचेही ते म्हणाले.




यावेळी डॉ. बबन जोगदंड यांनी साहित्य निर्मिती हा एक इतिहास असतो. तो चिरंतर काळ टिकत असतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पुस्तकांचे महत्त्व अनेक वेळा विशद केले. त्यामुळे माणसाने पुस्तक प्रेमी असले पाहिजे. पुस्तके परिवर्तनशीलतेसाठी फार महत्त्वाची असतात. कोचे यांच्या पुस्तकाचे शीर्षकच हे पुस्तक कसे आहे हे सांगते, त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने या पुस्तकाचे वाचन केले पाहिजे.असे आवाहन केले.

यावेळी अध्यक्षीय समारोपात डॉ.श्रीपाल सबनीस यांनी प्रशासकीय अधिकारी सुखा, समाधानात, श्रीमंतीत आपले आयुष्य आरामात जगत असतात पण कोचे हे अस्वस्थ आहेत.त्यांनी 'उघडा डोळे वाचा नीट' या पुस्तकात विविध परिवर्तनाचे पैलू मांडून सुंदर विचारांचे एक संकलन केले आहे. त्यांचे अनुभव हे संवेदनशील माणसांना अस्वस्थ करणारे आहेत. कुठलेही पुस्तक देवाने लिहिले नाही, पण देवाच्या नावावर सगळं खपवलं जाते,अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.
पुढे ते म्हणाले, या पुस्तकात सम्यक दृष्टीचा प्रत्येय येतो. प्रत्येक जाती -धर्माच्या माणसाला विचार करायला लावणारे त्यांचे लेखन आहे. सगळच चांगलं नाही हे सांगणारं हे पुस्तक असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात जगातल्या सर्व शहाण्या माणसांची बेरीज करून सत्याचं, मानवतेचे दर्शन घडावं, अशी माफक आशा त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केशव वाघमारे यांनी तर आभार कैलास बनसोडे यांनी मांडले.
या कार्यक्रमाला अभियंता माजी बांधकाम विभागाचे संचालक धनराज तावडे,माजी सचिव जी. एम. कंधारे, अभियंता पुंडलिक थोटवे,प्रा. गौतम मगरे, राहुल कोचे, व्यंकटेश कल्याणकर डॉ. प्रेम हनवते यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## कवी आपल्या भेटीला उपक्रमात सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्ताने लोहगांव ता. पैठण येथील प्रसिध्द ग्रामीण कवी तथा " पाणपोईकार" अय्युब पठाण लोहगांवकर यांना शाहू विद्यालय येथे नुकतेच आयोजीत शालेय कार्यक्रमासाठी निमंत्रीत करण्यात आले होते. या प्रसंगी साहित्यिक अय्युब पठाण यांनी मराठी साहित्याचे महत्व सांगितले. यावेळी श्री. पठाण म्हणाले की, " ज्या कवितेत भावना मोहरून रडते, ती कविता चांगली असते, आणि ज्या कथेमध्ये असते व्यथा ती कथा चांगली असते." पठाण यांनी, " राजमाता जिजाऊं " च्या जीवनकार्यावर सुरेल आवाजात पोवाडा सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. शेवटी " आई " ही कविता शिवरंजनी रागाच्या चालीवर प्रभावीपणे आर्तपूर्ण आवाजात सादर करून उपस्थितांच्या डोळ्यात अश्रु आणले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक हिरालाल देवकर हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ शिक्षक गोरक्षनाथ वांढेकर होते. तसेच ग्रंथपाल बारीकराव ढोले, सुधीर नलावडे, विकास शेजूळ, वशीम शेख यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक- शिक्षिका आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिक्षक हरिश्चंद्र धांडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिक्षिका श्रीमती संगीता शिंदे यांनी मानले.

## पत्रकार नावेद शेख यांना उत्कृष्ट निवडणूक वार्तांकन पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** राष्ट्रीय मतदार दिन निमित्ताने महाराष्ट्र राज्य निवडणूक अधिकारी व औरंगाबाद जिल्हाधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने सन 2022 "उत्कृष्ट निवडणूक वार्तांकन पुरस्कार" पत्रकार नाविद शेख यांना प्रदान करण्यात आला. यावेळी मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्रा. फ.मुं. शिंदे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सन 2022 मध्ये मतदार नोंदणी, जनजागृती लोकशाही बळकट करण्यासाठी अनेक वृत्त प्रसिद्ध केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने दखल घेऊन



औरंगाबाद जिल्हाधिकारी यांच्या मार्फत पत्रकार नावेद शेख यांना "उत्कृष्ट निवडणूक वार्तांकन पुरस्कार" प्रदान करण्यात आले यावेळी अप्पर जिल्हाधिकारी अनंत गव्हाणे, उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर, सहसंचालक तंत्र शिक्षण नागदेवे उमेश, सरस्वती भुवनचे प्राचार्य डॉ. मकरंद पैठणकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



## इमारत बांधकामासाठी ६० कोटी मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालयात एमबीबीएस च्या इडब्लूएस कोटा नुसार ५० जागा वाढणार आहे त्यासाठी महाविद्यालयात इमारत व इतर सुविधा साठी ६० कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी प्राप्त झाली असून या निधीत ६० टक्के केंद्र सरकारचा असणार आहे.भा. हि.शा. वै.महाविद्यालयात सद्यअस्तित्वात असलेल्या सुविधा या पुर्वी असलेल्या क्षमतेसाठी असल्याने वाढीव जागांसाठी अधिकजास्त सुविधा आवश्यक असल्याचे आ.फारुख शाह यांच्या निदर्शनास आले.अधिकच्या सुविधेसाठी निधी उपलब्ध व्हावा यासाठी आ.फारुख शाह गेल्या दीड वर्षांपासून प्रयत्नरत होते.

शासनाच्या धोरणानुसार भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालयात एमबीबीएस च्या इडब्लूएस कोटासाठी ५०जागा वाढणार आहे.त्यानुसार राज्यशासनाकडूने केंद्र शासनाकडे अस्तित्वातील वैद्यकीय महाविद्यालयाची श्रेणी सुधार करणे अंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात आला होता.या प्रस्तावास केंद्र शासनाने नुकतीच मंजुरी दिली असून तसे पत्र केंद्र शासनाचे सहसचिव श्री.चंदन कुमार यांनी निर्गमित केले आहे.केंद्र शासनाचा हिस्सा सुमारे ३६कोटी असणार असल्याचे पत्रात नमूद केले आहे.या प्रस्तावाच्या मंजुरीसाठी धुळे शहराचे आ.फारुख शाह गेल्या दीड वर्षापासून प्रयत्न करीत होते.६०कोटीचा निधी मंजूर झाल्यामुळे भा. हि. शा.वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालयात विद्यार्थी संख्या वाढल्याने जिल्ह्यातील आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांची सोय होणार आहे.तसेच वाढीव सुविधांमुळे रूग्णांनादेखील फायदा होणार आहे.



## अनाड जि.प. शाळेला माजी विद्यार्थ्यांनी केली भरीव मदत

आधुनिक केसरी न्यूज

**संदीप मानकर**

**अजिंठा :** सिल्लोड तालुक्यातील अनाड येथे 26 जानेवारी प्रजासत्ताक दिन अतिशय उत्साहात आणि अनोख्या पद्धतीने संपन्न झाला. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यांत आली. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमांतून शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, बालगीते व लोकगीतांवर आपली नृत्य कला सादर करुन उपस्थितांची मने जिंकली आणि रोख बक्षिसांची लयलूट केली.
गावातील ग्रामपंचायत व माजी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत शाळेसाठी विविध शालोपयोगी वस्तू देण्याचा मानस केला. यांत रामदास यदमळ यांनी संगणक संच, मंसाराम पाचिंगे यांनी विद्यार्थ्यांसाठी कमरेचे बेल्ट, शालेय समिती अध्यक्ष गणेश पवार यांनी साऊंड सिस्टीम, ग्रा.पं. सदस्य गजानन गदाई व सामाजिक कार्यकर्ते विष्णू मुके यांनी पुस्तके ठेवण्यासाठी कपाट, उपसरपंच प्रविण जाधव व सोसायटी चेअरमन योगेश पवार यांनी एक्कावनशे, ग्रामपंचायत कार्यालयाने अकराशे, ग्रामसेवक सुनील पाटील यांनी पाचशे, सरपंच रामकोरबाई बिरारे यांनी अकराशे, ग्रा.प.सदस्य भागवत शिंदे यांनी अकराशे, तर ईश्वर पवार यांनी अकराशे रुपयांची शैक्षणिक साहित्यासाठी मदत जाहीर केली. काहींनी विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक श्री.चौधरी यांनी केले तर आभार श्री.निकुंभ सर यांनी मानले याप्रसंगी मुख्याध्यापक शेख बशीर, श्री. ढवळे, श्रीमती चिकटे, माजी सरपंच आत्माराम मुके, ग्रा.प.सदस्या शितल पवार, अशोक मानकर, साहेबराव गदाई, बाबासाहेब गोंडे, रमेश पवार, आनंदा बावस्कर, दिपक बिरारे, श्रीकांत मानकर, संदीप बावस्कर, आदींसहित अंगणवाडी सेविका व मदतनीस, गावांतील प्रतिष्ठित नागरिक, महिला व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तर माजी विद्यार्थी तथा पत्रकार संदीप मानकर यांना राज्यस्तरीय महात्मा फुले समता गौरव पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मुख्याध्यापक व शालेय समिती अध्यक्षांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यांत आला.

## मजुरांना घेऊन जाणारी ट्रॅव्हल्स उलटली

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** रायपूर येथून तेलंगणाच्या हैद्राबाद येथे ३७ मजुरांना घेऊन जाणारी ट्रॅव्हल्स राजुरा तालुक्यातील विरुर स्टेशन येथे उलटली. या अपघातात २ मजुरांचा मृत्यू झाला तर १८ प्रवासी गंभीर जखमी झाले.
राजुरा तालुक्यातील विरुर स्टेशनजवळ छत्तीसगड राज्यातून बेमेत्रा जिल्ह्यातील तालुका नावागळ येथून हैदराबादला मजूर घेऊन जाणारी ट्रॅव्हल्स पहाटे २.३० वाजताच्यादरम्यान विरूर ते धानोरादरम्यान उलटली. ट्रॅव्हल्स खाली दबून रात्रीच एका मजुराचा मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी अवस्थेत असताना मृत पावला. एकूण ३७ मजूर प्रवाशांपैकी १८ जखमी आहेत. त्यापैकी काहींना उपजिल्हा रुग्णालय राजूरा, जिल्हा सामान्य रुग्णालय चंद्रपूर येथे भरती करण्यात आले आहे. अपघातग्रस्त ट्रॅव्हल्स रायपूर येथील असल्याचे कळते.

## कंत्राटी डेटा ऑपरेटरला ३०० ची लाच भोवली

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील पिंप्री येथील कृषी विभागाच्या



ठिबक सिंचन योजनेत साठी एका टेबलावर कार्यरत डेटा एन्ट्री ऑपरेटर 300 रुपये लाचेची मागणी केल्यामुळे संबंधित शेतकऱ्याने एसीबीकडे तक्रार केली. त्या संदर्भात एसीबीच्या पथकाने तक्रारीची छान बिन केली. त्यानुसार सापळा रचून सुनील सूर्यवंशी याला पैसे घेताना रंगेहात ताब्यात घेतले ही कारवाई धुळे एसीबी चे डी.वाय. एस.पी अनिल बडगुजर, पीआय मंजीत सिंग चव्हाण, पी आय प्रकाश झोडगे,हेड कॉ.राजेंद्र कदम, भूषण शेटे, शरद काटके, प्रशांत बागुल या सर्व कर्मचारी पथकाने कारवाई केली आहे.

# अवकाळी पावसाने खरीप पिके जमीनदोस्त

## हवालदिल शेतकऱ्यांनी केली मदतीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**संदीप मानकर**

**सिल्लोड :** तालुक्यातील अनाड येथे बुधवारी व गुरुवारी रात्री जोरदार झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. यांतून शेतकरी वर्ग अत्यंत हवालदिल झाला आहे.

अचानकच आलेल्या या तडाख्याच्या पावसाने गहू, सूर्यफूल, हरभरा या पिकांचे मोठ्या प्रमाणांत फक्त नुकसानच नव्हे तर सर्व पिके अगदी जमीनदोस्त झाली असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली असून शेतकरी वर्गांत अतिशय नाराजीचा सूर दिसत आहे.
सिल्लोड तालुक्यांत कधी अतिवृष्टीचा तर कधी कोरड्या दुष्काळाचा फटका शेतकऱ्यांना बसत असून त्यांत शेतकरी पुर्णतः होरपळला जात आहे. त्यांतच आता आलेल्या या अवकाळी पावसाने सोंगणीला आलेली पिके ज्यांत गहू, सूर्यफूल, हरभरा, मका जमीनदोस्त झाल्याने लागलेला खर्च सुद्धा निघेल की नाही ही चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. तर कृषी विभागाने या नुकसान झालेल्या पिकांची ताबडतोब पाहणी करून पंचनामे करावे व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना याची नुकसानभरपाई शासनाने कमी निकष ठेऊन तात्काळ द्यावी अशी मागणी नुकसान झालेले शेतकरी आत्माराम मुके, राजू शिंदे, उत्तम पवार, कृष्णा खंडाळकर, गंगाराम भिसे, संजय शिंदे, ताराचंद बावस्कर, राजू भिसे आदींसहित सर्व शेतकरी वर्गांतून जोर धरत आहे.



मी झालेल्या पिकांची प्रत्यक्ष ठिकाणी पाहणी करुन नुकसान झाल्याचा अहवाल आमच्या वरिष्ठ विभागाला कळविला आहे . वरिष्ठांकडून त्यांचे उत्तर आल्यास नुकसानीचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना त्याची नुकसानभरपाई दिली जाईल .

**– अजित वळवी, कृषी सहाय्यक, अनाड**

अवकाळी पावसाने अनाड येथील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणांत नुकसान झाले आहे व तोंडाशी आलेली पिके संपूर्ण झोपून गेली आहे म्हणून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करुन याची नुकसानभरपाई शेतकऱ्यांना द्यावी .

**– गजानन गदाई, ग्रामपंचायत सदस्य, अनाड**

# स्वाभिमानी संघटनेने शेतकऱ्यांकडून घेतले पीक विमा तक्रार अर्ज भरून



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तहसील कार्यालय, वैजापूर वतालुक्याचे आमदार रमेश पाटील बोरणारे व तालुका कृषी अधिकारीआढाव साहेब यांच्याकडे दिले.  खरीप हंगाम सन २०२२ मध्ये अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिक विमा मंजुर करणे बाबत.
खरीप हंगाम सन २०२२ मध्ये वैजापूर तालुक्यासह औरंगाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मिनीस्टरी ऑफ अग्रीकल्चर अण्ड फार्मर्स वेलफेयर या कंपनी मार्फत कपाशी, मका, बाजरी, सोयाबीन, तुर, मुग, भुईमुग, आदी पिकांचा विमा काढलेला आहे. अतिवृष्टीमुळे सततच्या पावसामुळे संपूर्ण पिकांचे नुकसान झालेले आहे. नुकसान झाल्याची तक्रार
कंपनीच्या टोल फ्री क्रमांकावर करण्यासाठी वारंवार प्रयत्न केले. मात्र टोल फ्री क्रमांक लागत नाही. तसेच ऑनलाईन पद्धतीने तक्रार नोंदवण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रयत्न केले मात्र त्या तक्रारी सबमिट होत नव्हत्या यामुळे अनेक शेतक-यांना वेळेत तक्रारी करता आल्या नाही. कंपनीने ज्या शेतक-यांनी ऑफलाईन पद्धतीने किंवा वेगवेगळ्या पद्धतीने तक्रारी केल्या आहे. त्यापैकी काहींना विम्याची रक्कम मिळाली तर काहींना नाही, परंतू बांधाला बांध लागुन असलेले शेतकरी किंवा एकाच शिवारातील शेतकरी काहींना तक्रार न केल्यामुळे पिक विमा मिळाला नाही.
तसेच जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडुन संपुर्ण शेतक-यांचे नुकसान झाल्याचे अहवाल शासनाला / कंपनीस त्यावेळेस दिलेला आहे. वैयक्तीक तक्रारअर्ज करावयाची आवश्यकता नाही असे कृषि विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना सांगण्यात आले होते. असे असतांना अनेक शेतकरी पिक विम्याच्या मदतीपासुन संबंधीत कंपनीला शेतकऱ्यांना खरीप पिक सन २०२२ चा पिक विमा मिळवून देणे बाबत आपण आपल्यास्तरावरुन आदेशीत करावे अशी ही शेतकऱ्यांच्या वतीने विनंती.
स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष दादासाहेब वाल्मीक तांबे  यांच्या वतीने मागणी करण्यात आली व एक फेब्रुवारी पर्यंतसर्व शेतकऱ्यांच्या हक्काचा पिक विमा अकाउंट मध्ये जमा झाला नाही तर स्वाभिमानी शेतकरी संघटना तीव्र आंदोलन करणार.
जिल्हाध्यक्ष कृष्ण साबळे, कृषि भूषण भाऊसाहेब थोरात, प्रदेश अध्यक्ष व जिल्हा यादवराव कांबळे, जिल्हा कार्याध्यक्ष रामेश्वर बिल्वने, वैजापूर तालुका युवा अध्यक्ष अनिल शेलार, वैजापूर तालुका पक्ष अध्यक्ष सोपान पवार, वैजापूर तालुका सरचिटणीस अमीन शेख, वैजापूर सोशल मीडिया अध्यक्ष अक्षय सोनवणे, दादासाहेब रोकडे, खंडाळा व तालुक्यातीलअनेक शेतकरी उपस्थित होते

# सरपंच दिनकर खरात, उपसरपंच शंकर जैस्वाल यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** तालुक्यात जामडी जहांगीर येथील सरपंच आणि उपसरपंच यांचा औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन मा.आ. नितिन पाटिल यांच्या हस्ते नवनिर्वाचित सरपंच दिनकरराव खरात उपसरपंच शंकर भैया जैस्वाल यांचा सत्कार करण्यात आला तसेच जामडी वि का.से.सह सोसायटी चे नव निर्वाचीत चेअरमन राजू पाटिल देवरे, याचा  ही या प्रसंगी सत्कार करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी कचरू जैस्वाल होते. प्रमुख अतिथिच्या स्वरुपात कन्नड माजी आमदार नितिन पाटिल, सामाजिक कार्यकर्ते सुरेश डोळस होते. यावेळी ग्रा.प. सदस्य भगवान ब्राम्हने प्रभू खरात सर सुनिल देवरे राम्दास त्रि. देवरे सुरेश सोनोवने पांडूरंग सपकाळ याचा सत्कार करण्यात आला या प्रसगी सुरेश डोळस डॉ. चव्हाण, कचरुभैया जैस्वाल, सोनवणे स एल ओ. विलास वाणी, रामदास परदेशी, सतोष जैस्वाल, कैलास साळवे, तेजराव पा.खरात, विजय महाले, मनोज देशमुख, निलेश पा. तायडे,नानाभाऊ मनगटे, तुकाराम घुले, डी. आर.काळे, कारभारी बोरसे,  साजिद पाठाण व मनोज जैस्वाल गावकरी मा.सू.दादा पाटिल विद्यालयातील सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्तीत होते प्रास्ताविक कचरुभैया यानी केले एस.बी. सतुके यानी उपस्तीत मान्यवराचे आभार मानले या वेळी ग्रामस्थानची मोठ्या संखेने उपस्थिती होती.






काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



आधुनिक केसरी न्यूज

दौलताबाद : ग्रामपंचायत कार्यालय माळीवाडा येथे मनेश लक्ष्मण गाजरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सरपंच सुधाकर हेकडे उपसरपंच श्री कडू कीर्तीकर ग्रामपंचायत सदस्य जिजाबाई भगत, ज्योती मुळे, कृष्णा मुळे, प्रवीण बर्डे, धम्मपाल गायकवाड, मंदाकिनी कीर्तिकर, कमलबाई आस्वार, ग्राम विकास अधिकारी जी. व्ही. हारदे पोलीस पाटील प्रमोद साठे जिल्हा परिषद शाळा अध्यक्ष नंदकिशोर मुळे जिल्हा परिषद मुख्याध्यापक आदाने सर गावातील प्रतिष्ठित नागरिक सुधाकर हेकडे, नितीन वानखेडे, रामभाऊ साठे, जगन्नाथ भगत, एकनाथ शिरसाठ, सोमनाथ भगत, नामदेव धनायत, शिवाजी अस्वर, भीमराज बर्डे, अंगणवाडी कार्यकर्ती मदतनीस आशाताई ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते

# माघी यात्रा कालावधीत भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा सज्ज

## उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** माघ शुद्ध एकादशी 01 फेब्रुवारी 2023 रोजी असून, या माघी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी पंढरपुरात भाविक मोठ्या प्रमाणात येतात. वारीत येणाऱ्या भाविकांच्या व स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षितपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी दिली.

माघी वारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतुक नियत्रंणासाठी 1 हजार 550 पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये 02 पोलीस उपअधिक्षक, 21 पोलीस निरिक्षिक, 69 सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, 713 पोलीस कर्मचारी व 700 होमगार्ड तसेच 01 एसआरपीएफ कंपनीच्या तुकडी तर एक शिघ्र कृती दल पथक नियुक्त करण्यात आले आहेत.

वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, 65 एकर, महाव्दार, महाव्दार घाट, पत्राशेड या सहा ठिकाणी वॉच टॉवर करण्यात आले आहेत. तसेच नदीपात्रासह नव्याने नगर प्रदक्षिणा मार्ग, मंदीर परिसर येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असल्याचेही उपविभागीय पोलीस अधिकारी कदम यांनी सांगितले. वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी जड वाहतुक शहराबाहेरुन वळविण्यात आली आहे. तसेच वाहतुक नियमनासाठी 12 ठिकाणी डायव्हरशन पॉईट करण्यात आले आहेत. त्याचबरोबर खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात तसेच शहराबाहेर 12 ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली असल्याचेही श्री. कदम यांनी सांगितले. भाविकांनी तसेच नागरिकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी नागरिकांनी व भाविकांनी पोलीस प्रशासनास सहाकार्य करावे असे, आवाहनही उपविभागीय पोलीस अधिकारी कदम यांनी केले आहे.



# जनशक्ती शेतकरी संघटनेचे पोलिस स्टेशनला निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कुषी खत औषधी कपन्या महाराष्ट्रभर बोगस असुन त्या औरंगाबाद जिल्ह्यासह ईतर जिल्ह्यात सुरु आहेत त्या मध्ये निबोळी पासुन बनविनारे खत जैविक खत पी डी एम पॉटॅश असे खत वेगवेगळ्या पॅकीगमध्ये भरु कुठल्याही लॅब मध्ये चेक न करता विक्री केले जाते व गुणनियत्रक विभागाने प्रत्येक दुकानदाराला भेंट देणे आवश्यक आहे प्रत्येक दुकानात किती ख़त शिल्लक आहे याचा बोर्ड लावणे आवश्यक असते पण असे होताना दिसुन येत नहीं कायदेप्रमाणे लिकीग बंद असताना दुकानदाराकडुन शेतकर्याच्या माथी मारले जाते अमुक खते घेतले तरच तमुक खते घ्या म्हणुन जबरदस्ती केली जाते लिकीड आणि बोगस खते वेगवेगळी मात्रा टाकुन चढ्या दराने विक्री केली जाते अवैध खत कपन्याचा सुळसुळाट झाला आहे गावचा कुषी सहाय्यका पासुन ते कुषी मंत्री पर्यत दारुचे हप्ते गोळा केल्यासारखे बोगस खत आणि कपन्या आणि खत दुकानदाराकडुन साखळी पध्दतीने पैसे जमा केले जातात म्हणुन निषेधार्थ दिनांक 26 जानेवारी प्रजासत्ताक दिनी जनशक्ती शेतकरी संघटनेचे पदाधिकारी सभाजीनगर जिल्हा कुषी कार्यालय पेटुन आंदोलन करणार होते प्ररतु प्रजासत्ताक दिन हां देशा साठी महत्वाचा दिवस आसल्या मुळे जिल्ह्यात कायदा सुव्यस्था शातता भंग होऊं नाही व पोलिस प्रशासनाचा मान ठेऊन आंदोलन तात्पुरत स्थगिती करण्यात आले आहे परंतु येत्या काळात कुषी मत्र्यानी व कुषी आयुक्ततानी बोगस कपन्याच्या विरोधात कारवाई न केल्यास जनशक्ती शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मां अतुल भाऊ खुपसे पाटिल यांच्या आदेशानुसार पदाधिकारी लवकरच आंदोलनाची दिशा ठरुन कुषी मत्र्याच्या व कुषी आयुक्तताच्या विरोधात अक्रमक भुमिका घेऊन अनोखे आंदोलन महाराष्ट्र भर करतील याची नोद शासनानी घ्यावी आज दिनांक 26 जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशीं जिल्हा कुषी कार्यालय पेठविण्याचे आंदोलन तात्पुरत स्थगिती करण्यात येत आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दि.२६/१/२३ रोजी ७४ वा प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने गावातून विद्यार्थी यांची प्रभात फेरी काढून घोषणाबाजी केली यानंतर शाळेत ध्वजारोहण केंद्र प्रमुख मुरलीधर सोनेने शाळेय समितीचे अध्यक्ष सुपडा तडवी यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर स्नेहसंमेलन सकाळी दहा वाजता मुख्यध्यापक एम.डी.सोनेने यांनी स्नेहसंमेलन आयोजन करुन विद्यार्थीसाठी कोकरू नृत्य, भारतनाट्यम,कोळीगिते,आदिवासी नृत्य, देशभक्तीपर गीतांवर नृत्य तसेच नाटक, विविध वेशभूषा सादर करत सावळदबारा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी 'जल्लोष' साजरा केला. जिल्हा परिषद सावळदबारा या शाळेने पटसंख्या टिकवून ठेवण्यासाठी नेहमीच नावीन्यपूर्ण उपक्रमांची कास धरली आहे. त्याचाच एक भाग म्हणून दरवर्षीप्रमणे 'जल्लोष' हे वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच मोठ्या उत्साहात पार पडले. या संमेलनाला विद्यार्थी, पालक आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. जिल्हा परिषद माध्यमातून दर दोन कार्यक्रमानंतर लकी ड्रॉ काढून भाग्यवंत विद्यार्थ्याला बक्षीस देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी असे कार्यक्रम वारंवार केले जावेत, असी आस जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र प्रमुख एम.डी. सोनेने यांनी व्यक्त केली.



# अश्विनी जाधव यांच्या वतीने हळदी-कुंकवाचा कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** नगरपंचायतीचे माजी सभापती तथा वार्ड क्रमांक 6 च्या नगरसेविका अश्विनीताई वाल्मीक जाधव यांच्या वतीने महिलांसाठी मकर संक्रांतिनिमित्त, फुलंब्री शहरातील व परिसरातील माता बहिणींसाठी हळदी कुंकू व ज्येष्ठ महिला ममताबाई जाधव यांनी सर्व महिलांना तिळगुळ देऊन शुभाशीर्वाद दिले. तसेच या हळदीकुंकू कार्यक्रमासाठी परिसरातील व वार्ड 6 मधील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. माजी सभापती नगरपंचायत फुलंब्री अश्विनीताई वाल्मीक जाधव यांनी या कार्यक्रमाचे आयोजित केले होते. या हळदी कुंकू कार्यक्रम प्रसंगी महिलांनी उखाणे घेऊन एकमेकींची संवाद साधले तसेच अनेक विचारांची देवाणघेवाण या महिलांमध्ये घडून आले होते. यावेळी परिसरातील व वार्ड क्र 6मधील महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# संत रामदास महाविद्यालयात भूगोल दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** येथील संत रामदास महाविद्यालयात भूगोल विभागाच्या वतीने " भूगोल दिन" साजरा करण्यात आला. भूगोल विभागाच्या वतीने भूगोल दिन व आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून अजित दडस संचालक, मेनस्ट्रीम सोशल वेलफेअर फाऊडेशन पुणे हे होते. तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रमोद जायभाये होते. यावेळी प्रमुख व्याख्याते अजित दडस यांनी पृथ्वी व पर्यावरण संवर्धन या विषयी उपस्थितां समोर मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांना पर्यावरण, संवर्धन व मृदासंवर्धन या बाबत सविस्तर मार्गदर्शन करून मुलांना निसर्ग व पर्यावरण संरक्षणाची प्रेरणा दिली. त्यासाठी त्यांनी "झाड" या एकपात्री नाटकाचा प्रयोग प्रभावीपणे सादर केला. त्यांनी शेतकरी व विद्यार्थ्यांसाठी मृदा संधारण व सेंद्रिय शेती आणि सेंद्रिय खत तयार करण्यासाठी मार्गदर्शन केले.




यावेळी अध्यक्ष प्रा.प्रमोद जयभाये सर यांनी आपल्या भाषणात भूगोल विषयाची व्याप्ती सांगताना पृथ्वीच्या संबधित विविध घटकांची माहिती सांगितली. तसेच पुढे ते म्हणाले की, मानवाचं जीवन म्हणजे सतत घेतला जाणारा शोध. या शोधामागं मानवी बुद्धिला पडणारे प्रश्न, निसर्गाबद्दलची जिज्ञासा कारणीभूत आहे. यामुळेच मानवानं आज विविध क्षेत्रात प्रगती केली आहे. क्रमाक्रमानं सृष्टीची गुपितं मानव शोधून काढत आहे; परंतू तरीही अजून सृष्टीची अनेक गुपितं मानवाला माहित झालेली नाहीत. निसर्गाच्या गुपितांच्या शोधांबरोबरच मानवाला स्वतःच्या उत्पत्ती बाबतही अनेक प्रश्न पडलेले आहेत. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.भाऊसाहेब देवकर यांनी केले व सूत्र संचालन डॉ. सुनील सामग यांनी केले तर आभार डॉ. बप्पासाहेब मस्के यांनी मानले.यावेळी व्यासपीठावर आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. गजानन अवचार ,डॉ. बा. आं.म. विद्यापीठ औरंगाबाद चे सिनेट सदस्य प्रा.नाना गोडबोले,डॉ.सर्जेराव ताठे, डॉ.विजयानंद जामकर,हे उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास महविद्यायातील प्राध्यापक व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.



# प्रजासत्ताक दिनानिमित्त तिरंगा पदयात्रा

आधुनिक केसरी न्यूज


सुरेश बोकील

**पीरबावडा :** प्रजासत्ताक दिनानिमित्त आज (26) जानेवारी रोजी सकाळी 9 वाजता पिरबावडा येथे ऐतिहासिक भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. या तिरंगा रॅलीत पंचक्रोशीतील विद्यार्थी, नागरिक हजारोच्या संख्येने उपस्थित होते. या पदयात्रेत्रे मध्ये अखंड 211 फुटाचा तिरंगा ध्वज विद्यार्थ्यांनी डोक्यावर घेऊन गावामधून रॅली काढली. या तिरंगा पदयात्रेचे आयोजन सामर्थ्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा प्रहार विदयार्थी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कृष्णा गाडेकर यांनी केले होते. या रॅली साठी तिरंगा फाऊंडेशन फुलंब्री, न्यू हायस्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय पिरबावडा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत, ज्ञानराज बहुद्देशीय संस्था आदींच्या सहकार्याने पूर्ण करण्यात आली.

जि. प. शाळेच्या प्रांगणातून या रॅलीची सुरुवात करण्यात आली. ही रॅली गावामधून काढण्यात आली, यावेळी देशभक्ती गीताने गावामध्ये भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. या तिरंगा पदयात्रेच्या निमीत्ताने वडोद बाजार पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक आरती जाधव व त्यांचे कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता. यासोबतच पिरबावडा ग्रामपंचायतचे नवनिर्वाचित सरपंच डॉ. सारंग गाडेकर व ग्रापंचायत सदस्य, ग्रामसेवक, सोसायटी सदस्य, तिरंगा फाऊंडेशनचे अध्यक्ष अभिजित घोडके, ज्ञानराज संस्थेचे अध्यक्ष राज गाडेकर, न्यू हायस्कूल पिरबावडाचे मुख्याध्यापक सोनवणे सर, जिल्हा परिषद पिरबावडाचे मुख्याध्यापक बनकर सर आदींसह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# काष्ठ शिल्पापासून बनविलेली मूर्ती बघून भारावले कृषीमंत्री सत्तार

आधुनिक केसरी न्यूज



**सिल्लोड :** कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांच्या 01 जानेवारी रोजी झालेल्या वाढदिवसानिमीत्त तालुक्यातील अनाड येथील त्यांचे कट्टर समर्थक असलेले पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते संदीप मानकर यांनी त्यांना मूर्ती या गावचे व हल्ली शिवना येथे राहत असलेले कलाकार पांडुरंग वरपे यांच्या काष्ठशिल्पाच्या कलाकारीतून अखंड लाकडापासून बनविलेली हुबेहूब मूर्ती भेट दिली. तब्बल दीड महिने विशेष मेहनत घेऊन बनविलेली आपली हुबेहूब मूर्ती बघून स्वतः नामदार अब्दुल सत्तार अगदी भारावून गेले. आणि मूर्तीवरील हास्यमुद्रा व वळी सुद्धा अगदी बारकाईने टिपल्याबद्दल त्यांनी या मूर्तीचे फारच कौतुक केले. सर्वांत अनोखी भेट मला दिली असेल तर ती म्हणजे आज मानकर यांनी दिलेली काष्ठशिल्पापासून तयार केलेली माझी हुबेहूब मूर्ती...! असे उदगार कृषीमंत्री सत्तार यांनी केले.

माझा निष्ठावंत कार्यकर्ता संदीप मानकर याने मला जी लाकडापासून बनविलेली हुबेहूब मूर्ती दिली ती पाहून मला फार आनंद झाला आणि मानकर हा माझा इतका ऍक्टिव्ह कार्यकर्ता आहे की तो प्रत्येक वेळी काहीतरी वेगळेच करीत असतो . आज त्याने मला दिलेले अनोखे गिफ्ट माझ्या कायम स्मरणात राहील . **– अब्दुल सत्तार (कृषीमंत्री)**

वाढदिवसानिमीत्त फुल हार देणे ही प्रथाच आहे . परंतु नामदार अब्दुल सत्तार साहेबांचे कार्य आणि त्यांचा मतदारसंघावरती विकासकामांचा आलेख हा इतका अफाट आणि वाखाणण्याजोगा आहे म्हणून त्यांना काहीतरी अशी भेटवस्तू द्यावी जी त्यांच्या हृदयात कायम कोरली जाईल असा मी संकल्प केला आणि त्यांमधून मला ही काष्ठशिल्पाची हुबेहूब मूर्ती देण्याची संकल्पना सुचली . साहेबांनी ज्यांवेळी मूर्ती बघितली तेव्हा ते खुश झाले त्यांतच माझी संकल्पना मार्गी लागल्याचा मोठा आनंद मला झाला . **– संदीप मानकर, शिवसैनिक, पत्रकार**

# रा. स्व. संघ कार्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज




**पुणे :** भारतीय संस्कृती संवर्धक संस्था व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, कसबा भाग यांच्या संयुक्त विद्यमाने ७४ वा प्रजासत्ताक दिन व ध्वजवंदनाचा कार्यक्रम राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मोतीबाग कार्यालयात उत्साहाने साजरा करण्यात आला. प्रसिद्ध वैद्यकीय व्यावसायिक आणि इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉक्टर अविनाश भोंडवे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. कसबा भाग संघचालक ॲड. प्रशांत यादव व भारतीय संस्कृती संवर्धक संस्थेचे अध्यक्ष राजीव जोशी हे या प्रसंगी उपस्थित होते. ध्वजवंदन झाल्यानंतर श्री. अभिजीत पवार यांनी सांघिक गीत सादर केले. त्यानंतर डॉ. अविनाश भोंडवे यांच्या हस्ते भारतमाता प्रतिमा पूजन करण्यात आले. राजीव जोशी यांनी संस्थेच्या कार्याविषयी माहिती दिली. यावेळी बोलताना डॉ. भोंडवे यांनी तरुणांमध्ये आरोग्य साक्षरतेची आवश्यकता याविषयी मार्गदर्शन केले. ॲड. प्रशांत यादव यांनीही मनोगत व्यक्त केले. रोगमुक्त व भयमुक्त समाजासाठी संघाने आतापर्यंत केलेल्या कार्याचा त्यांनी आढावा घेतला व आपल्या गौरवशाली परंपरेची सर्वांना जाणीव करून दिली. कार्यक्रमाचा समारोप भाग कार्यवाह राहुल पुंडे यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. भालचंद्र जोशी यांनी केले. या कार्यक्रमासाठी शंभराहून जास्त नागरिकांची उपस्थिती होती.



# फुलंब्री नगरपंचायतमध्ये प्रजासत्ताक दिन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** नगरपंचायत कार्यालय फुलंब्री येथे भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त गावकऱ्यासह भारत मातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन केले नगरपंचायत कार्यालय येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त उपस्थिती लावली याप्रसंगी मा. विधानसभा अध्यक्ष मा. आमदार हरिभाऊ बागडे नाना केंद्रीय ईपको मा. संचालक त्रिंबक दादा सीरसाट नगरपंचायत मुख्याधिकारी ऋषिकेश यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हा परिषद शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पीरबावडा :** शेलगाव खु ता. फुलंब्री येथील जिल्हा परिषद शाळेत प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केले गेले होते यात विद्यार्थ्यांच्या भाषण, नृत्य, नाटक आशा विविध कलागुणांना वाव देण्यात आला विविध गाण्यांवर विद्यार्थ्यांनी लयबद्ध ठेका धरत उपस्थित मान्यवरांचे मनोरंजन करून दाद मिळवली.

यावेळी राज्यस्तरीय कुस्ती स्पेर्धेतील विजयी विद्यार्थिनि वैष्णवी गाडेकर हिचा सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेत ध्वजारोहण करून भारत मातेचे पूजन करून कार्यक्रमास सुरवात करण्यात आली चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध गाण्यांवर ठेका धरून व सौचालयावर छोटेसे नाटक सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. यावेळी शालेय समिती अध्यक्ष बबन तुपे, उपाध्यक्ष गणेश इधाटे, नंदकिशोर इधाटे, दादाराव इधाटे तसेच जय भवानी शाळेचे शालेय अध्यक्ष राजू खैरनार, सरपंच लंका इधाटे, व्हा. चेअरमन जनार्धन तुपे, साहेबराव इधाटे, बाबुराव तुपे, ज्ञानेश्वर इधाटे, दत्तू तुपे, दादाराव तुपे, अण्णा साठे आदी पालक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संविधानाचे रक्षण केले तर संविधान आपले रक्षण करील : ॲड. सदानंद फडके

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** "धर्मो रक्षति रक्षितः" असे म्हणण्याची आपल्याकडे परंपरा आहे. याचा अर्थ तुम्ही धर्माचे रक्षण करा म्हणजे धर्म तुमचे रक्षण करील, असा होतो. या वाक्यातील धर्म शब्द काढून संविधान टाकला की "संविधानाचे रक्षण करा म्हणजे संविधान तुमचं रक्षण करील," असा अर्थ होतो. त्यामुळे संविधानाचे रक्षण हे सर्वांचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन ॲड. सदानंद फडके यांनी गुरुवारी केले.

धर्म म्हणजे काय तर म्हणजे काय तर परंतु स्वानंद जनकल्याण प्रतिष्ठानच्या वतीने सिंहगड रस्ता भागातील सनसिटी भागात आयोजित स्वा. सावरकर स्मृती व्याख्यानमालेत "भारतीय संविधानाची राष्ट्रजीवनातील भूमिका"या विषयावर पहिले पुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळे ज्येष्ठ मूर्तिशास्त्रज्ञ डॉ. गो. बं. देगलूरकर, स्वानंद जनकल्याण प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुधीर काळकर, सचिव रवींद्र शिंगणापुरकर, व्याख्यानमाला प्रमुख राघवेंद्र देशपांडे प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वांसाठी खुली असलेल्या या व्याख्यानमालेचे उद्घाटन डॉ. देगलूरकर यांच्या हस्ते झाले आणि ती २९ जानेवारीपर्यंत चालणार आहे. यावेळी ॲड. फडके म्हणाले, की भारत सरकार कायदा २६ नोव्हेंबर १९३५ रोजी मंत्रिमंडळात परित करण्यात आला आणि १९३७ झाली अमलात आणण्यात आला. यानंतर २६ जानेवारी १९५० रोजी भारताचे संविधान लागू झाल्यानंतर भारताचा प्रत्येक नागरिक स्वामी झाला. संविधानाचे रक्षण केले तर संविधान आपले रक्षण करेल. मात्र यासाठी सर्व प्रणाली व्यवस्थित चालायल्या हव्यात. देशात १९७५ आणीबाणी जाहीर करण्यात आली. त्यावेळी मूलभूत अधिकारांची पायमल्ली झाली. त्याचवेळेस देशातील १४ उच्च न्यायालयांनी सांगितले की मूलभूत अधिकार हिरावून घेता येणार नाहीत. न्या. रे, न्या. बेग, न्या. चंद्रचूड आणि न्या. भगवती यांनी मूलभूत अधिकाराच्या विरोधात निर्णय दिला होता मात्र न्या. एच. आर. खन्ना यांनी त्यांचे विरोधात निर्णय दिला. रा. स्व. संघाचे तत्कालीन सरसंघचालक स्व. बाळासाहेब देवरस यांनीही सांगितले होते, की मूलभूत अधिकारांमध्ये काही तरतुदी करणे गरजेचे आहे.

डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रत्यक्ष भेटीच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच या व्याख्यानमालेतून होईल स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जाज्वल्य कार्याची माहिती लोकांना होईल, अशी अपेक्षाही व्यक्त केली. ते म्हणाले, की स्वा. सावरकरांनी देशाची अनेक प्रकारे सेवा केली. क्रांतिकारक म्हणून कार्य करतानाच अनेक शब्द मराठीत आणले. ते खऱ्या अर्थाने भारत मातेचे पुत्र होत. प्रास्ताविक करताना अध्यक्ष सुधीर काळकर म्हणाले की स्वानंद जनकल्याण प्रतिष्ठान ही संस्था 2010 मध्ये व्याख्यानमालेच्या माध्यमातून सुरू झाली. आज एकूण 45 वस्त्यांमध्ये संस्थेचे काम सुरू आहे. उपक्रमांच्या माध्यमातून 31 समृध्दी वर्ग चालवले जात असून या वर्गांवर विशेष प्रशिक्षण देवून शिक्षकांची नेमणूक केली आहे.